सोलापूर तरुण भारत
# आसमंत



# २०२४ वेगवान घडामोडींचे वर्ष

**विशेष**
उर्मिला राजोपाध्ये

**२०२४ हे वर्ष आंतरराष्ट्रीय संबंधांच्या दृष्टीने मोठ्या बदलांचे वर्ष राहिले. निवडणुका, शिखर परिषदा आणि भू-राजकीय घडामोडी आदींनी जागतिक राजकारणाला नवी दिशा दिली. यातूनच जगभरातील देशांमध्ये सहकार्य, स्थैर्य आणि शांती प्रस्थापित करण्यासाठी अधिक ठोस संवादाची आवश्यकता प्रकर्षाने जाणवली. आता नूतन वर्षामध्ये यावर उचित कार्यवाही होईल, अशी अपेक्षा व्यक्त करत सरत्या वर्षाला निरोप देऊ या.**

जागतिक राजकारणात उथलापालथ घडवून आणणारे वर्ष अशीच मावळत्या २०२४ ची ओळख सांगितली जाईल. हे वर्ष नानाविध घडामोडींनी भरले होते. युक्रेन, पॅलेस्टाईन, सुदान किंवा येमेनमध्ये शत्रुत्व असताना, आपण सरत्या वर्षात दुसरे महायुद्ध संपल्यानंतर प्रथमच सर्वात मोठा जागतिक संघर्ष अनुभवला. त्यामुळेच विविध सशस्त्र संघर्षांबरोबरच कॅलेंडरवर चिन्हांकित झालेल्या ७० पेक्षा अधिक निवडणुकांचे एकमेकांवर परिणाम कसे झाले हे दाखवणारे हे वर्ष होते, असे म्हणता येईल.

सर्वप्रथम भूराजकीय तणाव आणि संघर्षाचा विचार करायचा तर रशियाने २०२२ मध्ये सुरू केलेल्या युक्रेनवरील आक्रमणाची नोंद घ्यावी लागेल जे २०२४ मध्येही सुरू राहिले. अर्थातच या युद्धामुळे युरोपमध्ये संपूर्ण वर्षभर तणाव वाढला आणि जागतिक अर्थव्यवस्थेवरही त्याचा परिणाम झाला. सरत्या वर्षामध्ये चीनने तैवान जलसंधीमध्ये आक्रमकता वाढवल्यामुळे अमेरिका आणि त्याच्या सहयोगी देशांमधील तणाव वाढला. सैन्यदलाचे सराव आणि राजनैतिक तणाव यामुळे या प्रदेशात मोठ्या संघर्षाची शक्यता वाढल्याचे पाहायला मिळाले. हे संपूर्ण वर्ष मध्यपूर्वेत अस्थिरता देऊन गेले. येमेन, सीरिया आणि इतर देशांमध्ये सुरू असणाऱ्या संघर्षांमुळे मध्यपूर्व प्रदेश अस्थिर राहिला. प्रादेशिक स्पर्धा आणि संप्रदायवादी तणावामुळे स्थैर्य आणि सुरक्षेला निर्माण झालेला धोका आपण पाहिला. या अस्थिरतेच्या पृष्ठभूमीवर २०२४ मध्ये अनेक देशांना पुरवठा साखळीतील अडथळे, वाढता ऊर्जा खर्च आणि भूराजकीय तणावाने उद्भवलेल्या उच्च दरवाढीचा सामना करावा लागला. मध्यवर्ती बँकांनी दरवाढ करून चलनवाढ नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला, परंतु यामुळे आर्थिक वाढ मंदावण्याचे धोके होते. त्यामुळेच तज्ज्ञांनी जागतिक मंदीची भीती व्यक्त केली. उच्च व्याजदर, भूराजकीय अनिश्चितता आणि कोविड-१९ महामारीचा दीर्घकालीन परिणाम या सर्वांच्या एकत्रित परिणामामुळे पुढील काळातही ही भीती राहणार आहे.

विस्ताराने बघायचे तर २०२४ हे वर्ष आर्थिक आणि तंत्रज्ञान घटकांच्या संयोगामुळे जटिल आणि आव्हानात्मक काळ समोर आणणारे होते, असे म्हणता येईल. त्यामुळेच जग अशा नानाविध आव्हानांना सामोरे जात असताना आंतरराष्ट्रीय सहकार्य, राजनय आणि मजबूत उपाययोजनांची गरज अधिक स्पष्ट झाली. आधी उल्लेख केल्याप्रमाणे यंदा ७० पेक्षा अधिक देशांमध्ये जवळपास चार अब्जपेक्षा अधिक लोकांनी मतदान केले. त्यामध्ये अमेरिका, भारत, पाकिस्तान, इंडोनेशिया, तैवान, मेक्सिको, व्हेनेझुएला, सेनेगल आदींचा उल्लेख करावा लागेल. मात्र, अधिक निवडणुकांचा अर्थ अधिक लोकशाहीवाद पसरणे हा नव्हता. आज आपण कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अत्याधुनिक शस्त्रे हाताळणीच्या युगात राहात असलो तरी मतपेट्यांच्या सुरक्षेला असणारा धोका संपलेला वा कमी झालेला दिसला नाही. त्यामुळेच हायब्रीड सिस्टीमचा फायदा होत असला तरी २०२४ मधील निवडणुकांचे चक्र लोकशाहीच्या अध:पतनाचा आणि प्रतिकाराचा क्षण दर्शवून गेले आहे.

सरत्या वर्षातही आंतरराष्ट्रीय नियमांची धूप अधिक स्पष्ट झाली आणि ती करणाऱ्या घटना प्रकर्षाने दिसल्या. एकाच वेळी अनेक ठिकाणी संघर्ष सुरू असल्यामुळे जग अधिकाधिक विकेंद्रित होत असल्याचे तीव्रतेने जाणवले. २०२४ मध्ये राजकीय हिंसाचारात २७ टक्के वाढ झाली. त्याची तीव्रता आणि वारंवारिताही वाढली. गाझामधील युद्धामध्ये आतापर्यंत १७,००० हून अधिक जण मृत झाले आहेत. गाझापट्टीमध्ये अडकलेल्या पॅलेस्टिनी लोकसंख्येच्या नरसंहाराच्या धोक्याबद्दल संयुक्त राष्ट्रांनी दिलेले इशारे किती पाळले गेले, हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे. या संकटात आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या वैधतेवरील चर्चेच्या दरम्यान इस्रायलने संयुक्त राष्ट्रांच्या विश्वासार्हतेलाच मोठा धक्का दिला. यावेळी सुरक्षा परिषद पक्षाघाताचे साधन बनली असल्याचे मतही व्यक्त केले गेले.


२०२४ मध्ये आंतरराष्ट्रीय कायदा दडपशाहीने डावलण्याची वा त्याकडे दुर्लक्ष करण्याची भावना वाढलेली दिसली. गाझामध्येच नाही तर युक्रेनमध्ये युद्धाचा प्रवेश, नागोर्नो काराबाखमधून जातीय आर्मेनियन लोकसंख्येची हकालपट्टी किंवा गेल्या ३६ महिन्यांमध्ये सहा आफ्रिकन देशांमध्ये झालेले सत्तापालट हे शक्तीच्या वापराचे नियंत्रणमुक्त पर्व सरत्या वर्षाने दाखवून दिले. ते आंतरराष्ट्रीय नियमांच्या ऱ्हासाचे द्योतक ठरले. गृहयुद्ध, वांशिक मतभेद आणि उपासमारीच्या परिस्थितीत मोठ्या प्रमाणात अत्याचार झाले आणि अत्याचाराचा धोका दाखवणाऱ्या या वर्षाने जगभरातील तब्बल सात दशलक्षाहून अधिक लोकांना आपापली घरे सोडून पळून जाण्यास भाग पाडले.

या वर्षी सुदान हा जगातील सर्वाधिक अंतर्गत विस्थापितांचा देश बनल्याची इतिहास नोंद घेईल. सरत्या वर्षामध्ये रशिया, ट्युनिशिया, अल्जेरिया, बेलारूस, रवांडा आणि इराण यासारख्या देशांमधील नेतृत्वाने निवडणुकांचा वापर करून सत्तेवर आपली पकड घट्ट करण्यासाठी तसेच नागरिकांच्या नजरेत वैधता मिळवण्याचा प्रयत्न केला. या पृष्ठभूमीवर अमेरिका किंवा भारतासारख्या देशांमध्ये अलिकडच्या वर्षांमध्ये लोकशाही क्षीण झाल्याचीही चर्चा होत राहिली. दुसरीकडे, या वर्षी युरोपमध्ये एकीकडे पोलिश विरोधकांचा विजय आणि दुसरीकडे नेदरलँड्समधील इस्लामोफोबिक गीर्ट वाइल्डर्सच्या विजयासह मतदानात संमिश्र परिणाम दिसून आले. एकूणच २०२४ मध्ये घेतल्या गेलेल्या विविध देशांमधील लोकशाहीच्या कसोटीत महिला आणि तरुणांची मते महत्त्वाची ठरल्याचेही तीव्रतेने जाणवते. भारतातील निवडणुकीमध्ये ही चर्चा राहिलीच, पण ब्राझील किंवा ऑस्ट्रियामध्ये, अतिउजव्या शक्तींना स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांचा पाठिंबा १६ टक्के जास्त राहिलेला दिसला. जून २०२४ मधील घटनाक्रमानंतर मेक्सिकोमध्ये इतिहासात प्रथमच एका महिलेची राष्ट्राध्यक्ष म्हणून निवड झाली. यंदा भारतात पंतप्रधानपदाच्या शर्यतीत तिसऱ्यांदा उभ्या ठाकलेल्या नरेंद्र मोदींच्या विरोधात विरोधी पक्ष पूर्वीपेक्षा अधिक ताकदीने आणि एकजुटीने निवडणुकांना सामोरा गेलेला दिसला.

(पान ४ वर)

---

**मागील काही दिवसांपासून 'नेहरुंची पत्रे' हा चर्चेचा विषय ठरला आहे. कारण, देशाचे प्रथम पंतप्रधान असलेल्या पंडित जवाहरलाल नेहरु यांची पत्रे पंतप्रधान संग्रहालयाकडे नसून, ती सोनिया गांधींच्या ताब्यात आहेत. त्यामुळे असे या पत्रांमध्ये नेमके काय आहे? ती पत्रे सार्वजनिक होऊ नये, म्हणून हा सगळा खटाटोप आहे का? यांसारख्या प्रश्नांचा शोध घेणारा हा लेख...**



# चाचांचे पत्र हरवले?

**सत्ताकारण**
पार्थ कपोले

देशाचे प्रथम पंतप्रधान पंडित उपाख्य चाचाजी जवाहरलाल नेहरू आणि पत्रे, यांचा अतिशय निकटचा संबंध. अर्थात, त्या काळात संपर्कासाठी पत्र हाच मुख्य मार्ग उपलब्ध होता. त्यामुळे त्या काळातील सर्वसामान्य नागरिक असोत की, नेतेमंडळी असो, सर्वच जण पत्रे लिहीत असत आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील अग्रणी आणि देशाचे प्रथम पंतप्रधान या नात्याने तर पं. नेहरूंनी अगणित पत्रे लिहिली असणार. त्यातील बहुतांशी पत्रे ही तर त्या काळातील अनेक महत्त्वाच्या घडामोडींवर प्रकाश टाकणारी असतील, काही अन्य देशांतील नेत्यांना लिहिलेली असतीस, काही देशांतील नेत्यांना लिहिलेली असतील, तर काही अगदी वैयक्तिकही असतील. त्यामुळे पं. नेहरू आणि पत्रे हा देशासाठी महत्त्वाचा विषय असून, त्यावर कोणते एक कुटुंब हक्क सांगूच शकत नाही. मात्र, सध्या तसाच प्रकार घडला आहे.

पं. नेहरू आणि पत्रे याविषयी देशातील फार मोठे पत्रकार आणि ब्रिटनमधील भारतीय उच्चायुक्तालयामध्ये उच्चायुक्त असलेले दिवंगत कुलदीप नैयर यांनी त्यांच्या एका पुस्तकात याच पत्रांचा मोठा रंजक किस्सा सांगितला आहे. नैयरसाहेब म्हणतात, नेहरू पर एडविना माउंटबेटन के प्रभाव की जाँच-पडताल में मेरी दिलचस्पी आगे चलकर भी बनी रही। १९९० में लन्दन में भारत के हाई कमिशनर के रूप में अपनी नियुक्ती के दौरान मैंने बिखरे हुए सूत्रों को समेटने की कोशिश की। मुझे पता चला कि एयर इंडिया की उडानें हर दिन नेहरू का एक पत्र लेकर लन्दन जाती थी, जिसे वहा का हाई कमिशन बडी तत्परता से लेडी माऊंटबेटन तक पहुंचा देता था। कमिशन हर दिन एडविना से उनका जवाब भी ले आता था, जिसे नेहरू को भेज दिया जाता था। जब कभी एडविना का पत्र पहुँचने में देर हो जाती तो नेहरू अधिकारियों पर जमकर बरसते थे। आता खास विमानाने ही पत्रे पाठविली जात असल्यास या पत्रव्यवहारामध्ये नक्कीच देशहिताचे अथवा आंतरराष्ट्रीय हिताचेच काहीतरी असणार, असे मानण्यास हरकत नसावी. कारण, देशाच्या पंतप्रधानपदी असलेला व्यक्ती काही शिळोप्याच्या गप्पा मारण्यासाठी, तर विमानाद्वारे पत्रे पाठवणार नाही. असो.

सध्या पं. जवाहरलाल नेहरूंची अशी अनेक पत्रे आज ५१ पेट्यांमध्ये काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांच्याकडे पडून आहेत. या पेट्यांमध्ये सुमारे २.८० लाख पानांची कागदपत्रे आहेत. ही सर्व पत्रे जवाहरलाल नेहरूंची वैयक्तिक पत्रे आहेत, जी त्यांनी एडविना माऊंटबॅटन, अल्बर्ट आइनस्टाईन, जयप्रकाश नारायण, पद्मजा नायडू, विजया लक्ष्मी पंडित, अरुणा असफ अली, बाबू जगजीवन राम आणि गोविंद बल्लभ पंत यांसारख्या व्यक्तिमत्त्वांना लिहिलेली आहेत. या ५१ पेट्यांमध्ये भारताच्या इतिहासाशी संबंधित माहिती सार्वजनिक करण्यासाठी, 'पंतप्रधान संग्रहालय आणि ग्रंथालया'ने १० डिसेंबर २०२४ रोजी राहुल गांधी यांना पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांना विनंती करण्यात आली आहे की, त्यांनी सोनिया गांधींना या ५१ पेट्यांमधील पत्रे पंतप्रधान संग्रहालय आणि ग्रंथालयाला परत करण्यासाठी सांगावे.

'पीएमएमएल'ने राहुल गांधींना पत्र, दि. ९ सप्टेंबर २०२४ रोजी सोनिया गांधी यांना पत्रही लिहिले होते. मात्र, या पत्राला सोनिया गांधींनी प्रतिसाद न दिल्याने 'पंतप्रधान संग्रहालय आणि ग्रंथालय मंडळा'चे सदस्य आणि सुप्रसिद्ध इतिहासकार रिजवान कादरी यांनी हे पत्र लिहिले आहे. राहुल गांधी हे सोनिया गांधी यांचे पुत्र आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते असले, तरी या दोन्ही कारणांमुळे त्यांना हे पत्र लिहिले गेले नाही, तर पंडित जवाहरलाल नेहरूंच्या सर्व पत्रांचे आणि कागदपत्रांचे राहुल गांधी हे वारसदार असल्यामुळे सांस्कृतिक मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या पंतप्रधान संग्रहालय आणि ग्रंथालयाच्या मंडळाने त्यांना हे पत्र लिहिले आहे. सध्या गांधी कुटुंबाच्या प्रमुख असल्याने या सर्व कागदपत्रांच्या संरक्षक सोनिया गांधी आहेत. ही पत्रे आणि दस्तऐवजांचे संरक्षक म्हणून सोनिया गांधी यांनी सहकारी एमव्ही राजन यांना नेहरू संग्रहालय आणि ग्रंथालयाच्या अधिकाऱ्यांना भेटण्यास सांगितले होते.

(पान ४ वर)

---

# दहशतवाद्यांना बांगलादेशचे आयते कुरण!

**बांगलादेशमधील काही जहाल इस्लामी गट या दहशतवादी संघटनाशी जवळीक साधून आहेत. ही जवळीक भावी काळात भारतासाठी डोकेदुखी ठरू शकते. बांगलादेशमधील असे जहाल गट 'एक्यूआयएस' आणि 'आयएसकेपी'ला पाहिजे ते सर्व सहकार्य करण्यास तयार असतील. बांगलादेशमधील जहाल गट अशा दहशतवादी संघटनांना भारताविरुद्ध पुरेशी रसद पुरविण्याचे केल्यावाचून राहणार नाहीत.**

**वेधक**
दत्ता पंचवाघ

भारताविरुद्ध विविध दहशतवादी संघटना जगाच्या विविध भागात कार्यरत असल्या, तरी आगामी काळात भारतास 'अल कायदा इन द सब कॉन्टिनेन्ट'(एक्यूआयएस) आणि 'इस्लामिक स्टेट खोरासान प्रोविन्स'(आयएसकेपी) या दहशतवादी संघटनांकडून अधिक धोका असल्याचा गुप्तचर विभागाचा होरा आहे.

'लष्कर-ए-तय्यबा' आणि 'जैस-ए-मोहम्मद' या दहशतवादी संघटनांना भारत तोंड देत आला आहे. तसेच, त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात नियंत्रण ठेवण्यात यश आले आहे. जम्मू-काश्मीर पुरत्याच या संघटना आता कार्यरत असल्याचे दिसून येत आहे. पण, वर उल्लेखित 'एक्यूआयएस' आणि 'आयएसकेपी' यांचा भारतास भावी काळात धोका आहे, असा अंदाज वर्तविण्यात येत आहे. बांगलादेशमध्ये अलीकडे जे सत्तांतर झाले, त्यामुळे तो देश म्हणजे, अशा दहशतवादी संघटनांसाठी आयते कुरणच बनले आहे. बांगलादेशमधील सत्तांतरानंतर त्या देशात जहाल, धर्मांध गट सक्रिय झाले आहेत. अन्य देशात सक्रिय असलेल्या इस्लामी दहशतवादी संघटनांना बांगलादेशात आश्रय घेणे आता अधिक सुकर झाले आहे.

(पान ४ वर)



राष्ट्ररक्षा

ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३


# भारताची संरक्षण क्षमता आणखी मजबूत होणार

गेल्या महिनाभरात भारताची संरक्षण क्षमता मजबूत करण्यासाठी अनेक घटना घडल्या. त्या होत्या व्होरोनेझ लाँग-रेंज रडारची खरेदी, आयएनएस तुशील नौदलात सामील आणि अनेक युद्धनौकांना बांधण्याकरिता सरकारकडून मिळालेली परवानगी.

### हवाई संरक्षण अधिक सक्षम करण्यासाठी रशियाची मदत

भारत आपले हवाई संरक्षण अधिक सक्षम करण्यासाठी व्होरोनेझ लाँग-रेंज रडार सिस्टिमसाठी चार अब्ज डॉलरच्या संरक्षण कराराला अंतिम रूप देण्यासाठी रशियाशी चर्चा करीत आहे. भारताला ही रडार यंत्रणा मिळाल्यास ड्रोन, शत्रूची विमाने, क्षेपणास्त्र शोधण्याची हवाई संरक्षण क्षमता वाढेल.

### व्होरोनेझ रडार प्रणाली काय आहे?



व्होरोनेझ लाँग-रेंज अर्ली वॉर्निंग रडार प्रणालीचा एकूण पल्ला (रेंज) आठ हजार किलोमीटरपर्यंत आहे आणि ही प्रणाली एकाच वेळी ५०० हून अधिक लक्ष्यांचा (Targets) शोध घेऊ शकते; म्हणजेच ट्रॅक करू शकते. व्होरोनेझ रडार यंत्रणा बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि स्टेल्थ विमानांचा मागोवा घेण्यास सक्षम आहे. रशिया २०१२ पासून ही रडार प्रणाली वापरत आहे. चार अब्ज डॉलरच्या संरक्षण कराराला अंतिम रूप देण्यासाठी भारत रशियाशी चर्चा करीत आहे.

सध्या प्रणालीला सुधारित केले जात आहे; ज्यामुळे लष्कराला हवेतील आणि जवळच्या जागेच्या वातावरणात विविध आकारांच्या लक्ष्यांचा मागोवा घेणे, त्यांच्या अंतरांची गणना करणे, क्षमता निर्धारित करणे शक्य होणार आहे. ही प्रणाली त्यांना अडवूदेखील शकेल. रशियाने किमान १० व्होरोनेझ रडार प्रणाली तैनात केल्या आहेत; ज्यामुळे क्षेपणास्त्र संरक्षण क्षमता वाढल्या आहेत.

### व्होरोनेझ रडार प्रणाली भारताला का हवी?

रशियाची व्होरोनेझ रडार यंत्रणा मिळाल्यास मेक इन इंडिया उपक्रमाच्या अनुषंगाने किमान ६० टक्के प्रणाली भारतीय भागीदारांद्वारे तयार केली जाईल. वाढत्या सुरक्षा धोक्यांमध्ये हवाई संरक्षण सुविधांचे आधुनिकीकरण करण्याच्या देशाच्या प्रयत्नांचा हा एक भाग आहे. या प्रणालीमुळे भारताला चीन, दक्षिण आणि मध्य आशिया आणि बहुतेक हिंद महासागर क्षेत्रातील हवाई धोक्यापासून दूर ठेवण्यास मदत करील. क्षेपणास्त्र शोधण्याच्या प्रयत्नांमध्ये रडार महत्त्वाची भूमिका बजावेल.

जेव्हा एखादा उपग्रह प्रक्षेपण शोधतो, तेव्हा तो व्होरोनेझ रडारला सतर्क करतो. या रडार यंत्रणांचे काम आहे आंतरखंडीय बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांची प्रक्षेपण धोक्याची पडताळणी करणे. बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे शोधण्यासाठी ही यंत्रणा रशियाच्या उपग्रहांबरोबर एकत्रित काम करते. भारताच्या शत्रूंकडून वाढत्या क्षेपणास्त्र धोक्याला शोधण्यासाठी प्रगत रडार प्रणाली महत्त्वाची आहे. चीनमधून फायर केलेल्या क्षेपणास्त्रांना या प्रणालीमुळे निष्क्रिय करता येईल. व्होरोनेझसारखी प्रगत रडार प्रणाली भारताला येणाऱ्या काळात विकसित होणाऱ्या धोक्यांना तोंड देण्यास सक्षम करील.

रडारच्या मल्टिरोल क्षमतेत अंतराळ निरीक्षणाचा समावेश आहे. त्यामुळे ही प्रणाली भारताच्या अंतराळ कार्यक्रमासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकते. अवकाशातील वस्तूंवर नजर ठेवण्याची रडारची क्षमता भारताच्या नागरी आणि लष्करी उद्दिष्टांशी सुसंगत आहे. त्याचा फायदा भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो)ला होणार आहे. यामुळे भारत पाच हजारांपेक्षा जास्त रेंजच्या रडार प्रणाली असलेल्या राष्ट्रांच्या यादीत सामील होईल.

### रशियाने भारताला गाईडेड क्षेपणास्त्राने सुसज्ज आयएनएस तुशीलला सुपूर्द केले



आयएनएस तुशील (F 70), अत्याधुनिक बहुउद्देशीय मार्गदर्शित क्षेपणास्त्र युद्धनौका, ९ डिसेंबर २०२४ रोजी कॅलिनिनग्राड येथील यंतर शिपयार्डमध्ये भारतीय नौदलात सामील करण्यात आली. या युद्धनौकेचे नौदलात सामील होणे हे भारताच्या वाढत्या सागरी सामर्थ्याचा दाखला आहे. ही युद्धनौका, भारत आणि रशिया यांच्यातील सामायिक मूल्ये, परस्पर विश्वास तसेच विशेष आणि धोरणात्मक विशेषाधिकार असलेल्या भागीदारीच्या दीर्घकालीन मैत्री संबंधातील महत्त्वाचा टप्पा आहे. अत्याधुनिक 'मल्टिरोल स्टेल्थ गाईडेड मिसाईल फ्रिगेट आयएनएस तुशील' ही युद्धनौका कॅलिनिनग्राडमध्ये संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांच्या उपस्थितीत भारताला देण्यात आली.

### भारतीय नौदलासाठी गेम चेंजर

आयएनएस तुशील ही १२५ मीटर लांब आणि ३९०० टन वजनाची युद्धनौका आहे. ही युद्धनौका रशियन, भारतीय अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि युद्धनौका बांधणीतील सर्वोत्तम पद्धतींचे प्रभावी मिश्रण आहे. आयएनएस तुशील अत्याधुनिक शस्त्रांनी सुसज्ज आहे. यामध्ये ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्र, उच्च श्रेणीच्या पृष्ठभागावरून हवेत मारा करणारे क्षेपणास्त्र आणि विमानविरोधी तोफा यांचा समावेश आहे. याशिवाय या युद्धनौकेत नियंत्रित क्लोज-रेंज रॅपिड फायर गन सिस्टिम, पाणबुडी मारणारे टॉर्पेडो यासह अनेक प्रगत रॉकेट्स आहेत. युद्धनौकेच्या डिझाईनमुळे रडारपासून वाचण्याची क्षमता आणि चांगली स्थिरता (stability) मिळते. २०१६ भारत आणि रशिया यांच्यात ४ स्टेल्थ फ्रिगेट्ससाठी २.५ बिलियन (सुमारे २१ हजार कोटी रुपये) किमतीचा करार झाला होता. यापैकी दोन युद्धनौका रशियात (यंतर शिपयार्ड) आणि दोन गोवा शिपयार्डमध्ये बांधण्यात येणार आहेत.

तुशीलच्या डिलिव्हरीनंतर रशिया जून-जुलै २०२५ मध्ये तमलला भारताकडे सुपूर्द करेल. संरक्षणमंत्र्यांनी सांगितले की, आयएनएस तुशीलमुळे भारताची सागरी शक्ती वाढेल. रशियन आणि भारतीय उद्योगांची यशस्वी भागीदारी आणि दोन्ही देशांमधील दीर्घकालीन मैत्रीमधील मैलाचा दगड असल्याचे त्यांनी सांगितले. संरक्षणमंत्र्यांनी जहाजांमध्ये 'मेड इन इंडिया' सामग्री वाढल्याबद्दल आनंदही व्यक्त केला.

### नौदल जहाजांमध्ये 'मेड इन इंडिया' सामग्रीमध्ये वाढ

भारतीय नौदल आणि रशियन जहाज डिझाईन कंपनी सेव्हनॉय डिझाईन ब्यूरोच्या तज्ज्ञ अभियंत्यांच्या मदतीने आयएनएस तुशीलमधील स्वदेशी सामग्री २६ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आली आहे. यासह परदेशी जहाजांमध्ये भारतीय बनावटीच्या यंत्रणांची संख्या ३३ झाली आहे; जी पूर्वीपेक्षा दुप्पट आहे. ब्रह्मोस एअरोस्पेस प्रायव्हेट लिमिटेड, भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड, केल्ट्रॉन, नोव्हा इंटिग्रेटेड सिस्टिम्स, एल्कॉम मरीन, जॉन्सन कन्ट्रोल्स इंडिया आणि इतर अनेक मूळ उपकरणे निर्माते या जहाजाच्या निर्मितीमध्ये सहभागी असलेल्या प्रमुख भारतीय कंपन्या होत्या.

### रशिया-युक्रेनच्या मदतीने मिळाले जहाज

भारतीय नौदलात वापरल्या जाणाऱ्या बहुतेक जहाजांमध्ये वापरल्या जाणाऱ्या गॅस टर्बाईनची निर्मिती युक्रेनियन कंपनी Zorya Mashproekt करतात. हे जागतिक स्तरावर हायड्रोगॅस टर्बाईनच्या उत्पादनासाठी ओळखले जाते. या संपूर्ण ऑर्डरची सर्वात मोठी गोष्ट म्हणजे युद्ध असूनही भारताला हे जहाज रशिया आणि युक्रेनच्या मदतीने मिळाले आहे. आयएनएस तुशीलवर अधिकाऱ्यांसह १८० कर्मचाऱ्यांचा ताफा तैनात केला जाऊ शकतो. जहाजावर आठ ब्रह्मोस अनुलंब प्रक्षेपित केलेली जहाजविरोधी क्रूझ क्षेपणास्त्रे, २४ मध्यम पल्ल्याच्या आणि आठ कमी पल्ल्याच्या पृष्ठभागावरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे, एक १०० मिमी तोफ आणि दोन क्लोज-इन क्षेपणास्त्रे असतील. तुशील ही क्रोव्हॅक-३ श्रेणीतील युद्धनौका आहे. भारतात सध्या अशा सहा युद्धनौका आहेत. ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ आणि हाय रेंज क्षेपणास्त्रांनी सुसज्ज अशा तीन युद्धनौकांची डिलिव्हरी बाकी आहे. 'आयएनएस तुशील' ही प्रगत पाणबुडीविरोधी युद्धनौका आहे. यात प्रगत युद्ध आणि हवाई संरक्षण प्रणाली आहे; ज्यामुळे याचा अनेक मोहिमांसाठी वापर केला जाऊ शकतो. आयएनएस तुशील 'मेक इन इंडिया' धोरणाच्या अनुषंगाने भारताच्या सामरिक हितासाठी महत्त्वाची ठरेल. आयएनएस तुशील हिंद महासागरात चीनच्या वाढत्या सामर्थ्याचा मुकाबला करण्यासाठी भारताला मदत करील.

### नौदलासाठी पाणबुड्यांचा करार लवकरच

''केंद्र सरकारने देशी बनावटीच्या अणुऊर्जेवर चालणाऱ्या दोन पाणबुड्यांच्या निर्मितीला मंजुरी दिली असून नौदलासाठी तीन स्कॉर्पिन वर्गातील पाणबुड्यांच्या बांधणीचा करार पुढील महिन्यात होणे अपेक्षित आहे,'' अशी माहिती नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी ३ डिसेंबरला दिली. ४ डिसेंबर रोजी होणाऱ्या नौदल दिनाच्या पृष्ठभूमीवर घेतलेल्या पत्रकार परिषदेत ॲडमिरल त्रिपाठी यांनी सांगितले की, ''एसएसएनमुळे नौदलाच्या क्षमतेत मोठी वाढ होईल. अणुऊर्जेवर चालणारी पहिली पाणबुडी २०३६-३७ पर्यंत तर दुसरी पाणबुडी त्यापुढील दोन वर्षांत तयार होईल.'' भारताच्या विविध जहाज बांधणी कारखान्यांत ६२ युद्धनौका आणि पाणबुडीची बांधणी सुरू आहे. याशिवाय देशी बनावटीच्या ३१ नौका आणि पाणबुडी बांधणी प्रकल्पाचे प्रस्ताव मान्य करण्यात आले. नौदलासाठी ६० युटिलिटी हेलिकॉप्टरच्या खरेदीस मान्यता दिली आहे. यामुळे भारताची संरक्षण क्षमता येणाऱ्या काळात अजून मजबूत होणार आहे.

संत प्रबोधन

प्रा. डॉ. हरिदास आखरे




संतांनी परमेश्वराची जी मनोभावे भक्ती साधना केली, ती नवविधा भक्ती सर्वमान्य आहे. ज्या भक्ताला जशी ती साध्य होती, त्यांनी ती साध्य करून भगवंताला प्राप्त करून घेतले. या ९ साधनांद्वारे जो कोणी मनोभावे भगवंताची सेवा करेल, त्याला भगवंत प्राप्त झाल्याशिवाय राहत नाही, असा त्यांचा दृढ विश्वास आहे.

संत ज्ञानेश्वर हे वारकरी संप्रदायाचे पायाभूत आधारस्तंभ. ज्ञानियांचे राजे. परंतु, भगवत प्रेमासाठी पंढरपूरला आवडीने पताका, गुढी घेऊन जाईन म्हणतात. हे पुरुषांच्या अनन्यभक्तीचे द्योतकच मानावे लागेल. **श्रवणं कीर्तनं विष्णोःस्मरणं पादसेवनं । अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदम् ।।** (श्रीमद् भागवत ७/५/२३) १) श्रवण २) कीर्तन ३) विष्णुस्मरण ४) पादसेवन ५) अर्चन ६) वंदन ७) दास्य ८) सख्य ९) आत्मनिवेदन. अशा ९ प्रकारच्या भक्तिमार्गाने भक्तिसाधना केली जाते. प्रत्येकाने या नवविध भक्तिसाधन मार्गाने वाटचाल केल्यास साक्षात्कार प्राप्ती होते. श्रवण साक्षात्कार घडण्यासाठी अधिकारी पुरुषाद्वारे श्रवण घडावे लागते. साक्षात्कारी मनुष्याच्या ज्ञानी, तपस्वी वाणीतून कीर्तन व प्रवचन ऐकणे म्हणजे श्रवण होय. **संत एकनाथ सांगतात श्रवणे परीक्षिती तरला । श्रवणे क्रौंच उद्धरिला । मकरोदरी श्रवण पावला । सिद्ध जाहला मत्सेंद्र।।** (ए. भा. ६/१००) तपस्वी पुरुषाकडून श्रवणामुळे परीक्षिती राजास, क्रौंच व मत्सेंद्रनाथाला साक्षात्काराचा अनुभव आला. संत ज्ञानेश्वर श्रवणाचे महत्त्व सांगतात. **तैसा मनाचा मारू न करिता । इंद्रिया दुःख न देता ।। एथ मोश्रु नसे आयता । श्रवणाचिमाजी ।।** (ज्ञाने.- ४/२२४) **कीर्तनभक्ती कीर्तन चांग कीर्तन चांग । होय अंग हरिरूप ।।** (तु. गा. २४२१) भगवंताचे नाम घेणे किंवा भगवंताचे गुणगाण गाणे व भगवत् स्वरूपाचा चिंतनात्मक विचार करणे म्हणजे कीर्तनभक्ती होय. नवविधा भक्तीचा हा दुसरा महत्त्वपूर्ण प्रकार आहे. **आवडी करिता हरिकीर्तन। हृदयी प्रकटे श्री जनार्दन।। त्याहोनि श्रेष्ठ साधन। सर्वथा आन असेना।।** (ए. भा. ५/३५९) प्रेमस्वरूपाने हरिकीर्तन केले म्हणजे हृदयामध्ये श्रीहरी प्रकट होतो. **कीर्तन हे श्रेष्ठ भक्तिसाधनामध्ये मोडते. तरी कीर्तनाचेनि नटनाचे। नाशिले व्यवसाय प्रायश्चित्तांचे।। जे नामचि नाही पापाचे। ऐसे केले।।** (ज्ञाने.- ९/१९७) कीर्तनामध्ये जेथे माझा नामघोष चालतो, तेथेच मी असतो, असे भगवंत सांगतात. साधकाने कृष्ण, विष्णू, हरी, गोविंद या नामाचा जयघोष करावा. कीर्तनामुळे पाप नाहीसे होत असते. संत तुकाराम कीर्तनभक्तीचे महत्त्व सांगतात. श्री देवर्षी नारद हे कीर्तनभक्तीचे आद्य प्रवर्तक आहेत. महाराष्ट्रातील सर्व संतांच्या मांदियाळीने या भक्तीचा प्रसार व प्रचार केला आहे. अव्याहत हे कार्य चालू आहे. टाळमृदंगाच्या तालावर ही मंडळी स्वतःला विसरून भक्तिरूप ब्रह्मरसाचे सेवन करतात. **संत नामदेवांनी तर प्रतिज्ञाच केली होती नाचु कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।।** (संत नामदेव गाथा- अ. १३९२) विष्णुस्मरण विष्णुस्मरणाने विघ्नांचा नाश होतो व संकटे पळून जातात. इच्छित फळ प्राप्त होते. संत रामदासांनी दासबोधामध्ये सांगितले आहे. **नामे संकटे नासती। नामे विघ्ने निवारती।। नामस्मरणे पाविजेती। उत्तम पदे।।** (दासबोध) **पादसेवन ही चौथ्या प्रकारची भक्ती आहे. पादसेवने अक्रुर झाला ब्रह्मरूप । प्रत्यक्ष स्वरूप गोविंदाचे ।।** (ज्ञाने. गाथा अ. ७१२) पादसेवन म्हणजे काया, वाचा, मनाने सद्गुरूची सेवा करणे होय. या भक्तीने अक्रुरास आत्मसाक्षात्कार झाला आहे. अर्चन शास्त्रोक्त पद्धतीने काया, वाचा, मनाने इष्ट देवतेची पूजा करणे म्हणजे अर्चन भक्ती होय.

वंदन वंदन करणे म्हणजे भावपूर्ण नमस्कार करणे. नवविधा भक्तीचा हा सहावा महत्त्वपूर्ण प्रकार आहे. संत एकनाथांनी वंदन भक्तीचे महत्त्व असे स्पष्ट केले आहे. **सकळ तीर्थी तोचि न्हाला। जपतपादिफळे तोचि लाहिला।। सर्व पुजांचे सार तो पावला। जेणे साधु वंदिला सन्माने।।** (ए. भा. ११/१२००) नमस्कार केल्याने महादोष जातात, नमस्काराने अन्याय होत नाहीत. नमस्कारामुळे समाधान प्राप्त होते. त्यासाठी साधू, संत, सज्जन, आई-वडील यांना वंदन करावे. भावपूर्ण नमस्कार करावा. दास्यभक्ती दास्यत्व हनुमंते केले। म्हणोनी देखिले रामचरण (ज्ञाने. गाथा अ. ७१२) हनुमंतरायांनी केलेली दास्यभक्ती ही सर्वश्रेष्ठ आहे. म्हणूनच ते श्रीरामप्रभूंच्या एवढे निकट व प्रिय होते. तन-मनाने सेवा करणे, अगर्वता धारण करून दास्य स्वीकारून सेवक म्हणून राहणे म्हणजेच दास्यभक्ती होय. त्यामुळेच ज्ञानप्राप्ती होत असते. संत ज्ञानेश्वरांनीही सेवेचे महत्त्व सांगितले आहे. तरी सख्यभक्ती सखाभाव, मित्रत्व भावाने सख्यभक्ती केल्यास, परमेश्वराशी जवळीक साधल्यास देव सोयरा होत असतो. परमेश्वराशी प्रेमाचे नाते जोडण्याचे भाग्य या भक्तीमुळे प्राप्त होते. **सख्यपणे अर्जुन नरनारायण। सृष्टी जनार्दन एकरूप।।** (ज्ञाने. गाथा अ. ७१२) आत्मनिवेदन परमेश्वराशी आत्मसमर्पण करावे व हितगुज करावे. त्यामुळे परमपद प्राप्ती होते. संत तुकाराम आत्मनिवेदन भक्तीबाबत सांगतात, **लवण मेळविता जळे। काय उरले निराळे।। तैसा समरस झालो। तुजमाजी हरपलो।। अग्नीकर्पूराच्या मेळी। काय उरली काजळी।। तुका म्हणे होती। तुझी माझी एक ज्योती।।** (तु. गा. ३७७२) **तुज मज नाही भेद। केला सहज विनोद।। तु माझा आकार। मी तो तुची निर्धार।। मी तुजमाजी देवा। घेसी माझ्या अंगे सेवा ।। मी तुजमाजी अचळ । मजमाजी तुझे बळ ।। तु बोलसी माझ्या मुखे । मी तो तुजमजी सुखे ।। तुका म्हणे देवा । विपरीत ठायी नावा ।।** (तु. गा. ३७७३) नवविधा भक्तीमध्ये ज्या नऊ साधन प्रकारांचा समावेश होतो, त्यामध्ये श्रवण, कीर्तन आणि स्मरण यांचा संबंध ईश्वरनामोल्लेखाशी असल्यामुळे ईश्वराप्रती श्रद्धा आणि विश्वास घनिष्ठ होण्यासाठी होतो. पादसेवन, अर्चन, वंदन या साधनांचा ईश्वराच्या साकार स्वरूपाशी संबंध असल्याने त्याचा उपयोग चित्तशुद्धीसाठी होतो. त्याद्वारे सगुण साक्षात्कार होतो. हे क्रियात्मक भक्तीचे प्रकार आहेत. दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन या तीन साधनांचा संबंध भक्तांच्या भावनेशी आहे. त्यांना प्रेमभक्तीचे विशेष अंग मानले जाते.

सिनेजगत

देवेंद्र प्रभुणे

# जिंदगी देनेवाले सुन... रुपेरी कारकीर्द, डॉक्टरांची !

भारतात परंपरागत आयुर्वेद व सिद्ध या दोन प्राचीन उपचार पद्धती विद्यमान आहेत. संपूर्णतः शास्त्रशुद्ध व कोणत्याही दुष्परिणामाविना असलेल्या या रोगोपचार पद्धती केवळ रोग- निदानच करत नाहीत तर मनुष्यमात्रास निरोगी जीवनशैलीसही उद्युक्त करतात. अर्थात 'पिकते तिथे विकत नाही' व 'घर की मुर्गी दाल बराबर' या न्यायाने या उपचार पद्धतींना फारसे महत्त्व न देण्याची वृत्ती १९ व्या शतकातील आंग्लविद्याविभूषित सरकारधार्जिण्या वर्गात बोकाळली.

इंग्रजांनी मोठ्या चातुर्याने जसा भारतात इंग्रजी शिक्षणाचा प्रादुर्भाव केला तसाच आंग्लवैद्यकाचाही मोठ्या खुबीने भारतात प्रचार व प्रसार करण्याचे ठरवले. बघता बघता, आंग्ल-वैद्यकीय शिक्षण व उपचार पद्धतीने भारतात श्रेष्ठत्व प्राप्त करण्यास प्रारंभ केला. १८३५ सालीच कलकत्ता व मद्रास येथे १८४५ साली मुंबई येथे औपचारिक व साचेबद्ध आंग्ल-वैद्यकीय शिक्षणासाठी वैद्यकीय महाविद्यालयांची स्थापना झाली. या महाविद्यालयातून शिकून बाहेर पडलेल्या शिष्ट व स्वतःला श्रेष्ठ समजणाऱ्या डॉक्टरांनी आंग्ल-वैद्यकाभोवती श्रेष्ठत्व व परिपूर्णतेचे वलय निर्माण केले. डॉक्टर हे भारतीय समाजात सर्वोच्च मान, आदर व प्रतिष्ठाप्राप्त व्यवसायी ठरले ते आजतागायत!









अर्थात, यामागे आंग्ल-वैद्यकाने साधलेली प्रगती, औषध निर्माण शास्त्रात झालेली क्रांती, आधुनिक शल्यक्रिया साधने, रोगनिदान व विकृती शास्त्रातील अतुलनीय प्रगती अणि डॉक्टरांची बुद्धिमत्ता, अभ्यास व श्रम हे कारणीभूत आहेत. भारतात वैद्यकीय व्यवसाय हा 'पवित्र व्यवसाय' म्हणूनच मानला जातो व डॉक्टरांना 'प्रतिदेव' म्हणून मानण्याची भारतीयांची वृत्ती आहे. 'डॉक्टर हे समाजाच्या बहुसंख्य वर्गास वंदनीय व अनुकरणीय वाटतात, हे निर्विवाद..!' या भावनेचे व वृत्तीचे प्रतिबिंब भारतीय चित्रपटसृष्टीत अगदी प्रारंभापासूनच पडलेले आढळून येते. बोलपटांचा प्रारंभ झाल्यानंतर डॉक्टरांचा महिमामंडण करणरा पहिला हिंदी चित्रपट होता 'दुश्मन' (१९३९). तत्कालीन व्हाईसरॉय लिनलिथगो यांनी क्षयरोग निर्मूलन योजनेचा प्रभावी प्रचार करण्यासाठी या चित्रपटाची निर्मिती विशेषरूपाने करवून घेतली. या चित्रपटात पृथ्वीराज कपूर यांनी डॉक्टरची तर गायक-अभिनेता कुंदनलाल सेहगल यांनी क्षयरोग्याची भूमिका केली होती. डॉक्टरांची खरी आवश्यकता ग्रामीण भागातच आहे व नुसते रोगोपचार महत्त्वाचे नाहीत तर स्वच्छता आणि आरोग्यदायी सवयीदेखील तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत, हे ठसवणारा पहिला चित्रपट म्हणजे 'डॉक्टर' (१९४१) हा हिंदी व बंगाली द्विभाषी चित्रपट.

लोकोत्तर गायक पंकज मलिक यांनी या चित्रपटात डॉक्टरची भूमिका समरसून वठवली होती. (हाच चित्रपट १९७७ साली 'आनंदआश्रम' नावाने पुनःनिर्मित करण्यात आला.) पण, डॉक्टरांची सेवा व समर्पण लक्षणीयरीत्या प्रेक्षकांसमोर मांडणारा चित्रपट होता तो 'डॉक्टर कोटणीस की अमर कहानी' हा १९४६ सालचा चित्रपट. डॉ. द्वारकानाथ कोटणीस (सोलापूर) यांनी द्वितीय महायुद्धात चीनमध्ये केलेल्या स्पृहणीय वैद्यकीय सेवेस आदरांजली म्हणून हा चित्रपट चित्रमहर्षी व्ही. शांताराम यांनी निर्माण केला होता. स्वातंत्र्योत्तर काळात हिंदी चित्रपटांमध्ये डॉक्टर या व्यक्तिरेखांचे दोन ठसठशीत उपप्रकार दृष्टिगोचर होऊ लागले. पहिला उपप्रकार म्हणजे सेवा व समर्पण या मूल्याधारित 'पवित्र पेशा' प्राणपणाने जपणारे तत्त्वनिष्ठ डॉक्टर्स तर दुसरा उपप्रकार म्हणजे केवळ प्रतिष्ठा, मानसन्मान व धन यांच्यासाठी फारसा विधिनिषेध न बाळगणारे शिष्ट डॉक्टर्स.

चित्रपट हे व्यापक जनजागृतीचे सर्वात प्रभावी माध्यम असल्यामुळे 'आह' (१९५३) चित्रपटाच्या नायकाचा क्षयरोगाने झालेला मृत्यू बदलवून तो रोगमुक्त झाला आहे, असा करण्यात आला होता. १९५० च्या दशकात क्षयरोग हा भारतातील सर्वाधिक मृत्यूस कारणीभूत विकार होता व त्यामुळे चित्रपटाद्वारे क्षयरोग निर्मूलनाचा प्रचार करण्यात आला होता. प्राण या चित्रपटात डॉ. कैलास या सकारात्मक भूमिकेत दिसले होते. १९६० सालच्या 'अनुराधा' चित्रपटात सेवेच्या नादात आपल्या कलावंत पत्नीच्या कलाकौशल्यावर अन्याय केलेल्या सेवाभावी डॉक्टर निर्मल चौधरींची भूमिका बलराज साहनी यांनी तन्मयतेने साकारली होती. याचवर्षी आलेल्या 'दिल अपना और प्रीत परायी' या चित्रपटात डॉक्टर व परिचारिका यांच्या प्रेमकथेत आलेल्या दुराव्याचे चित्रण होते. अर्थात, यात डॉक्टर झालेला राजकुमार डॉक्टरचा व्यवसाय करताना फारसा आढळत नाही. १९६३ साली आलेल्या 'दिल एक मंदिर' चित्रपटात पूर्व-प्रेमिकेच्या पतीची कर्करोगाची शस्त्रक्रिया करण्यासाठी केलेल्या अविश्रांत कष्टाने व आलेल्या मानसिक ताणाने शस्त्रक्रियेनंतर लगेचच मृत्यू पावणाऱ्या डॉक्टरची अतिरंजित कथा चितारली होती. अर्थात, मीनाकुमारी व राजकुमार यांचा उत्तम अभिनय आणि शंकर-जयकिशन यांचे मधुर संगीत लक्षणीय होते.

'द सिटाडेल' या ए. जे. क्रॉनिन लिखित इंग्लंडमधील कोळसा खाणी व त्यातील कामगारांचे वैद्यकीय प्रश्न यांचा ऊहापोह करताना वैद्यकीय व्यवसायाची नीतिमत्ता व वैयक्तिक शुचिता यांचा प्रभावी छेद करणाऱ्या कादंबरीवर आधारित विजय आनंद दिग्दर्शित 'तेरे मेरे सपने' (१९७१) या चित्रपटात ग्रामीण भारतातील वैद्यकीय व्यवसाय आणि समाज जीवन अतिशय प्रामाणिकपणाने रंगवले होते. देव आनंदने रंगवलेला डॉ. आनंदकुमार व विजय आनंदने साकारलेला डॉ. जगन्नाथ कोठारी विशेष उल्लेखनीय! पण, डॉक्टर आणि रुग्ण यांच्या परस्पर संबंधातून वैद्यकीय व्यवसायातील आव्हाने, अपप्रवृत्ती व एकंदरीत जीवनावर भाष्य करणारा प्रभावी व लोकप्रिय चित्रपट म्हणजे 'आनंद' (१९७१)! अमिताभ बच्चनने रंगवलेला संवेदनशील, निष्ठावान व गंभीर डॉक्टर व त्याला काटछेद देणारा संपूर्ण धंदेवाईक डॉक्टर प्रकाश कुळकर्णी (रमेश देव), वैद्यकीय व्यवसायाचे यथार्थ चित्र उभे करतात.

(पान ६ वर)

# ध्यास नवनिर्मितीचा; सुख संपन्नतेचा!

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

**१.** १७ डिसेंबर १९०३ रोजी अमेरिकेतील नॉर्थ करोलिना मैदानावर लोकांची गर्दी जमली होती. कारण हवेपेक्षा जास्त वजन असूनही एक यंत्र राईट बंधूंनी तयार केलं होतं; त्याचा उड्डाणाचा हा पहिला प्रयोग होता. लोक म्हणाले ते उडणार नाही. पण जेव्हा ऑलिव्हरचा छोटा भाऊ विल्बरने उडवले तेव्हा त्यांच्या फ्लायरने सकाळी १०.३० वाजता १२ सेकंदात १२० फूट अंतराचे आधुनिक जगातील पहिले उड्डाण केले. त्यांचे फक्त सायकल दुरुस्तीचे दुकान होते. मोठा माध्यमिक शाळेत तीन वर्षे तर छोटा चार वर्षे शिकला होता. दोघांनी नवनिर्मितीचा ध्यास घेऊन फक्त सहा वर्षांत ते विमान तयार केले. त्यांनी एकूण १९२० प्रयोग केल्यानंतर वयाच्या ३६ व ३२ व्या वर्षी त्यांना हे यश मिळाले.


**२.** त्याला बालपणापासूनच चित्रकलेची आवड होती. त्याचे आई-वडील कामाच्या शोधात अमेरिकेत विविध ठिकाणी फिरून मिळेल ते काम करत शिकागो येथे स्थायिक झाले. हायस्कूलमध्ये



दिवसाच्या शाळेत तर रात्रीच्या वेळी शिकागो आर्ट इन्स्टिट्यूटमध्ये तो चित्रकला शिकला. त्याच्या शाळेच्या वार्तापत्राचा तो लोकप्रिय व्यंग्यचित्रकार होता. ही गोष्ट आहे विश्वप्रसिद्ध अनेक ऑस्कर पुरस्कार विजेते अमेरिकन चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, पटकथालेखक, ध्वनिअभिनेता, रेखाचित्रकार आणि उद्योजक वॉल्ट डिस्ने यांची! वयाच्या १६ व्या वर्षी शिक्षण बंद पडल्याने वॉल्टने सैन्यात जाण्याचे ठरविले, पण वय त्या कामाच्या आड आले. मग आपल्या काही मित्रांसह 'रेड क्रॉस'मध्ये फ्रान्स येथे रुग्णवाहिकेचे चालक म्हणून ते रुजू झाले. परंतु नट होणे किंवा वृत्तपत्रात व्यंग्यचित्रकार म्हणून नोकरीस त्यांची पसंती होती म्हणून ती नोकरी सोडली.

वॉल्ट यांचे भाऊ रॉय यांनी प्रयत्न करून पेस्मेन-रुबीन आर्ट स्टुडिओमध्ये जाहिरात विभागात वॉल्ट यांना नोकरी मिळवून दिली. येथेच वॉल्ट आणि आयवर्क्स यांची मैत्री जमली. पेस्मेनरुबीन आर्ट स्टुडिओ लवकरच बंद पडला आणि त्यांनी जानेवारी १९२० मध्ये 'आयवर्क्स-डिस्नी कमर्शियल आर्टिस्ट्स' नावाची स्वतःची संस्था सुरू केली. पण आर्थिक अपयशाने ही संस्था सोडून वॉल्टने पुन्हा नोकरीचा मार्ग धरला. आयवर्क्सला एकट्याला व्यापार जमेना म्हणून तेही वॉल्ट यांच्या मागोमाग 'कॅन्सास सिटी फिल्म ॲड कंपनी' मध्ये दाखल झाले. या नोकरीत दोघांनी ॲनिमेशन विषयातले सर्व बारकावे जाणून घेतले. या प्रशिक्षणाच्या जोरावर आयवर्क्स-डिस्नी या जोडीने आपला व्यवसाय पुन्हा सुरू केला.

'कॅन्सास सिटी फिल्म ॲड कंपनी'मधल्या अनेकांना त्याने आपल्याकडे नोकरीत घेतले. वॉल्ट डिस्ने आणि आयवर्क्स यांची पहिली मालिका 'लाफ-ओ-ग्राम्स' सुरू झाली. ही मालिका प्रदर्शित झाल्याबरोबर खूप गाजली. पण धंद्याचा अनुभव कमी पडल्याने याहीवेळी स्टुडिओ बंद करावा लागला. या अनिश्चित व्यापाराला कंटाळून डिस्नी आणि आयवर्क्स हॉलिवूडमध्ये गेले. रॉय डिस्नेच्या आर्थिक मदतीने 'डिस्ने ब्रदर्स' नावाची संस्था जन्माला आली. ठिकाणीच अनेक गाजलेल्या व्यंग्यचित्र मालिका तयार झाल्या. त्यातील विशेष गाजली ती 'ओस्वाल्ड - द रॅबिट' नावाची मालिका. मालिका गाजली तरीही काळाची मागणी चलचित्रची म्हणजे




ॲनिमेशनची असल्याने धंदा पुन्हा एकदा बंद करावा लागला. यावेळी डिस्ने आणि आयवर्क्स यांनी सुप्रसिद्ध युनिव्हर्सल पिक्चर्सशी एक करार केला. त्याप्रमाणे ओस्वाल्डची दुसरी मालिका सुरू करण्यात आली. तीही मालिका गाजली. केलेला करार मोठ्या कंपनीच्या बाजूचा असल्याने मालकी हक्क डिस्ने आणि आयवर्क्स यांच्याकडे नव्हते. वॉल्ट डिस्ने यांनी आपल्याच स्टुडिओत नवी चित्रमालिका तयार करण्याचे ठरविले.

१९२५ साली वॉल्टचा विवाह व्यंग्यचित्रकार लिलियन बाऊण्ड्स यांच्याशी झाला. डिस्ने दाम्पत्य आणि आयवर्क्स यांनी नव्या जोमाने आपल्या स्टुडिओत पुन्हा कामाला सुरुवात केली. वॉल्ट यांनी कॅन्सास स्टुडिओत सहज म्हणून काढलेले उंदराचे चित्र घेतले; त्याला लिलियनने 'मिकी माऊस' हे नाव दिले. हे पात्र पुढे खूप लोकप्रिय झाले. मिकीचा आवाज स्वतः वॉल्ट डिस्नी यांचाच आवाज होता. मिकीचा पहिला मूक चित्रपट Plane Crazy तयार झाला. या काळापर्यंत मूकपटांची मागणी कमी होत गेली होती, त्यामुळे प्लेन क्रेझी सपशेल आपटला.

१९२८ साली मिकी माऊसचा पहिला ॲनिमेटेड बोलपट 'स्टीमबोट विली' प्रदर्शित झाला. या चित्रपटाने नवीन विक्रमप्रस्थापित करत इतिहासात आपले नाव अजरामर करून ठेवले. यानंतर डिस्ने आणि आयवर्क्स यांनी एकामागे एक सरस चित्रपटांची मालिका काढली. त्यातील सर्वच चित्रपट अतिशय गाजले. आता कंपनीचा चांगलाच जम बसला, त्यांना पैसा आणि जागतिक प्रसिद्धी मिळू लागली. डिस्ने हे पूर्णपणे व्यावसायिक होते तसेच ते द्रष्टेही होते. त्यांनी फार पूर्वी केलेली एका विशाल करमणूक केंद्राच्या निर्मितीची कल्पना त्यांच्या मनात होतीच. हा नवा विचार कृतीत आणण्याचे त्यांनी ठरविले तसेच दूरचित्रवाणीचे आगमन होत असल्याने लोकप्रिय चित्रमालिका त्यावर सादर करण्याचे विचारही त्यांच्या मनात येऊ लागले. सतत नवनिर्मितीचा ध्यास सवय असल्यामुळे हळूहळू 'डिस्ने लॅण्ड' रंगारूपास येऊ लागले. या भव्य-दिव्य प्रकल्पासारखा दुसरा प्रकल्प जगात अन्यत्र कुठेही असू नये, असे वॉल्ट डिस्ने यांना वाटत होते. खरे तर पूर्णपणे काल्पनिक व प्राणिसदृश पात्रांसाठी कुणी पैसा खर्च करून पाहावयास येतील का? पण यासाठी बँक ऑफ अमेरिकेने कर्ज मंजूर केले. कारण नवनिर्मिती करून यशस्वी होऊ शकतो, असा विश्वास डिस्ने यांनी निर्माण केला होता. आज डिस्ने वर्ल्डला दरवर्षी ५२ दशलक्षांहून अधिक लोक भेट देतात. सरासरी दररोजची उपस्थिती सुमारे ५२,९६४ एवढी प्रचंड असते. डिस्ने वर्ल्डचा आतापर्यंतचा सर्वात व्यस्त दिवस ३१ डिसेंबर २०१९ रोजी होता; त्या दिवशी २ लाख ५० हजार अतिथींची उपस्थिती होती. वॉल्ट डिस्ने यांना सतत नवीन प्रयोग व निर्मिती करण्याच्या ध्यासामुळे प्रसिद्धी, पैसा, समाधान सर्वच मिळाले. ५९ नामांकनांमधून २२ पुरस्कारांसह एखाद्या व्यक्तीने जिंकलेल्या सर्वाधिक अकादमी पुरस्कारांचा विक्रम डिस्ने यांच्याच नावावर आहे. पूर्ण पुरस्कारांची यादी येथे देऊ शकत नाही.


**३.** भारतात जेव्हा पोशाखी चित्रपटांची भरमार होती व फक्त मर्यादित कथाबीज, छायाचित्रण तंत्र व चित्रपट संगीत यावर बेतलेले चित्रपट येत होते; तेव्हा वयाच्या २१ व्या वर्षी राज कपूर यांनी स्वत:ची आर. के. फिल्मस कंपनी काढून अतिशय संवेदनशील व मधुर संगीत असलेले आणि कृष्ण-धवल चित्रपटाचा काळ असूनसुद्धा सुंदर- वेधक छायाचित्रण असलेले चित्रपट तयार केलेत. त्यांच्या 'बरसात'मधील लता-मुकेश यांनी गायलेल्या व शंकरजयकिशन यांच्या संगीताने सजलेल्या गाण्यांनी समाजमनावर मोहिनी घातली. पुढे नवनिर्मितीचा ध्यास असलेल्या राज कपूर यांनी त्यांच्या 'आवारा' चित्रपटात सुंदर नेपथ्य असलेली व प्रथमच स्वप्नजगाची अनुभूती देण्यासाठी ढगांचा आभास करून देणारे गाण्याचे चित्रण करून चित्रपटभक्तांना मेजवानी दिली तसेच नवनिर्मितीचा ध्यास पुढे नेत प्रथमच लंडन, पॅरिस, स्वित्झर्लंडमधील लोकेशनमध्ये नेत्रसुखद व अद्भुत रंगीत छायाचित्रण केले. तोपर्यंत कुणीही परदेशात जाऊन चित्रण केले नव्हते. संगीत व छायाचित्रण याशिवाय विविध प्रकारच्या कथाबीजांवर चित्रपट यशस्वी केलेत. उदा. जागते रहो, जिस देश में गंगा बहती है, बूट पॉलीश, श्री ४२०, फिर सुबह होगी, सत्यम् शिवम् सुंदरम व मेरा नाम जोकर यांसारखे वेगळ्या धाटणीच्या चित्रपटांची निर्मिती केली. त्यातील 'मेरा नाम जोकर' या चित्रपटासाठी त्यांनी आपले तन- मन-धन पूर्ण पणाला लावले होते,



पण सुरुवातीला तो चालला नाही. आज तोच चित्रपट एक मास्टरपीस म्हणून सर्वमान्य आहे. 'मेरा नाम जोकर' आर्थिकदृष्ट्या अयशस्वी झाल्यामुळे त्यांच्यावर प्रचंड कर्ज वाढले. तेव्हा पुन्हा त्यांच्यातील नवनिर्मितीचा गुण त्यांच्या मदतीला आला. त्यांनी एकदम नवीन अभिनेते व टीम वापरून 'बॉबी' चित्रपटाची निर्मिती केली. तो अफाट यशस्वी झाला. त्यामुळे त्यांचे पूर्ण नुकसान भरून निघाले. हे सगळे त्यांना शक्य झाले, कारण त्यांना चित्रपट-निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या संपादन, संगीत, अभिनय, दिग्दर्शन, छायाचित्रण, कथा, पटकथा, संवाद व इतर सर्वच तांत्रिक बाबींची सखोल जाण होती. नवीन निर्मितीला आवश्यक उत्साह व येणाऱ्या अडचणींना तोंड देण्याची हिंमत होती. सामान्य माणसाला नायक बनवून त्या माध्यमातून त्यांनी आपल्याला जे सांगायचे आहे ते सांगितले. आजही त्यांचे चित्रपट देश-विदेशातील विविध चित्रपट महोत्सवांत दाखविले जातात, याचे कारण हेच आहे. भारतातच नव्हे, तर रशियात, मध्यपूर्वेतील देशात, आशियात त्यांचे चित्रपट प्रचंड लोकप्रिय होते. १४ डिसेंबरला त्यांच्या जन्माला १०० वर्षे पूर्ण झालीत. नवनिर्मितीने वैयक्तिक, व्यावसायिक व सामाजिक संपन्नता कशी लाभते? खरे तर आधी माणूस जंगलात, गुहेत किंवा झाडाच्या ढोलीत राहत होता.

आज आपण आपल्या भोवती जी प्रगती झालेली पाहतो ती माणसाने सदैव नवनिर्मितीचा ध्यास घेऊन केलेल्या मेहनतीचेच फळ आहे. भारतातील वातावरणानुसार एका वर्षात वसंत, ग्रीष्म, पावसाळा आणि हिवाळा या चार ऋतूंचे चक्र आपण पाहतो. यात उत्पत्ती, स्थिती व लय असे तीन बदल होतात. म्हणजेच बदल हा निसर्गाचा आणि सर्व वनस्पती आणि प्राण्यांच्या जीवनाचा स्थायीभाव आहे. त्यात नवीन निर्मिती अत्यावश्यक आहे. पेन, पेपर, प्लेन, पिन, पियानो, कारपर्यंत कुठल्याही उत्पादनांच्या कंपनीला अस्तित्व टिकविण्यासाठी सतत नवीन उत्पादने आणावी लागतात. सगळ्याच बाबतीत 'जुनं ते सोनं' नसतं. जे लोक त्यांच्या रोजच्या जीवनात अन्नपचनाशिवाय दुसरी कुठलीही नवीन निर्मिती मनाने किंवा शरीराचा उपयोग करून करीत नाहीत, त्यांना मानसिक किंवा शारीरिक आजारांना तोंड द्यावे लागते.

(पान ६ वर)



## मौनचि सारथी । रामकृष्ण ।।

आकळेना काही । खेळ या दैवाचा ।।
म्हणूनी जीवाचा । कोंडमारा ।।१।।

बोलणे वागणे । स्वार्थाचे सोयरे ।।
विपरीत सारे । उमजेना ।।२।।

मनाचा आक्रोश । अनाथ हुंदका ।।
उभा जन्म मुका । आज झाला ।।३।।

प्रारब्धाचे ऋण । फेडणे चूकेना ।।
कर्माची ही दैना । सोसवेना ।।४।।

नको बोल ऐसा । दुषणांचा माथी ।।
मौनचि सारथी । रामकृष्ण ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## आर्जव

याहून दूजे तुला काय मागू,
तुझे नाम ओठी अता राहु दे अज्ञान अंधार सारा मिटू दे,
तुझे रूप चित्ती सदा राहु दे आयुष्य संपून गेले कसे रे,
जरा ही मला भान ना राहिले
डोळ्यास माझ्या दिसे अंत स्वामी,
जरा दाव आता तुझी पावले..
बाल्यात खेळात बेधुंद झालो,
जराही न चिंता कधी वाटली तारुण्य कैफात नासून गेले,
भीतीची न छाया मनी दाटली वार्धक्य आले असे हे कसे रे,
जणू जायबंदी अता जाहलो दृष्टीस माझ्या दिसे पैल आता,
तुझ्या पूजनाला उभा राहिलो..
कार्यात होतो सदा मग्न मी रे,
कधीही न मी कीर्तनी रंगलो स्वार्थांध
मी काय बोलू विधात्या, न नामात होतो कधी दंगलो
सोडून गेले सगे सोयरे ते, जरा दुःख येता सुखाच्या सवे
ओढून घे तू मला काळजाशी,
करू मी अताशा किती आर्जवे..

देवेंद्र जोशी

## शांततेचा ध्वनी

भोवतालचा मिट्ट काळोख उघड्या डोळ्यांनी बघावा,
मनातले काहूर शांत होईतो बसून राहावे,
गतायुष्यातील रणकंदन त्याच्या खुणा,
उमटलेल्या अंतर्मनावर कुठलीशी सल
राहून गेलेली विचार आणि आठवणी विरत जाव्यात
हळूहळू समर्पित व्हावे शांततेला, काही काळ...
आणि साठवावा मनात शांततेचा ध्वनी..

डॉ. रमेश जलतारे

# खाद्यतेलांचा दणका; रोजगारवाढीचा डंका

अर्थोद्योग
महेश देशपांडे

वेगवान आर्थिक घडामोडींमुळे सरता आठवडा चर्चेत राहिला. सणासुदीनंतरही खाद्यतेलाचा तडका कायम असल्याचे या काळात दिसून आले. गेल्या काही काळात म्युच्युअल फंडांमध्ये घसरण तर एसआयपीमध्ये वाढ दिसून आली. दरम्यान, नवीन वर्षात रोजगाराच्या संधी वाढणार असल्याचे निरीक्षण काही तज्ज्ञांनी नोंदवले.

सणासुदीच्या काळात खाद्यतेलाच्या किमती वाढल्यानंतर नोव्हेंबरमध्येही ग्राहकांना दिलासा मिळालेला नाही. किरकोळ बाजारात सोयाबीन तेलाचा भाव १६०-१७० रुपये प्रतिलिटरवर पोहोचला आहे. सणासुदीच्या काळात खाद्यतेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली होती. या काळात ऑक्टोबरमध्ये पामतेलाच्या किमतीत ३७ टक्क्यांनी वाढ झाली. त्याचप्रमाणे मोहरीचे तेल २९ टक्के, सोयाबीन तेल २३ टक्के, सूर्यफूल तेल २३ टक्के आणि शेंगदाणा तेल चार टक्क्यांनी महागले आहे. सणांनंतर खाद्यतेलाच्या किमती कमी होतील, असे मानले जात होते; परंतु नोव्हेंबरमध्ये दरात कोणताही दिलासा मिळाला नाही. सरकारी सूत्रांचा हवाला देत एका अहवालात खाद्यतेलाच्या किमतीत वाढ होण्याच्या कारणांवर कोणतेही नियंत्रण नसल्याचे म्हटले आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर खाद्यतेलाच्या किमती वाढत आहेत. तसेच, आग्नेय आशियातील पाम तेलाचा हंगाम कमजोर राहिला आहे. सरकारने अद्याप आयात शुल्क कमी करण्याचा निर्णय घेतलेला नाही. देशांतर्गत शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी सरकारने खाद्यतेलाच्या आयातीवर शुल्क वाढविले होते. देशात तेलबिया पिकांना प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने १४ सप्टेंबर रोजी कच्च्या आणि शुद्ध खाद्यतेलावरील आयात शुल्कात वाढ केली होती. क्रूड पाम, सोयाबीन आणि सोयाबीन तेलावरील शुल्क ५.५ टक्क्यांवरून २७.५ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आले आहे, तर रिफाइंड तेलावरील शुल्क १३.७ टक्क्यांवरून ३५.७ टक्के करण्यात आले आहे.

ऑक्टोबरमध्ये सरकारने खाद्यतेलाच्या वाढत्या किमतीवर चिंता व्यक्त केली होती. यानंतर विविध मंत्रालयांमध्ये वाढत्या आयात शुल्काच्या परिणामांवर चर्चा करण्यात आली आणि ग्राहकांना दिलासा देण्यासाठी उपाययोजनांवर विचार करण्यात आला. ऑक्टोबरमध्ये सोयाबीन आणि भुईमूग ही नवीन पिके बाजारात आल्याने तेलाच्या दरात घसरण होईल, असे मानले जात होते; मात्र तसे झाले नाही. भारत आपल्या खाद्यतेलाच्या गरजेच्या ५८ टक्के आयात करतो. पुरवठा स्थिर ठेवण्यासाठी आणि देशांतर्गत बाजाराला जागतिक प्रभावापासून वाचविण्यासाठी सरकार तेलबियांच्या लागवडीला प्रोत्साहन देत आहे. अन्न किंमत निर्देशांक नोव्हेंबरमध्ये सरासरी १२७.५ अंकांवर होता. तो एका वर्षापूर्वीच्या तुलनेत ५.७ टक्के अधिक आहे.

राजकीय बातम्यांनी सरत्या काळात बरेच तरंग उमटवले खरे; पण वेगवान आर्थिक घडामोडींमुळेही सरता आठवडा चर्चेत राहिला. सणासुदीनंतरच्या काळातही खाद्यतेलाचा तडका कायम असल्याचे या सुमारास दिसून आले. गेल्या काही काळात म्युच्युअल फंडांमध्ये घसरण तर एसआयपीमध्ये वाढ दिसून आली. दरम्यान, नवीन वर्षात रोजगाराच्या संधी वाढणार असल्याचे निरीक्षण काही तज्ज्ञांनी नोंदविले.





ऑक्टोबरच्या तुलनेत एफएओ व्हेजिटेबल ऑईल प्राईस इंडेक्स नोव्हेंबरमध्ये ७.५ टक्क्यांनी वाढला.

गेल्या वर्षीच्या तुलनेत यात ३२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. आग्नेय आशियात मुसळधार पावसामुळे पामतेलाच्या किमती वाढल्या. प्रचंड मागणीमुळे सोयाबीन तेलाच्या किमतीत वाढ झाली आहे, तर तुरळक पुरवठा असल्याने इतर तेलांच्या किमतीत वाढ झाली आहे. भारतीय शेअर बाजारात नोव्हेंबरमध्ये मोठ्या घडामोडी पाहायला मिळाल्या.

तेजी आणि घसरणीचे सत्रदेखील दिसून आले. याचा परिणाम म्युच्युअल फंडमधील गुंतवणुकीवर झाला आहे. नोव्हेंबर महिन्यात म्युच्युअल फंडमधील इनफ्लो ७५ टक्क्यांनी घटला. म्युच्युअल फंडच्या सर्व योजनांमध्ये नोव्हेंबर महिन्यात २.३९ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आली. इक्विटी म्युच्युअल फंडमध्ये १४ टक्के घसरण झाली आहे.

इक्विटी म्युच्युअल फंडमध्ये नोव्हेंबरमध्ये ३५ हजार ९४३ कोटी रुपयांची गुंतवणूक आली तर ऑक्टोबर २०२४ मध्ये ४१८८६ रुपयांची गुंतवणूक आली होती. एम्फी (असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड ऑफ इंडिया) च्या आकडेवारीनुसार नोव्हेंबर २०२४ मध्ये एसआयपीद्वारे येणाऱ्या गुंतवणुकीत मोठी वाढ किंवा घट झाली नाही. नोव्हेंबरमध्ये 'एसआयपी'मधून म्युच्युअल फंडमध्ये २५३२० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली तर ऑक्टोबरमध्ये एसआयपी गुंतवणुकीची रक्कम २५३५३ कोटी रुपये इतकी होती. नोव्हेंबरमध्ये ४९.४६ लाख नव्या एसआयपीची नोंदणी झाली तर ऑक्टोबरमध्ये ही संख्या ६३.७० लाख होती. एसआयपीच्या खात्यांची संख्या १०.२३ कोटींवर आहे. ऑक्टोबरमध्ये ती संख्या १०.१२ कोटींवर होती.

'एम्फी'चे सीईओ वेंकट चलासानी यांनी सांगितले की, एसआयपीच्या माध्यमातून देशात दरमहा २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक येत आहे. छोट्या कालावधीत चढ उतार असला, तरी गुंतवणूकदारांचे दीर्घकालीन गुंतवणुकीसाठीचे भविष्यचित्र आणि आर्थिक ध्येय पाहायला मिळत आहे. म्युच्युअल फंडमध्ये दीर्घकालीन गुंतवणुकीबाबतचा गुंतवणूकदारांचा विश्वास दिसून येतो. 'मोतीलाल ओसवाल असेट मॅनेजमेंट कंपनी'चे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर अखिल चतुर्वेदी यांनी 'एम्फी'च्या आकडेवारीवर भाष्य केले आहे. नोव्हेंबर महिन्यात स्थूल अर्थशास्त्रीय कारणे, राजकीय घटना आणि अमेरिकेत अध्यक्षपदाच्या निवडणुकीचा परिणाम यामुळे शेअर बाजारात थोडी तेजी आणि थोडी घसरण पाहायला मिळाली. यामुळे गुंतवणूकदारांनी मोठ्या रकमेची गुंतवणूक करण्याऐवजी वाट पाहण्याचा निर्णय घेतल्याचे दिसले. आता एक सकारात्मक अर्थवार्ता.

नवीन वर्ष भारतीय तरुणांसाठी नवीन भेटवस्तू घेऊन येत आहे. येत्या काही महिन्यांमध्ये अनेक कंपन्यांमध्ये बम्पर भरती होणार आहे. अशा स्थितीत रोजगारासाठी भटकणाऱ्या तरुणांचा शोधही लवकरच संपणार आहे. 'मॅनपॉवर ग्रुप'च्या 'एम्प्लॉयमेंट आऊटलूक सर्व्हे'मध्ये थोडी चांगली माहिती समोर आली आहे. सर्वेक्षणात सहभागी झालेल्या कॉर्पोरेट जगतातील ४० टक्के नेत्यांनी पुढील तीन महिन्यांमध्ये म्हणजे जानेवारी ते मार्च या कालावधीत आपण कंपन्यांमध्ये कर्मचाऱ्यांची संख्या वाढविणार असल्याचे म्हटले आहे. या कालावधीत भारतातील रोजगाराची परिस्थिती जागतिक स्तरावर सर्वात मजबूत असेल अशी अपेक्षा आहे. एकंदरीत जानेवारी ते मार्च या काळात तरुणांना भरपूर संधी मिळणार आहेत. या सर्वेक्षणात देशातील विविध क्षेत्रातील तीन हजारांहून अधिक कंपन्यांचा समावेश करण्यात आला होता.

अलिकडेच जाहीर झालेल्या सर्वेक्षण अहवालानुसार ५३ टक्के कंपन्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्याची योजना आखत आहेत तर १३ टक्के लोकांनी २०२५ च्या पहिल्या तिमाहीमध्ये कर्मचाऱ्यांची संख्या कमी होण्याची भीती व्यक्त केली आहे. ३१ टक्के कंपन्या कोणत्याही बदलाची अपेक्षा करत नाहीत. देशातील महागाईदेखील या वर्षी संभाव्यतः कमी होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे ग्राहक अधिक खर्च करतील आणि देशाचा आर्थिक विकास होईल.

(पान ६ वर)

# 'एका मुंगीचे महाभारत' मधील शैक्षणिक संदर्भ

साहित्य शिक्षण
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

१९४२ च्या चळवळीमुळे थोडा मोकळेपणा आला आणि मुली कॉलेजमध्ये शिकायला येऊ लागल्या असे लेखक म्हणतात. लेखकाने यांत्रिकपणे अभ्यास केला नाही. आर्ट कोर्स कशाला घ्यायचा? असे आज सर्व म्हणतात पण माणूस जेव्हा जाणतेपणाने जगायला सुरुवात करतो तेव्हा त्याला जी मूलभूत प्रश्न पडतात त्याचे उत्तरे देण्यासाठी आर्ट्स इतका चांगला विषय कोणताच नाही असे लेखक म्हणतात. कॉलेजात गेल्यावर दुसऱ्या दिवशी ग्रंथालय कुठे आहे ते लेखकाने पहिल्यांदा शोधून काढले. आणि त्या प्रचंड ग्रंथालयात त्यांना अवांतर वाचनाची हौस भागवता आली त्यांच्यातील लेखक आकारास येऊ लागला. इंग्रजी आणि मराठी साहित्याचा तुलनात्मक अभ्यास त्यांनी त्या काळात केला आणि त्याचे निरीक्षण आपल्या या आत्मकथनात नोंदवलेले आहे.

एमएच्या वर्गात गेल्यावर लेखकाला कॉलेजचा फिलो म्हणून पन्नास रुपये पगार मिळू लागला. ते त्यांच्याच वडिलांच्या नाईट स्कूलमध्ये शिक्षक म्हणून नोकरी करू लागले तिथे त्यांना २५ रुपये पगार मिळू लागला. गाठीला चार पैसे असणे महत्त्वाचा असतं या गोष्टीची जाणीव लेखकाला झालेली होती. त्यामुळे त्यांनी हा पैसा कुठेही उधळपट्टीत घालवला नाही. स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये असलेल्या विद्यार्थ्यांचा कम्युनिस्ट गट होता. या विद्यार्थ्यांची भूमिका लेखकाला चुकीची आणि संधी साधूपणाची वाटायची, त्यांच्यात बौद्धिक मगरूरी आहे असे त्यांना सातत्याने वाटायचे. या मंडळीच्या मनात शिरण्याचा प्रयत्न करत असताना त्यांच्या काही कादंबऱ्यातील पात्र जन्माला आलेले आहेत असे ते सांगतात. शिक्षणाचा काळ हा आपल्यासाठी सप्तमजुरीचा काळ होता असे त्यांना वाटते. साहित्यातील स्वत्वाचा या प्रकरणात लेखकाने जे लिखाण केले त्यात कथा, नवकथा लिहीत असताना त्यांच्या लेखक म्हणून होणार्या व्यक्तिमत्त्वाला कसा आकार मिळाला हे त्यांनी सांगितले आहे.

रेडिओतले दिवस या भागात बुखारी आणि मर्ढेकर या दोन व्यक्तिमत्वांसोबत त्यांचा जवळून संबंध आला. मर्ढेकरांच्या संगतीत साहित्यातील काही पैलू आपल्याला शिकायला मिळतील असे त्यांना वाटू लागले मात्र मर्ढेकर स्वतःच्या विचारात आणि जास्त राहत असत. जेव्हा लेखकाने रेडिओतील नोकरी सोडली तेव्हा लेखक त्यांचा निरोप घेण्यासाठी गेले तेव्हा, ठीक आहे इतक्या साध्या शब्दात त्यांनी ती भेट उरकली.


मर्ढेकरांसारखे अनेक लेखक स्वतःच्या विश्वात गुंग असताना नवीन साहित्यिकांकडे दुर्लक्ष करतात ही बाब आजपर्यंत सुरूच आहे असे दुर्दैवाने म्हणाव असे वाटते. मुंबई सोडून सुरत येथे कॉलेजमध्ये शिकवत असताना आपल्या सहकार्यांचे अनुभव लेखकांनी सांगितले आहे त्यात त्यांचे प्राचार्य, शिकवण्यासाठी पाहिजे त्या प्रमाणात हातोटी न लाभलेला श्याम होस्कोट, यांच्यासह एक गुजराती प्राध्यापक, देसाई नावाचे गुजराती मित्र, अशा लोकांच्या आठवणी त्यांनी सांगितल्या आहेत. पुढे पुन्हा मुंबईत पोद्दार कॉमर्स कॉलेजमध्ये नोकरीसाठी त्यांनी अर्ज केला आणि तेथे ते रूप झाले.

कॉलेजमधील प्राध्यापक स्मार्ट होते, अभ्यासू होते विद्वान होते. कॉलेजमधील एका मुलीसोबत पुढे गंगाधर गाडगीळ यांनी प्रेमविवाह केला. व्यंकटेश माडगूळकर या प्रसिद्ध साहित्यिकाच्या अनेक भेटी कॉलेजमध्ये असताना लेखकाशी होत असत. त्यांनीही मोठ्या भावाच्या मनाविरुद्ध पर जातीतील मुलीशी प्रेमविवाह केला होता. त्यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत देखील नव्हते, असे लेखक सांगतात. मात्र शिक्षणाचा आणि प्रतिभेचा परस्परांशी विशेष संबंध नसतो हे व्यंकटेश माडगूळकर यांच्या साहित्य वरून लक्षात येते. पोद्दार कॉलेज सोबतच पुढे लेखकाने सिडनहॅम कॉलेजमध्ये नोकरी धरली तेथील वातावरण, तिथून प्राध्यापक प्राचार्य यांचे अनुभव त्यांनी बहराचे वर्ष या भागात लिहिले आहेत. त्या काळात अर्थशास्त्रावर विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके म्हणून उपयोगी पडतील अशी तीन पुस्तकं त्यांनी इंग्रजीत लिहिली.

प्राचार्य मुरंजन, प्राध्यापक दिवाण, प्राध्यापक धोंडगे, प्राध्यापक अभ्यंकर, प्राध्यापक नागामीया अशा विविध प्राध्यापकांच्या गुण वैशिष्ठयासह बहराचे वर्ष हा भाग सजलेला आहे. गंगाधर गाडगीळ यांच्या काही कथांमधून अश्लील वर्णन येते अशा विचारातून शिक्षण खात्यातून वर खटला भरण्याचा विचारू सुरू होता. त्याबाबत काय घडले ते सांगितल्यापेक्षा १९५०-५२ च्या काळात आपल्या शिक्षण खात्यातील प्राध्यापक शिक्षक काय लिहित आहेत? त्याबाबत शिक्षण खातं दक्ष असे ही बाब लक्षात घ्यावी लागते.

वादांची रणधुमाळी, मुक्त निर्मितीचा महोत्सव या प्रकरणातून लेखकाने त्यांचे लिखाण, त्यावर होणारे आरोप, त्यातून त्यांनी दिलेले प्रत्युत्तरे इत्यादी बाबत भाष्य केले आहे. लिखाण करत असताना जुन्या पिढीतील स्त्रियांना बहुतेकींना लिहिता वाचता येत नसेल आणि महत्त्वाचे म्हणजे आपल्याला आपल्यासाठी जगायचे असते या कल्पनांना त्यांच्या जीवनात वाव नव्हता असे स्त्री शिक्षणाविषयीचे निरीक्षणे लेखकाने नोंदवलेली आहेत. चौफेर मुशाफिरी या भागात गंगाधर गाडगीळ म्हणतात केवळ 'एकच गोष्ट करत राहून माझं समाधान होत नाही' त्यांच्या या वाक्यातून त्यांना विविध क्षेत्राचे ज्ञान मिळवण्याची लालसा होती हे लक्षात येते.

व्यंकटेश माडगूळकर यांनी मराठा समाजातील मुली बरोबर लग्न केल्यामुळे ग. दि. माडगूळकर फार नाराज झाले होते. याचा उल्लेख गंगाधर गाडगीळ आणि या त्यांच्या आत्मचरित्रात दोन ठिकाणी केला आहे. त्याचबरोबर ग. रा. कामंत या लेखकाने एका सिने अभिनेत्री सोबत लग्न केल्यामुळे गदिमा जास्त नाराज झाल्याचा उल्लेख ते करतात. यावरून लेखकांच्या




मनात जातीयतेच्या भिंती मजबूत उभ्या होते असे दिसते. गंगाधर गाडगीळ यांच्या घराजवळ राहणारे अनेक कुटुंब अशिक्षित अर्धशिक्षित होते. त्यातील अनेक किस्से आणि घटना लेखकाच्या लिखाणाचा विषय झाले. युनिव्हर्सिटीच्या उत्तर पत्रिका हरवून सही सलामत सुटलेले आणि युनिव्हर्सिटीतल्या अनागोंदी कारभारावर स्वतःच कोरडे उडणाऱ्या प्राध्यापकाचा उल्लेखही लेखकाने केला आहे.

शिक्षण क्षेत्रातील अशा वृत्ती प्रवृत्ती शिक्षण क्षेत्रात काम करत असल्यामुळे लेखकाने बारकाईने टिपल्या आहेत. लेखकाच्या पत्नी वासंती गाडगीळ यांनी तुळसा नावाच्या अडाणी मुलीला शिकवण्याच्या प्रसंगाचे वर्णनही लेखकाने या ग्रंथात केले आहे. एकंदरीत एका मुंगीचे महाभारत या ग्रंथातील पहिल्या भागात लेखकाच्या वडिलांच्या शिक्षणापासून, त्यांचे स्वतःचे शिक्षण, प्राध्यापक म्हणून कार्य करत असताना त्यांनी वेगवेगळ्या महाविद्यालयात घेतलेले अनुभव अशा बाबींचा उल्लेख केलेला दिसून येतो.

एका मुंगीचे महाभारतच्या दुसऱ्या भागात परदेशातल एक वर्ष या प्रकरणात लेखकांना अभ्यास वृत्ती देण्याची एक योजना होती ती रॉकफेलर फाउंडेशन ठरवून गंगाधर गाडगीळ यांना दिली. काही काळ कॅलिफोर्नियात स्टॅनफर्ड विद्यापीठ किंवा युनिव्हर्सिटी ऑफ कॉलीफोर्निया या ठिकाणी आणि काही महिने हार्वर्ड विद्यापीठात राहावे आणि दोन वेगवेगळ्या बौद्ध वातावरणात राहून तो अनुभव घ्यावा, हा फार लांबचा विचार ती अभ्यास वृत्ती देणारे फाउंडेशन करत होते. युरोपियन संस्कृतीची लेखकाने त्या ठिकाणी करून घेतली. जर्मनीत लेखक प्राध्यापक आहे असं कळल्यावर लोक त्यांच्याशी फार आदराने वागू लागले. जर्मनी त्याला प्रोफेसर हा त्याच्या विषयाला मोठा तज्ञ आणि संशोधक असतो. अनेक प्राध्यापक नोबेल मिळवतात त्यामुळे जर्मनमध्ये प्राध्यापक आणि शिक्षण क्षेत्रातील लोकांना आदराने पाहिले जाते. देशातून परत आल्यावर मुंबई येथे गाडगीळ परत आले. मुंबईमध्ये राहू लागले त्याचा उल्लेख वादळ आणि नव्या दिशा या प्रकरणात त्यांनी केला आहे. त्यांचा एक भाऊ इंजिनियर झाला, एक कॉमर्स कॉलेजला गेला आणि एक मेडिकलला गेला या तिघांचाही खर्च गंगाधर गाडगीळ करत असतात. त्यांची बहिणही नोकरीला लागलेली होती. सर्व प्रकारचे अनुभव साहित्यात सामावण्याचा प्रयत्न या प्रकरणात लेखकाने आपल्या लिखाणातील पात्र आणि आपल्या सभोवतालचे पात्र यांचा परस्पर पूरक संबंध उलगडून सांगितलेला आहे.

रोझ मथायचे शिक्षण ही कथा सिडनहॅम कॉलेजमधील पारशी मुलीवरून आपल्याला सुचली असे लेखक सांगतात. रूपारेल कॉलेजमध्ये नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी बी. ए. चे वर्ग सकाळी साडेसात वाजता सुरू होत आणि अकरा वाजेपर्यंत संपत असे जेव्हा लेखक राहतात दुपारी कॉलेजमध्ये नोकरी करून शिकणार्यांसाठी सोयी उपलब्ध करून देण्याची विचारसरणी होती हे लक्षात घ्यावे लागते. एका प्रसंगात पंडित जवाहरलाल नेहरू हे कडक शिस्तीचे असून त्यांना कार्यक्रमात उणेदुणे सहन होत नाही, कार्यक्रमाच्या नियोजनामध्ये किंचितही त्रुटी दिसली तर ते आयोजकांवर चिडतात हे माहिती असल्यामुळे गंगाधर गाडगीळ यांनी एका कार्यक्रमासाठी पंडित नेहरू नको त्यापेक्षा राधाकृष्णन यांना बोलवूया असे यशवंतराव चव्हाण यांच्याशी बोलून दाखवले, तेव्हा यशवंतराव चव्हाण म्हणाले, गाडगीळ, असं आमका नको तमका नको, असं कधी बोलू नये, आमका हवा इतकच म्हणावं. या प्रसंगातून यशवंतराव चव्हाण यांनी लेखकाला शिष्टाचाराचे शिक्षणच दिले हे सांगण्याचे तात्पर्य असेल की यशवंतराव चव्हाण यांना शिष्टाचाराचे संकेत माहिती होते आणि ते तेवढ्याच विद्यार्थी वृत्तीने गंगाधर गाडगीळ यांनी स्वीकारले.

नव्या कॉलेजची उभारणी या प्रकरणांमध्ये गंगाधर गाडगीळ प्राचार्य झाले हे सांगत असताना आजच्या काळातील प्राचार्यांची परिस्थिती फार दयनीय झाली आहे असे ते म्हणतात.

सरकारच्या शिक्षण खात्याचा नियंत्रण तसेच तक्ते आणि पत्रके इतके तयार करून पाठवावे लागतात की ते प्राचार्य आहेत की कारकून आहेत असा प्रश्न पडतो सोबतच विद्यार्थी त्यांना जुमानत नाहीत आणि प्राध्यापक देखील त्यांची अवहेलना करतात या शब्दात लेखकाने शिक्षण व्यवस्थेतील हे महत्त्वाची अनागोंदी स्पष्ट केली आहे. मात्र गंगाधर गाडगीळ यांनी प्राचार्य म्हणून काम करत असताना अनेक सकारात्मक निर्णय घेतले. ज्या धनजीभाई यांनी त्यांना प्राचार्य केले त्यांच्याकडून होणार अपमान आहे त्यांनी सहन केला नाही. कॉलेज डे चे स्वरूप त्यांनी बदलून टाकले. कॉलेजमधील मुतारी आणि संडास स्वच्छ असावे असा नियमही त्यांनी घालून दिला होता. त्यांच्या सकारात्मक प्रयत्नातून विद्यार्थ्यांची फक्त संख्या वाढली नाही तर चांगले मार्क मिळवणारे अभ्यासू विद्यार्थी कॉलेजात येऊ लागले. गुजराती माणसाने चालवलेल्या या कॉलेजात बाळासाहेब ठाकरे यांचे भाषण होणे आणि त्यामुळे त्या मंडळीचे नाराजी होणे हे प्रसंग आपली शिक्षण व्यवस्था राजकारणाशी विनाकारण बांधली गेलेली आहे हे सांगण्यास पुरेसे आहेत.

आपल्या मुलांना मराठी भाषा यावी, त्या भाषेतून त्यांनी काही प्रमाणात ज्ञानार्जन करावे, आपले व्यवहार करावे असं वाटत असेल तर फक्त मराठीतून शिका असा आग्रह धरल्यापेक्षा इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषा चांगले येतील अशा प्रकारे शिक्षण दिले पाहिजे असा वेगळा विचार गंगाधर गाडगीळ यांनी मांडलेला आहे.

दुर्दम्य या ग्रंथात लेखकाने लोकमान्य टिळक यांच्या जीवनातील विविध प्रसंगासोबत टिळक आगरकर या समाजसुधारकांचे शिक्षण विषयक विचार उलगडून सांगितल्याचा उल्लेख येतो. फुलला फळलेला संसार या प्रकरणात लेखकाने त्यांची मुलगी कल्पना आणि मुलगा अभिजीत यांच्या शिक्षणाचा चंद्रपासह उल्लेख केलेला दिसून येतो.

एकंदरीत ३८ कथासंग्रह, सहा कादंबऱ्या, सात प्रवास वर्णन, सहा नाटके, सात विनोदी ललित निबंध, सात बाल साहित्य, नऊ समीक्षा संग्रह, दहा संकीर्ण संग्रह, हात भाषांतरित साहित्य याशिवाय शैक्षणिक विषयावरील लिखाणाचे पुस्तके इतका दीर्घ साहित्य निर्मितीचा अनुभव असलेले गंगाधर गाडगीळ यांनी एका मुंगीचे महाभारतमध्ये या आत्मकथनात स्वतःच्या शैक्षणिक जीवनातील अनुभवापासून त्यांच्या जीवन प्रवासातील साहित्यिक, प्राध्यापक आणि प्राचार्य म्हणून घेतलेल्या अनुभवासह त्यांच्या बालपणापासून जीवनाच्या कोणत्या टप्प्यापर्यंतच्या शैक्षणिक अनुभवाचे कोंदण आणि संदर्भ उलगडून सांगितले आहेत. (उत्तरार्ध)

पान १ वरून

## वेगवान घडामोडींचे वर्ष

जगातील तिसरी मोठी महासत्ता बनू पाहणाऱ्या आणि जागतिक अर्थकारणामध्ये दबदबा निर्माण करणाऱ्या भारतातील या बदलत्या स्थितीकडेही जगाचे लक्ष होते. राष्ट्रवाद, ध्रुवीकरण आणि विसंगतीमुळे भारतातील या निवडणुकांकडे जगाचे लक्ष वेधले गेले. २०२३ मध्येच भारत चीनला मागे टाकून जगातील सर्वाधिक लोकसंख्या असणारा देश बनला. त्यामुळे आता या सर्वाधिक विकासदर, सर्वाधिक लोकसंख्या आणि सर्वात मोठा उपभोक्तावर्ग असणाऱ्या देशातील घडामोडींकडे आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अभ्यासकांचे लक्ष राहणार आहे, हे नक्की. २०२४ मध्ये जगभर काही प्रमुख शिखर परिषदा आयोजित केल्या गेल्या. आंतरराष्ट्रीय राजकारण आणि जागतिक घडामोडींमध्ये त्यांचीही दखल घ्यावी लागेल. जसे की, १३ ते १५ जून २०२४ दरम्यान इटलीमध्ये आयोजित झालेल्या परिषदेचा मुख्य भर कृत्रिम बुद्धिमत्ता, हवामानबदल, जागतिक अन्नसुरक्षा आणि आर्थिक पुनर्बांधणी यावर राहिलेला दिसला. त्यामुळेच येत्या काळात चीन आणि रशिया यांच्या वाढत्या प्रभावाला सामोरे जाण्यासाठी जी-७ देशांचे एकत्रित प्रयत्न पाहायला मिळण्याची अपेक्षा आहे. सरत्या वर्षात नाटोच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेली परिषद ९ ते ११ जुलै दरम्यान वॉशिंग्टन डीसी येथे पार पडली. रशिया-युक्रेन युद्धाच्या पृष्ठभूमीवर नाटो देशांमधील संरक्षण आणि सामरिक धोरणांवर यावेळी चर्चा झाली. सरत्या वर्षात संयुक्त राष्ट्रांचीही शिखर परिषद झाली. हवामानबदल, पाणीटंचाई आणि जागतिक शांती प्रस्थापित करण्यासारख्या मुद्यांवरही परिषदेमध्ये भर देण्यात आला. यंदा ११ ते २२ नोव्हेंबर दरम्यान पार पडलेल्या 'सीओपी २९' हवामान परिषदेमध्ये जागतिक हवामान संकटावर तोडगा काढण्यासाठी विविध देशांदरम्यान नवीन धोरणे आखण्याबाबतची चर्चाही लक्षवेधी ठरली. हरित ऊर्जा वापरासाठी निधीचे नियोजन आणि पर्यावरण संवर्धनाचे उपाय हे या परिषदेचे मुख्य मुद्दे होते. एकंदर पाहता २०२४ हे आंतरराष्ट्रीय संबंधांच्या दृष्टीने मोठ्या बदलांचे वर्ष राहिले, असे म्हणावे लागेल. निवडणुका, शिखर परिषदा आणि भू-राजकीय घडामोडी आदींनी जागतिक राजकारणाला नवी दिशा दिली. यातूनच जगभरातील देशांमध्ये सहकार्य, स्थैर्य आणि शांती प्रस्थापित करण्यासाठी अधिक ठोस संवादाची आवश्यकता भासली. आता नूतन वर्षामध्ये यावर उचित कारवाई होईल, अशी अपेक्षा व्यक्त करत सरत्या वर्षाला निरोप देऊ या...

## चाचांचे पत्र हरवले?

मार्च २००८ साली त्यांना अधिकारपत्र देऊन पं. नेहरूंची वैयक्तिक पत्रे आणि कागदपत्रे देण्यास सांगितले होते. मार्च ते मे दरम्यान सुमारे दोन महिने ही कागदपत्रे ५१ पुठ्ठ्याच्या पेट्यांमध्ये वर्गवारी करून ठेवण्यात आली. विशेष म्हणजे, ही सर्व पत्रे इंदिरा गांधी यांनी राष्ट्रीय ठेव्याच्या स्वरुपात तेव्हाच्या नेहरू संग्रहालयास दान स्वरूपात दिली होती. त्यामुळे अशाप्रकारे दान केलेली पत्रे गांधी कुटुंबाने आपल्या ताब्यात ठेवणे योग्य नाही. अर्थात, ही बाब गांधी कुटुंबास माहीत नसेल, असे समजण्याचे कारण नाही. त्यामुळेच ही पत्रे संग्रहालयास परत न करण्यामागे असे कोणते कारण असेल, याविषयी अनेक प्रश्न निर्माण होतात. कारण, या पत्रांमध्ये तत्कालीन अनेक महत्त्वाच्या घडामोडींचा उल्लेख असणार यात शंका नाही. कारण, तो काळच मोठा धामधुमीचा होता. देशाची फाळणी, भारताचे स्वातंत्र्य, संस्थानांचे एकीकरण, पाकचा हल्ला, संविधानाची निर्मिती, पहिली निवडणूक, पहिले मंत्रिमंडळ, भारताचे तत्कालीन परराष्ट्र संबंध, चिनी आक्रमण या आणि अशा अनेक घटनांचे प्रतिबिंब या पत्रव्यवहारात असणार. त्याचवेळी या पत्रव्यवहारातून पं. नेहरूंच्या धोरणाचे मूल्यमापनही करता येणार आहे. मात्र, हेच मूल्यमापन गांधी कुटुंबास नको आहे का, असा प्रश्न निर्माण होतो. एकीकडे स्वातंत्र्यवीर सावरकरांवर बेछुट आरोप करणारे गांधी कुटुंब देशाच्या पहिल्या पंतप्रधानांचा पत्रव्यवहार असा लपवून ठेवत असेल, तर ते देशासाठी नक्कीच भूषणावह नाही.

## दहशतवाद्यांना बांगलादेशचे आयते...

'जैस-ए-मोहम्मद' आणि 'लष्कर-ए-तय्यबा' या दहशतवादी संघटना प्रामुख्याने पाकिस्तानच्या तालावर कार्य करणाऱ्या आहेत. पण, 'एक्यूआयएस' आणि 'आयएसकेपी' या संघटनांना सर्वत्र खिलाफत राजवट आणि शरिया कायदा अमलात आणायचा आहे. बांगलादेशमधील काही जहाल इस्लामी गट या दहशतवादी संघटनाशी जवळीक साधून आहेत. ही जवळीक भावी काळात भारतासाठी डोकेदुखी ठरू शकते. बांगलादेशमधील असे जहाल गट 'एक्यूआयएस' आणि 'आयएसकेपी'ला पाहिजे ते सर्व सहकार्य करण्यास तयार असतील. या दोन दहशतवादी गटांनी भारतात आपला जम बसविण्याचा प्रयत्न अनेकदा करून पाहिला होता. पण, त्यांचे ते प्रयत्न यशस्वी होऊ शकले नव्हते. बांगलादेशमधील जहाल गट अशा दहशतवादी संघटनांना भारताविरुद्ध पुरेशी रसद पुरविण्याचे केल्यावाचून राहणार नाहीत. 'आयएसकेपी'चे कार्यक्षेत्र हे अफगाणिस्तान पुरतेच मर्यादित आहे, असे मानले जात होते. पण, या दहशतवादी संघटनेने मॉस्कोलगत एका सभागृहावर हल्ला करून १३७ लोकांची हत्या केली आणि त्याद्वारे आपण जागतिक पातळीवर कार्यरत असल्याचे दाखवून दिले. 'आयएसकेपी' या संघटनेस भारतात हातपाय पसरवायचे आहेत. रशियामध्ये जसा हल्ला केला तसा एखादा हल्ला करण्याचा त्या संघटनेचा मानस असू शकतो. या दोनपैकी एक संघटना दक्षिण भारतात आणि दुसरी उत्तर भारतात कार्य करण्याचा विचार करतात. पण, समान उद्दिष्टांसाठी या दोन्ही संघटना एकत्र येण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा दहशतवादी संघटनांच्या हालचालींकडे भारताचेही लक्ष आहे. अलीकडेच दिल्ली पोलिसांच्या विशेष कक्षाने 'आयएसकेपी'च्या १४ सदस्यांना अटक केली होती. या प्रकरणी अधिक तपास केला जात आहे. भारताने 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' या जहाल संघटनेवर बंदी घातल्यानंतर त्यामुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न 'आयएसकेपी' ही संघटना करीत आहेत. 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया'चे अनेक भूमिगत कार्यकर्ते आता 'आयएसकेपी'साठी कार्य करताना दिसत आहेत. जहाल मुस्लीम दहशतवादी संघटना भारतास आपले लक्ष्य करीत आहेत, असे या सर्व घडामोडी पाहता दिसून येत आहे. बांगलादेशमध्ये झालेल्या सत्तांतरामुळे त्या देशात जहालांचे फावले असल्याचे दिसून येत आहे. त्यांची मदत घेऊन प्रारंभी उल्लेखित जहाल मुस्लीम संघटना भारताविरुद्ध कारवाया करण्यामध्ये सक्रिय होण्याची चिन्हे दिसून येत आहेत. पण, भारताच्या गुप्तचर यंत्रणांचे या सर्व घडामोडींकडे बारकाईने लक्ष आहे. त्यामुळे अशा जहाल संघटनांचे मनसुबे पूर्ण होण्याची शक्यता नाही, असे गृहीत धरायला हरकत नाही.

## कलंदर

अधी एक बस, त्यानंतर मेट्रो मग पुन्हा १५ मिनिटांच्या अंतरासाठी दुसरी बस असे करीत, ती रात्री साडेआठच्या सुमाराला हुश्य करीत एकदाची घरी पोहोचली. घर कसलं, एका छोट्या वस्तीमधील दोन खोल्यांचं एक खुराडंच होतं ते! आंबलेलं मन, घामेजलेलं शरीर, बसमध्ये जाणीवपूर्वक झालेले स्पर्श, येताना घेतलेल्या भाजीचे ओझे, दिवसभराच्या कामाने शिणलेली अशी ती, घरी गेल्यावर थोडेसे टेकायला मिळणार या निव्वळ कल्पनेनेच सुखावली होती. घरी छोटू होता. ती आल्याबरोबर तिच्या चेहऱ्याकडे बघत राहिला, कसा दिसतोय तिचा चेहरा हे जोखत राहिला नजरेनेच!

कधी कधी साऱ्या जगाचा त्रागा काढते ती त्याच्यावर. ती जराशी टेकली आणि छोटू, वय वर्षे सात, तिच्यासाठी पाणी घेऊन आला. जरा हुशारी वाटली, ती घटाघटा पाणी प्यायली आणि ओढणीने तिने आपला चेहरा पुसला. "बाबू कुठे गेलाय?" तिने विचारले. "सकाळपासून नाही आला घरी. मी शाळेतून आलो आणि बिस्किटांचा एक पुडा खाल्ला आहे." छोटू म्हणाला. "मां मला भूक लागली आहे गं..." थोडासा चाचरत तो बोलला. तिला एकदम अपराधी वाटू लागले. तिने आपल्या पर्समधून एक चिप्सचे पाकीट काढले आणि त्याला दिले. आता बसून चालणार नव्हते... तिने हात-पाय धुतले, कपडे बदलले आणि कुकरची तयारी केली. "आत्ता करते बरं का डाळ-भात आणि देते तुला जेवायला..." ती भराभर हात चालवू लागली. छोटूला भूक लागली आहे, आपण त्याला जेवायला द्यायला हवं, ही एकच जाणीव तिच्या मनात भरून राहिली. "मां, तू पण जेव ना माझ्याबरोबर." छोटू तिला म्हणाला. "हो, हो जेवते ना..." तेवढ्यात तो धुमसतचं आला. डोळे तारवटलेले, केस पिंजारलेले, अस्ताव्यस्त कपडे, जरी भेलकांडत नव्हता तरी नक्कीच खूप प्यायला होता.

आल्यावर धपकन खुर्चीत बसला. "अरे, हा तोच का ज्याच्यासाठी मी घरून पळून जाऊन लग्न केलं! कसली भूल पडली होती मला?" राणी विचार करू लागली. तो रागाने तिच्याकडे पाहू लागला, पण तिला आता तमाशा नको होता. दमलेलं शरीर, शिणलेलं मन, आता अजिबात तयार नव्हतं भांडण करायला. "वाढ मला, काय केलं आहेस जेवायला?" तो जरबेच्या स्वरात म्हणाला. "डाळ-भात केला आहे. आता पोळ्या करते-" म्हणत ती ओट्यापाशी गेली. "दुसरं काही करता येत नाही का तुला?" तो ओरडला. तिची कपाळावरची नस तटतटली आणि ती त्याच्यापेक्षा जोरात ओरडली"कामावर गेला होतास की नाही हे सांग आधी?" झालं! त्याचं माथ भडकलं. "मला प्रश्न विचारतेस? नाही गेलो, नाही जाणार त्या माणसाकडे. त्यांनी मला काल शिव्या दिल्या." तो वैतागत चिडत म्हणाला.

ती काहीच बोलली नाही. शांतपणे आपल्या ताटात अन्न वाढून घेत ती विचार करू लागली... 'काय करावं बरं? कसं समजावून सांगावं ह्याला?' राणी आपल्या माय बापाची एकुलती एक! दोघेही एका फॅक्टरीमध्ये कामगार. एकंदरीत बरं चाललं होतं त्यांचं. राणीला चांगले शिकवायचे व एक चांगले आयुष्य तिने जगावे, अशी त्यांची धडपड होती. त्यांनी राणीला मॅट्रिकनंतर नर्सिंग कोर्समध्ये घातले. एक वर्ष सुरळीत गेले.

आता राणी १८ वर्षांची झाली होती. छान दिसू लागली होती. एक दिवस कॉलेजमध्ये जाताना एका ठिकाणी खूप गर्दी दिसली. तीसुद्धा उत्सुकतेने तिथे डोकावली. रस्त्यावर खडूच्या आणि काही साहित्याच्या साहाय्याने एका तरुणाने अप्रतिम असे निसर्ग चित्र काढले होते. जो तो ते चित्र पाहून चकित झाला होता. तो वर्णाने काळा-सावळा, दाट केस असलेला चेहऱ्यावर अत्यंत मनस्वी भाव असलेला, किंचित बेफिकीर असा कलंदर दिसत होता. त्याने चित्र पूर्ण केले आणि तो त्या गर्दीतून वाट काढीत निघून गेला.

'किती सुंदर जादू आहे याच्या हातात?' खरंच... त्यानंतर तिला नादच जडला त्या ठिकाणी जाऊन बघण्याचा. कधीतरी नजरानजर झाली आणि राणी नकळत भाळली त्याच्या या चित्रकलेवर, कलंदर वृत्तीवर. जेमतेम १८ वर्षांचे, फुलपाखरी, स्वप्न पाहण्याचे वय, त्याच्या सोबतीने जन्मभर राहण्याचे प्रेमात बुडून जाण्याचे वय... त्यानंतर पळून जाऊन कुणालाही न सांगता केलेले लग्न! आई-वडील दुखावले, शिक्षण सुटले. लगोलग झालेला छोटू आणि वाढलेली जबाबदारी.

बाबूचा स्वभाव मुळातच मनस्वी. त्यात व्यवहाराला कच्चा त्यामुळे सतत येणारे अपयश. त्यात दारूचे व्यसन न लागते तर नवलच! कशीबशी या दूरच्या ठिकाणी कामठीला एका दवाखान्यात मिळालेली नोकरी... ती परत आली विचारांच्या भोवऱ्यातून. आता आपला छोटू सात वर्षांचा झाला. त्याला चांगल्या शाळेत घातले पाहिजे. आपण बाबूच्या हातातली कला पाहून भाळलो होतो. तो मनस्वी आहे, हेच आपल्याला आवडले होते. ती मनाशीच विचार करू लागली आणि तिने काहीतरी निश्चय केला. दुसरे दिवशी डॉक्टर साहेबांकडे जाऊन ती खाली मान घालून उभी राहिली. "सर, मला ॲडव्हान्स मिळेल काय एक महिन्याच्या पगाराचा?" तिने विचारलं.

"दर महिन्यात किती आगाऊ रक्कम उचलतेस राणी? तुझा पगार जेमतेम पाच हजार. कशी परतफेड करणार आहेस?" डॉक्टर म्हणाले. "सर, फक्त एक महिन्याचा पगार ॲडव्हान्स द्या-" ती काकुळतीने म्हणाली. आज ती तिच्या दृष्टीने एक मोठी रक्कम त्याच्यावर लावणार होती. एक जुगार खेळणार होती. तिने घरी जाताना कागद, पेन्सिल, ब्रश असे सारे त्याला लागणारे नवीन साहित्य घेतले. त्याचा ड्रॉईंगचा बोर्ड स्वच्छ केला आणि ती सारे काही तिथे ठेवून एकही शब्द न बोलता दुसरे दिवशी आपल्या कामावर गेली.

दोन दिवस बाबूची काहीही हालचाल नव्हती. पण तिसऱ्या दिवशी छोटू धावत तिला सांगायला आला. "मां, बाबू आज घरी आहे. बाहेर गेला नाही." त्या निरागस डोळ्यांमधला आनंद ओसंडून वाहत होता. राणी आत आली. त्या खोलीत एकापेक्षा एक सरस अशी तीन लहान मुलांची चित्रे वाळत होती. राणीला मनापासून आनंद झाला. तिला तिचा कलाकार 'कलंदर' बाबू पुन्हा भेटला होता. बाबू आता चित्रांमध्ये थोडा रमायला लागला होता आणि मन लावून आपलं काम करीत होता. त्याला आता आपल्या चित्रकलेची नशा दारूपेक्षा भारी वाटू लागली होती.

एक कलंदर कलाकार आज पुन्हा मार्गावर आला होता. राणीने तीनही चित्रे आपल्या डॉक्टर साहेबांना दाखविली. ती सुरेख चित्रे पाहून डॉक्टर म्हणाले, "अरे वा! किती जिवंत चित्रे आहेत ही? कुणी काढली ही?" "सर, ही चित्रे बाबूने काढली आहेत." राणीने कौतुकाने सांगितले. "आपण आपल्या दवाखान्यात ही लहान बाळांची चित्रे लावूया, सुंदर काढली आहेत ही... आणि हो, तू उचललेली रक्कम परत करण्याची गरज नाही."

आज राणी जणू हवेवर तरंगत घरी आली. तिने आनंदाने ही बातमी छोटू आणि बाबूला सांगितली. बाबूला त्याची वाट नव्याने दिसली होती आणि ते तिघेही त्या वाटेने त्यांचा प्रवास करणार होते... नव्या उमेदीने.!

रश्मी वाघमारे


किंबहुना तुमचे केले। धर्मकीर्तन हे सिद्धी गेले। येथ माझे जी उरले। पाईकपण।। संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' समाप्ती करताना वरील कृतार्थ निष्काम भाव व्यक्त केलेला आहे. तसाच भाव माझ्या मनी आज वर्षभर अखंडपणे चाललेल्या 'नित्यविजयी रघुनंदन।' या लेखमालेचा समारोप करताना दाटलेला आहे. अयोध्येतील रामजन्मभूमीवर साकार झालेल्या भव्य राम मंदिराच्या लोकार्पण सोहळ्याच्या, ऐतिहासिक हिंदु विजयपर्वा निमित्ताने श्रीरामाचे मराठी संत साहित्यातील 'रामदर्शन' वर्षभर वाचकांना घडवावे आणि श्रीरामाचे प्रेरणादायी पुण्यस्मरण करावे या सद्हेतूने 'नित्यविजयी रघुनंदन ।' ही लेखमाला ७ जानेवारी रोजी सुरू झाली होती. आज त्या लेखमालेतील या कृतज्ञता व कृतार्थतापर लेखाने समारोप होत आहे.

लेखांक ५१

# किंबहुना तुमचे केले। धर्मकीर्तन हे सिद्धी गेले।

# राम कर्ता, राम करविता

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५



भू 'रघुनाथे स्मरोनी कार्य करावे।' या समर्थांबोधाचे श्रद्धाभावाने अनुसरण करीत मी ही लेखमाला लिहिलेली आहे. म्हणूनच ती सिद्धीस गेलेली आहे. श्रीरामकृपेचाच हा प्रसाद आहे. मराठी संतसाहित्यातून होणारे विविधरंगी 'रामदर्शन' वाचकांना वर्षभर छोट्या-छोट्या लेखातून घडविण्याचा प्रयत्न मी 'नित्यविजयी रघुनंदन' या लेखमालेतून केला. या लेखमालेला विचक्षण वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभला. या सर्वांच्यामुळे 'श्रीराम' भक्ती प्रचाराचा, लेखमाला लिहिण्याचा व प्रकाशित करण्याचा उद्देश सफल सुफल झाला, याचा मला विशेष आनंद आहे. श्रीरामाची पुरुषार्थी वीरश्रीयुक्त पराक्रम कथा आणि रामनामाचा महिमा हिंदू समाजात जागृती करून, सामाजिक ऐक्य, सामाजिक समरसता निर्माण करण्याचे सर्वाधिक प्रभावी साधन आहे. म्हणूनच समर्थ रामदास साभिमानपूर्वक म्हणतात

**'कथा थोर या राघवाची।'**
**फेडावया देवांची साकडी ।**
**स्वधर्म वाढवावया वाढी।**
**नामे मोक्षाची उभवावया गुढी ।**
**सूर्यवंशा गाढी दशा आली।**

श्रीरामाच्या अवतारकार्याचे संत एकनाथांनी 'भावार्थ रामायण' ग्रंथात असे वीरश्रीयुक्त वर्णन केलेले आहे. श्रीराम हे त्यांच्या सद्गुणसंपदेच्या बळावर ईश्वरी अवतार मानले गेले व पूजनीय ठरले असले तरी श्रीराम हे आमचे राष्ट्रपुरुष आहेत आणि रामकथा हे केवळ महाकाव्य नसून प्राचीन भारताचा देदिप्यमान इतिहास आहे, हे वाचकांना ठळकपणे सांगण्याचा प्रयत्न या लेखमालेचा हेतू हाता. १३ व्या शतकातील संत निवृत्तीनाथ-ज्ञानेश्वरांपासून ते थेट २०व्या शतकातील संत साईबाबा, नामयोगी संत गोंदवलेकर यांच्या पर्यंतच्या संतसाहित्यातील 'रामदर्शन' आपण या लेखमालेतून घेतले आहे.

**राम एव परं ब्रह्म, राम एवं परं तपः।**
**राम एव परं तत्त्व, श्रीरामो ब्रह्मतारकम् ।।**

रामरहस्योपनिषद मधील या श्लोकातील श्रीरामाच्या परब्रह्मरूपाचेच बहुतेक संतांनी अनुसरण करून रामाचे-रामनामाचे पूजन, भक्ती, आराधना केलेली त्यांच्या साहित्यातून आपण पाहिली. तर संत एकनाथ, संत रामदास या दोन संतांनी रामकथेकडे 'राष्ट्रीय कथा' म्हणून पाहिले आणि पारतंत्र्यातील स्वधर्म, स्वदेश, स्वसंस्कृती विन्मुख हतबल हिंदू समाजात पुरुषार्थाचे जनजागरण केले. **'रामाची पदे मानसी धरीन। विश्व उद्धारीन हेळामात्रे।'** ही समर्थांची उक्ती त्यांच्या लोकजागरण कार्याची ग्वाही आहे.अशाप्रकारे संतसाहित्यातील १) परब्रह्म श्रीराम आणि २) कोदंडधारी रघुवीर अशा दोन प्रकारच्या रामरूपाचे आपण शद्बदर्शन केलेले आहे. 'भावार्थ रामायण' लिहून संत एकनाथांनी मराठी भाषेत वीरश्रीयुक्त संपूर्ण रामकथा प्रथम सांगितली आणि पुढे समर्थ रामदासांनी याच रघुवीराच्या पुरुषार्थी कथेने हलकल्लोळ केला. मराठी संतांनी अभंग, ओव्यातून जी रामकथा गायली ती वाल्मिकी रामायणापेक्षा 'आनंद रामायण', 'अध्यात्म रामायण' या विविध रामायणातील कथाभागावर आधारित आहे.

रामकथा गाताना सकल संतांनी राम, कृष्ण, हरी, शिव या सर्वांना एकाच ईश्वरीतत्त्वाची विविध रूपे, असे 'अद्वैत' दृष्टिने पाहिलेले आहे. त्यांच्या दृष्टिने राम, कृष्ण, शिव हे सारे एकरूप आहेत. हा एकात्म, अद्वैत विचार हाच लेखमालेचा बोध आहे.

'रामकथा' ही 'हरि अनंत, हरिकथा अनंत' अशी व्यापक आहे. 'चरितम् रघुनाथस्य शतकोटि प्रविस्तरम्।' असे बुधकौशिक ऋषींनी रामरक्षेत वर्णिलेले आहे. अशी शतकोटी प्रविस्तर रामकथा एका लेखमालेच्या मर्यादेत लेखनबद्ध करणे अशक्य गोष्ट आहे. आपण या शतकोटी प्रविस्तर रामकथेचा फक्त मराठी संतसाहित्यातील दर्शन केले आहे. हा विषय खूप व्यापक, विशाल आहे. प्रांतोप्रांताच्या रामकथा, वेगवेगळ्या देशातील रामकथा असा रामकथेचा विश्वसंचार झालेला आहे. त्या सर्वांचा आढावा आपणास आपल्या विषय मर्यादेमुळे घेता आला नाही. योग आला आणि श्रीरामाची कृपा झाली तर त्याचाही शद्बरूप धांडोळा घेण्याची माझी मनिषा आहे. शेवटी 'राम कर्ता, राम करविता' म्हणत या लेखमालेची मी समाप्ती करतो. **धन्य धन्य आमुचे जीवन । मुखी राम नाम, चिंतन ।**

'रामकथा' ही विश्वसाहित्यातील सर्वोत्कृष्ट कथा, महाकाव्य आहे. राम-रामायण हा भारतीयांचा राष्ट्रीय स्वाभिमान आहे. अयोध्या येथील 'राम जन्मभूमी मंदिराला सनातन हिंदू मनात अपार श्रद्धेचे स्थान आहे. त्यासाठीच हिंदुंनी ५०० वर्षे अविरतपणे संघर्ष केलला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'राम जन्मभूमी मंदिराचे' लोकार्पण करून भारतामध्ये एका स्वाभिमानी सांस्कृतिक युगाचाच श्रीगणेशा केलेला आहे. दैनिक 'तरुण भारत' मधील प्रस्तुतची लेखमाला त्या युग परिवर्तनाचाच एक छोटासा भाग आहे.

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

(भाग २८)

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२



ए १८८१ ते १८८२ च्या दरम्यान रवींद्रनाथ इंग्लंडमध्ये राहून भारतात कोलकत्याला परत आले होते. त्या काळात त्यांच्यावर युरोपियन ऑपेरांचा प्रभाव होता. पण त्या प्रभावात ते कधीच वाहून गेले नाहीत. त्यातील चांगले तेवढे त्यांनी घेतले आणि भारतीय परंपरेशी त्याचा सुंदर मिलाफ घडवून आणला. त्यांची दोन नाटके याच कालावधीत निर्माण झाली. ती म्हणजे प्रतिभा विलास आणि कालमृगया. 'प्रतिभा विलास' या संगीत नाटिकेबद्दल मागील भागात आपण जाणून घेतले. या भागात 'कालमृगया' आणि 'मायेर खेला' या दोन नाटकाबद्दल जाणून घेऊया...

प्रतिभा विलास आणि कालमृगया ही दोन्हीही नाटके म्हणजे एक प्रकारचे ऑपेराच आहेत. संगीत नाटिका आहेत. रवींद्रनाथांनी कवितेसह साहित्याचे सर्व प्रकार जरी हाताळले असले तरी त्यांची मूळ प्रकृती ही कवीची होती. त्यामुळे त्यांच्यातील नाटककार हा प्रामुख्याने कवी आहे. त्यामुळे त्यांची नाटके पाहताना प्रेक्षकांनी हे भान ठेवणे आवश्यक आहे. या नाटकांमधील संगीत आणि काव्याचा आस्वाद जर घेता आला तर त्या नाटकांचा आनंद अनेक पटींनी वाढतो. गीत आणि संगीताच्या माध्यमातूनच या नाटकांमध्ये कथानक पुढे सरकते. किंबहुना काही नाटकात तर कथानक दुय्यम असून गीत आणि संगीत नाटकाचा प्राण आहे. ही नाटके रवींद्रनाथांनी जवळपास १४५ वर्षांपूर्वी लिहिलेली असली तरी आजही ती ताजी टवटवीत वाटतात. आजही त्यांचे प्रयोग होत असतात. या नाटकांच्या माध्यमातून रवींद्रनाथांनी जो संदेश त्या काळात दिला तो आजही कालबाह्य झालेला नाही. रामायणातील एका घटनेवर आधारित 'कालमृगया' हे त्यांचे संगीत नाटक आहे. या नाटकात त्यांनी एक अंध असलेल्या संताचा आज्ञाधारक मुलगा दाखवला आहे. त्याला ऋषीकुमार असे म्हटले गेले आहे. आपल्याला रामायणातील ही कथा श्रावणबाळाची कथा म्हणून परिचित आहे. परंतु या कथेला रवींद्रनाथांनी वेगळा आयाम दिला. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर या कथेला 'रवींद्र टच' लाभला आहे. दशरथ राजा मृगयेसाठी म्हणजेच शिकारीसाठी अरण्यात येतो. एका हरणाच्या पाडसाचा पाठलाग तो करीत असतो. शरयू नदीच्या काठावर तो येतो. हरीण जंगलातच कुठेतरी अदृश्य होते. याच सुमाराला ऋषिकुमार आपल्या अंध पित्यासाठी पाणी घेऊन जाण्यासाठी नदीकाठी येतो. हे दिवस पावसाळ्याचे आहेत. शरयू नदी दुथडी भरून वाहत आहे. विजा चमकत आहेत. त्याचे वडील त्याला अशा वातावरणात पाणी आणण्यासाठी बाहेर पडू नकोस असे सांगतात तरी देखील आपल्या तहानलेल्या पित्यासाठी पाणी घेऊन जाण्यासाठी हा ऋषीकुमार नदीकाठी येतो. आपल्या घागरीत तो पाणी भरतो. तो आवाज हरणाच्या पाडसाचा आहे असे दशरथ राजाला वाटते आणि तो शब्दभेदी बाण सोडतो. ऋषीकुमाराला हा बाण लागून तो जखमी होऊन पडतो. आपल्या हातून एका निरपराध ऋषीकुमाराला बाण लागला आहे हे पाहिल्यावर दशरथ राजाला प्रचंड धक्का बसतो आणि दुःख होते. शेवटच्या अवस्थेत असलेला ऋषीकुमार आपल्याला आपल्या वडिलांकडे घेऊन जावे अशी विनंती दशरथ राजाला करतो. त्याप्रमाणे दशरथ राजा अंतिम घटका मोजत असलेल्या त्या ऋषीकुमाराला त्याच्या अंध पित्याकडे घेऊन जातो. अर्थातच आपल्या पुत्राला त्या अवस्थेत पाहून त्या अंध पित्याला अपरंपार शोक होतो. दशरथ राजा वारंवार क्षमायाचना करतो. पण आपल्या पुत्राच्या मृत्यूने शोकाकुल झालेला तो अंध पिता दशरथाला तुझा देखील पुत्रशोकाने मृत्यू होईल असा शाप देतो. रामायणातील ही कथा आपल्याला परिचित आहे. या नाटकात रवींद्रनाथांनी शिकारी जंगलातील प्राण्यांची शिकार करताना दाखवले आहेत. जंगलातील वृक्ष, प्राणी, पक्षी आदींचा ते विनाश करतात. पूर्वीच्या काळी राजे लोक आपल्या इच्छेसाठी जंगली प्राण्यांची शिकार करीत किंवा मृगयेसाठी बाहेर पडत असत. आज मानव आपल्या आवडीखातर आणि उपभोगासाठी जंगलांचा नाश करतो आहे हे या नाटकात दाखवले आहे.

आज जंगलतोडीमुळे ग्लोबल वॉर्मिंगसारखी परिस्थिती उद्भवली आहे. पर्यावरण उध्वस्त होत आहे आणि याचे भयंकर परिणाम मानवाला भोगावे लागत आहेत. यातूनही जर मानव सावध झाला नाही तर भविष्यकाळामध्ये आणखीही भयानक अनर्थ ओढवू शकतो. हे या नाटकातून रवींद्रनाथांनी सूचित केले आहे. या नाटकात वनदेव आणि वनदेवता दाखवले आहेत. त्यांची गाणी म्हणजे उत्तम अशा प्रकारचे पद्य आहे. त्यातून पर्यावरणाचा संदेश दिला आहे. दशरथ राजाच्या शिकारीचे दृश्य आजूबाजूच्या वातावरणाचा आणि आवाजांचा उत्तम वापर करून परिणामकारकपणे साधले आहे. जंगलात शिकार करण्यासाठी येणाऱ्या शिकाऱ्याचा समूह हा विनाशाचे प्रतीक आहे तर वनदेवी आणि वनदेवता निसर्गाचे मूर्त स्वरूप आहेत. आंधळेपणाने पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करण्यापेक्षा आपण आपली संस्कृती जपली पाहिजे आणि पाश्चात्य संस्कृतीतील जे जे चांगले आहे ते घेऊन पौर्वात्य आणि पाश्चिमात्य शैलींचा संगम साधायला हवा म्हणजे आपण एक सुंदर अशा नवीन जगाची निर्मिती करू शकू असेच जणू रवींद्रनाथ सुचित करतात. १८८४ मध्ये त्यांनी 'प्रकृतीर प्रतिशोध' हे नाटक लिहिले. त्यानंतर 'मायार खेला' हे त्यांचे १८८८ मध्ये आलेले चौथे नाटक. हे नाटक इतर नाटकांपेक्षा थोडे वेगळे आहे. या नाटकात स्वतः रवींद्रनाथ आणि त्यांची पुतणी अभिज्ञादेवी यांनी प्रमुख पात्रांची भूमिका केली आहे. रवींद्रनाथांच्या अभिजात अशा गानलकेरींना जेव्हा अभिज्ञादेवींच्या सुरांची साथ लाभत असे तेव्हा सारे नाट्यगृह सुरांच्या वर्षावात न्हाऊन निघे आणि रसिक या काव्यसंगीताच्या आनंदात चिंब भिजत असत. नाटकाच्या पारंपरिक कल्पना आणि मर्यादा रवींद्रनाथांमधला कवी फारसा मानत नव्हता. तर आपल्याला हवे तसे रंगरूप या नाटकांना ते देत होते. हेच नाटककार म्हणून रवींद्रनाथांचे श्रेष्ठत्व आहे. 'मायार खेला' हेही संगीत नाटकच आहे. या नाटकात रवींद्रनाथांनी इटालियन ऑपेरा आणि आयरिश संगीताचा सुरेख संगम साधला आहे. या नाटकात अमर, प्रमदा आणि शांता अशी तीन पात्रे आहेत. शांताने आपले हृदय आधीच अमरला अर्पण केले आहे परंतु त्याला तिचे आकर्षण नाही. तो एका वेगळ्या अशा आदर्श जीवनसाथीच्या शोधामध्ये असतो. अशावेळी त्याची भेट प्रमदाशी होते. पण प्रमदा हिच्या मनात अमरविषयी खरे प्रेम नाही. ती तिच्या सौंदर्याने अमरला मोहित करण्याचा प्रयत्न करते. एक प्रकारे हा 'मायार खेला' म्हणजे भ्रम आहे. शेवटी अमरला प्रमदाच्या खऱ्या स्वरूपाची जाणीव होते आणि शांताचे महत्व त्याला कळते. तो पुन्हा शांताकडे परत येतो अशी ही कथा आहे. शांता ही खर्या प्रेमाचे आणि त्यागाचे प्रतीक आहे. (क्रमशः)

# के कल्चर आणि गुंतवणूक?

महित हवं
चन्द्रशेखर टिळक
भ्र. ९८२०२९२३७६

के कल्चर आणि गुंतवणूक... होय. माझी लिहिण्यात काहीही चूक झालेली नाही. कोरोना नंतरच्या काळात आपल्या देशाच्या आर्थिक विकासाचा वार्षिक दर (GDP Growth Rate) इतर अनेक देशांच्या तुलनेत सातत्याने चढा किंवा आकर्षक ठेवणारे देश म्हणजे आपला हिंदुस्थान, इंडोनेशिया, व्हिएतनाम, तैवान आणि कोरिया (अर्थात दक्षिण कोरिया).

अलिकडच्या काळात काही वेगळ्याच राजकीय कारणाने कोरिया चर्चेत असला तरी त्या देशाचा अर्थकारणाला वेग लक्षणीय आहे. हे पाच देश आर्थिक विकासात एकमेकांचे स्पर्धक आहेत आणि असले तरी या देशांचा भौगोलिक आकार, भौगोलिक स्थान वेगवेगळे आहे असे नाही तर त्यांचा विकास दर सुध्दा वेगवेगळा आहे. आणि या आकर्षक, आश्वासक आर्थिक विकासाचा स्त्रोत सुध्दा प्रत्येक देशाचा वेगवेगळा आहे. या सगळ्यात आगळा वेगळा स्त्रोत असणारा देश म्हणजे कोरिया किंवा दक्षिण कोरिया आगळ्या वेगळ्या स्त्रोताचा वेगवेगळ्या कल्पक मार्गाने उपयोग करणारा देश म्हणजे कोरिया. या आर्थिक समृद्धीचा महत्वाचा आणि वैशिष्ट्यपूर्ण स्त्रोत म्हणजे के कल्चर!

आपल्या सगळ्यांच्याच असे लक्षात आले आहे आणि असेल की गेल्या चार- साडेचार वर्षात अगदी तुमच्या-माझ्यासारख्या सर्वसामान्य भारतीय नागरिकांच्या बाबतीत सुध्दा घर बसल्या नेटफ्लिक्सवर कोरियन मालिका बघण्याचे प्रमाण अत्यंत मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. त्याआधी या मालिका भारतीय प्रेक्षकांसाठी उपलब्ध नव्हत्या असे जरासुद्धा नाही. पण त्यांनी आपले अस्तित्व आणि करमणूक क्षेत्राच्या परिभाषेत बोलायचे तर आपला TRP या काळात प्रचंड वाढवला आहे. हे फक्त आपल्या देशात झाले आहे असे नाही तर जगातील अनेक देशांवाबत हे खरे आहे. या क्षेत्रात असे म्हणले जाते की हॉलीवूड आणि बॉलीवूड यांच्या खालोखाल करमणूक क्षेत्रात मागणी असणारी गोष्ट म्हणजे या कोरियन मालिका!

एका वेगळ्या विषयाचा अभ्यास करत असताना ही गोष्ट माझ्या लक्षात आली. त्यातून मी हे कोरियन मालिकांचे जग, ज्याला त्या क्षेत्राच्या परिभाषेत के कल्चर म्हणले जाते, त्याचा थोडा सखोल अभ्यास केला. या अभ्यासातून माझ्या असे लक्षात आले की या के कल्चर मुळे केवळ कोरियाची राष्ट्रीय अर्थव्यवस्था सुधारली असे नव्हे तर तुमच्या माझ्या सारख्या सर्वसामान्य भारतीय छोट्या-लहान गुंतवणूकदारांनी आपल्या स्वतःच्या छोट्या- मोठ्या गुंतवणुकीचे निर्णय घेताना या के कल्चरची संकल्पना, त्याची तत्वे याचा अवलंब करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करणे नक्कीच श्रेयस्कर ठरेल.

के कल्चर किंवा कोरियन मालिकांचे सगळ्यात महत्वाचे आणि अत्यंत सक्तीचे तत्व म्हणजे कोणतीही मालिका ही फक्त १६ भागांची असतें. मालिकेला दशकांचा श्रोत्यांचा कितीही अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला तरी ऐनवेळी त्या मालिकेच्या भागांच्या संख्येत (एपिसोड) कधीही वाढ केली जात नाही. या १६ भागांच्या मालिकेतील कोणताही भाग खरं म्हणजे एक तासाचा, अगदीच डोक्यावरून पाणी म्हणजे एक तास दहा मिनिटांचा असतो.

अगदी क्वचितच एखादी मालिका १६ भागांच्या ऐवजी १९ भागांची असते. पण जर मलिका १९ भागांची असेल तर त्यातील कोणत्याही एका भागाचा कालावधी हा कधीही ५२-५४ मिनिटांपेक्षा जास्त असत नाही. मालिका १६ भागांची असो किंवा अपवादात्मक रित्या १९ भागांची असो , संपूर्ण मालिका मिळून ती कधीही २० तासांपेक्षा जास्त असत नाही. हे नियम प्रचंड काटेकोरपणे पाळले जातात.

गंमत म्हणजे कोरियन सरकारने याबाबत असा कोणताही कायदा केलेला नाही , किंवा कोणतीही नियमावली जारी केलेली नाही. तर कोरियन मालिकांची निर्मिती करणाऱ्या विविध निर्माते आणि त्यांच्या कंपन्या यांनी एकत्रित चर्चा करून याबाबत खुलेपणाने आणि स्वयंस्फुर्तीने हा निर्णय घेतला आहे... आणि तो न चुकता अंमलात आणला जातो. SRO किंवा Self Regulatory Organisation चे याहून कोणते जास्त आकर्षक व प्रभावी उदाहरण असेल असे मला वाटत नाही. यातूनच मला असे वाटायला लागले की हे सारे आपण सगळ्यानी आपल्या आपल्या वैयक्तिक गुंतवणुकीत अंमलात आणले पाहिजे, आता हे बघा ना! या कोरियन मालिका स्वतःवर भागांच्या संख्येवर बंधन घालत त्यांना स्वतःला आणि दर्शक प्रेक्षकांना सतत सांगत असतात की प्रत्येक गोष्टीची त्याची त्याची अशी एक मर्यादा असते. अगदी एखादी गोष्ट किती ताणायची यालाही एक अंगभूत मर्यादा असते. कारण त्या विषयाच्या पसाऱ्यालाही मर्यादा असते आणि तो विषय समजून घ्यायच्या आपल्या आकलन शक्तीलाही मर्यादा असतात. आपण मराठीत म्हणतोच ना बेडकी फुगून फुगून कीतीही फुगली तरी बेडकीचा काही बैल होत नाही! जसा कथा विषयाच्या विस्ताराला एक अंगभूत मर्यादा असते तशीच ती आपल्याजवळील गुंतवणूक योग्य रकमेला असतेच की! त्यामुळे एकावेळी जास्तीत जास्त किती पैसे गुंतवायचे असा आपल्या पुढचा प्रश्न नसतोच; तर आपण जास्तीत जास्त किती पैसे गुंतवू शकतो हे एकदम ठरलेले असते. त्यामुळे असतो तो सारा प्रश्न हा अंथरूण पाहून पाय पसरण्याचा असतो. अशा एका वेगळ्या अर्थाने के कल्चर आणि गुंतवणूक!

के कल्चर आणि गुंतवणूक असा विचार करत असताना मला आवडलेली किंवा सुचलेली दुसरी गोष्ट म्हणजे कोरियन मालिका जर लागोपाठ पाहिल्या की पटकन लक्षात येणारी गोष्ट म्हणजे प्रत्येक कोरियन निर्मात्याचा त्याचा त्याचा असा ठरलेला नट संच असतो. आपल्याकडे जसे प्रभाकरपंत पणशीकर यांची नाट्यसंपदा ही संस्था जोमात असताना नाही का.. त्यांची ठरलेली टीम असायची.. लेखक प्रा. वसंत कानेटकर, दिग्दर्शक पुरुषोत्तम दारव्हेकर, अभिनेते म्हणून प्रभाकर पणशीकर, सुधा करमरकर, चित्तरंजन कोल्हटकर, बिपिन तळपदे, जगन्नाथ कांदळगावकर आणि डॉ. काशिनाथ घाणेकर, कोरियन मालिका अगदी तशाच असतात...

करमणूक क्षेत्र काय किंवा गुंतवणूक क्षेत्र काय, दोन्हीकडे अनिश्चितता ठासून भरलेली! त्यामुळे Known Devils are always better than Unknown God या तत्त्वावर कोरियन मालिकांची सदैव भिस्त असते. आपल्याला समजतील अशाच क्षेत्रातील कंपन्याच्या शेअर्स मधेच गुंतवणूक करत राहणे आणि त्यातही त्या त्या क्षेत्रातील सर्वोच्च कंपन्यांच्या शेअर्सची गुंतवणुकी साठी निवड करत रहावे असेच तर सारे गुंतवणूक धुरीण सांगत असतात की, के कल्चर आणि गुंतवणूक अशाही अर्थाने!

के कल्चर आणि गुंतवणूक असा विचार करत असताना जाणवणारी गोष्ट म्हणजे केवळ मर्यादित भाग, ठराविक नटसंच इतकेच कोरियन मालिका करत नसतात; तर एका विशिष्ट प्रकारची वेशभूषा कोरियन मालिका रूढ करत आहेत. केवळ त्यांच्या देशातच नव्हे तर जगभरात. पुरुषांचे आणि महिलांचे सातत्यानं जे कपडे कोरियन मालिका मधून दाखवले जातात. आज त्यांचे जगभरात अनुकरण होते आहे. उदाहरणार्थ, पुरुषांच्या फॉर्मल आणि casual दोन्हीं प्रकारच्या शर्टमधे आता सऱ्हास आढळणारी लांब रुंद पट्ट्याची स्टाईल ही कोरियन मालिकांचे वैशिष्ट्य आहे. त्या शर्टची वेगळ्या प्रकारची कॉलर हा त्याचाच भाग आहे. त्यातही असे कपडे मालिकात दाखवले जाताना कोणत्याही विदेशी ब्रँडचे दर्शन होणार नाही याची पुरेपूर खबरदारी घेतली जाते.

पुरुषांच्या formal कोट असू दे नाहीतर थंडीचे ओव्हरकोट या दोन्ही बाबत ही काळजी घेतली जाते. यातून कोरियन वस्त्रोद्योग विदेशी गुंतवणुकीचे मोठे गंतव्यस्थान ठरत आहे. त्यामूळे करमणूक क्षेत्राच्या बरोबरीने त्याच्याशी संबंधित कपडे, प्रसाधने, रेकॉर्डिंगच्या सुविधा, स्टुडिओ या सगळ्यात विदेशी गुंतवणूक प्रचंड वाढत आहे. तुमच्या- माझ्यासारख्या सर्वसामान्य गुंतवणूकदारानी एखादा चांगला प्रस्थापित उद्योग समूह गुंतवणुकीसाठी शोधावा आणि त्यातील गुंतवणुकीचे परिणाम सातत्यानं समाधानकारक प्रमाणात मिळायला लागले की त्या समूहाच्या विस्ताराबरोबर त्या समूहातील इतर नवीन किंवा जुन्या कंपन्या आपल्या गुंतवणुकीत समाविष्ट करत जावे. उदाहरणार्थ... अनुकूल सरकारी धोरणाचा कल ओळखत NTPC चे शेअर्स घ्यावेत आणि काळाचा ओघात NTPC Green चाही विचार करावा. टाटा समूहातील कंपन्या तर या तत्त्वानुसार सार्वाकलिक निवडीचा विषय होईल.

के कल्चर आणि गुंतवणूक अशाही अर्थाने करमणूक आणि पर्यटन याची उत्कृष्ट सांगड हे के कल्चर याचे सगळ्यात मोठे वैशिष्ट्य आहे.आधी दक्षिण कोरियातील विविध ठिकाणे आपल्या मालिकांतून प्रेक्षकांपर्यंत मालिका निर्मात्यांनी ठरवून ठरवून पोचवली. त्याच्या आकर्षणातून परदेशी पर्यटक कोरियात पोचले की मोफत किंवा सवलतीच्या दरात प्रवास, कोरियन संस्कृतीची ओळख व्हावी या हेतूने स्थानिक कोरियन नागरिकांच्या घरी पर्यटकांची राहण्याची व्यवस्था याचे कोरियन सरकारच्या माध्यमातून जाळे उभारले गेले. त्यासाठी स्वतंत्र कंपन्या, सरकारी खाती, यंत्रणा निर्माण करून त्यातून विदेशी गुंतवणूक आकर्षित केली गेली. त्यातून अशी नवनवीन स्थाने निर्माण केली गेली. अशा नवनवीन स्थळांचे दर्शन प्रदर्शन मलिकातून जगभराच्या दर्षकांपर्यंत पोचवले गेले. गेल्या काही वर्षात कोरियामधे परदेशी पर्यटक वाढण्याची संख्या प्रचंड वाढली आहे (चार वर्षात पर्यटकांच्या संख्येत वाढ होणाऱ्या देशांची क्रमवारी कंबोडिया, व्हिएतना, कोरिया, भारत अशी आहे.) एकंदरितच नवीन गुंतवणूक मिळवायची आणि अशी नविन गुंतवणूक त्याच क्षेत्रातील नवीन संधीत करायची हे के कल्चर आहे. याचा अर्थ आपण सर्वसामान्य गुंतवणूकदार म्हणून असा घ्यायचा ना की आधीच्या गुंतवणुकीतून सातत्यानं लाभांश मिळायला लागला की तो लाभांश आधी त्याच कंपनीत गुंतवायचा आणि अशा लाभांशाचे प्रमाण लक्षणीय पोचले की काही प्रमाणात तरी या लाभांशाची गुंतवणूक त्याच समूहातील इतर कंपन्यामधे किंवा त्याच क्षेत्रातील इतर कंपन्यामधे करत जायचे. (पान ६ वर)

# ग्रहसंकेत

**(रविवार, २९ डिसेंबर २०२४ ते शनिवार, ४ जानेवारी २०२५)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✲ **रविवार, रविवार, २९ डिसेंबर-** शिवरात्री, सेवागिरी महाराज रथोत्सव पुसेगाव, जि. सातारा ✲ **सोमवार, ३० डिसेंबर-** दर्श- वेळा अमावास्या, सोमवती अमावस्या, अन्वाधान, ताम्हणकर महाराज पुण्यतिथी सांगली, श्री तुकारामबाबा जोशी पुण्यतिथी, काळबादेवी यात्रा मुंबई ✲ **मंगळवार, ३१ डिसेंबर-** इष्टि, पौष मासारंभ, सूर्यनारायण मंदिर किरणोत्सव नारायण चिंचोली ता. पंढरपूर, अंबिका यात्रा नाईचाकुर ता. उमरगा ✲ **बुधवार, १ जानेवारी** - नूतन वर्षाभिनंदन २०२५ ✲ **गुरुवार, २ जानेवारी-** शुभ दिवस ✲ **शुक्रवार, ३ जानेवारी-** विनायक चतुर्थी ✲ **शनिवार, ४ जानेवारी-** सकाळी १० पर्यंत चांगला.

**मुहूर्तः-** ✲ **साखरपुडा-** १, २ जानेवारी ✲ **डोहाळ जेवण-** २ जानेवारी ✲ **बारसे-** १, २ जानेवारी ✲ **जावळ-** २, ३ जानेवारी (दुपारी १२ पर्यंत) ✲ **गृहप्रवेश-** १, २, ४ जानेवारी (१० पर्यंत)

### मेष :- सिंहावलोकन करावे

वेळ आणि विश्वास एक असा पक्षी आहे, जो एकदा उडून गेल्यावर परत येत नाही. नवीन वर्षात पदार्पन करताना हा विचार सदैव स्मरणात ठेवावा. महत्त्वाचे व्यवहार फार लांबणीवर न टाकता लवकर करून घ्यावेत. सरत्या वर्षाचे सिंहावलोकन करून पुढील मार्गक्रमण करावे. अनुभवातूनच शहाणपण येते. आर्थिक स्थिती समाधानकारक राहिल. नव्या संधीचे स्वागत करावे. शुभ ता. १, ३, ४

### वृषभ:- कोणाला दुखवू नका

बोलण्यातील योग्यपणा व माणूसकी नसेल तर माणूस अशिक्षितच असतो. आपल्या बोलण्यात जेवढी मृदूता आणता येईल तेवढी आणावी. शब्द शस्त्रांसारखे असतात. त्यामुळे नवीन वर्षात पर्दापण करताना विचाराने व मोजकेच बोलावे. कोणाला विनाकारण दुखवू नका. उत्साहवर्धक घटना घडतील. कला-गुणांचा गौरव होईल. नव्या संधी लाभणार आहेत. वेळीच लाभ उठवावा. शुभ ता. १, ३

### मिथुन:-कर्तव्य कर्मास प्राधान्य द्यावे

ज्यांच्याकडे चांगले गुण नाहीत तेच इतरांचे अवगुण पाहून स्वतःस मोठे समजत असतात. धनात मंगळ तर व्ययात गुरू त्यामुळे नव्या वर्षाची सुरूवात थोडी अनुकूल तर थोडी प्रतिकूल अशीच राहिल. खर्च वाढले तरी ते सत्कारणी कसे लागतील इकडे विशेष लक्ष द्यावे. अनावश्यक जबाबदार्या स्वीकारू नका. कार्यक्षेत्रात कर्तव्य कर्मास प्राधान्य द्यावे. सरकारी कामे होतील. शुभ ता. ३१, १, ३

### कर्क:- अपेक्षित घटना घडतील

सत्य व स्पष्ट बोलणारा अप्रिंय वाटत असला तरी धोकेबाज कधीच नसतो. वेळ निभावून नेण्यासाठी कधीच कोणत्याही अनिष्ट मार्गाचा स्वीकार करू नका. पुढे अडचणीत, गोत्यात याल. राशीतील मंगळ विनाकारण उतावीळपणा वाढविणार आहे. आहार, विहाराकडे दुर्लक्ष करू नका. आर्थिक स्थिती समाधानकारक राहिल. दुसर्यांवर फार अवलंबून राहू नका. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. १, ४

### सिंह:- स्नेहाचे संबंध दृढ करावेत

शरीर बिघडविणार्या भोजनापासून मन बिघडविणार्या विचारांपासून व मनस्थिती बिघडविणार्या लोकांपासून नेहमी दूरच रहावे. सप्तमात शनि तर व्ययात मंगळ त्यामुळे नव्या वर्षात विचारपूर्वक पदार्पन करावे. कार्यक्षेत्रात आपला दबदबा राहिल. अनावश्यक खर्च कसे टाळता येतील, याकडे अधिक लक्ष द्यावे. स्पर्धांमध्ये यश मिळेल. नव्या विचारांना चालना देता येईल. शुभ ता. ३१, १, २

### कन्या:- अग्नि, वीजेपासून सावध

धन मिळते, तेथे आनंद नसतो तर जेथे मन मिळते, तेथे खरा आनंद असतो. राशीत केतू तर सप्तमात राहू, नेपच्यून त्यामुळे आपण मनस्वास्थ टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करा. उत्तरार्धात मनासारख्या धटना घडतील. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. नव्या समस्या उद्भवणार नाहीत, याची काळजी घ्यावी. अग्नि, वीजेपासून सावध रहावे. नवे विचार विचाराने स्वीकारावेत. शुभ ता. १, २

### तुला:- उत्साहवर्धक घटना

आताचे एकच आयुष्य आहे, प्रत्येक क्षण जगून घ्यावे. पुढचे काय माहित नाही. नव्या संधी शोधू नका. तर त्या आपोआपच आपल्या पुढे येतील. कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक घटना घडतील. नव्या कामांना गती मिळेल. वादाचे प्रसंग टाळावेत. जुणे येणे वसूल करू शकाल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. १, ३

### वृश्चिक:- आनंददायी घटना

स्वर्गात नोट नाही तर आपल्या कर्माचेच चलन चालते. त्यामुळे नोटे ऐवजी कर्मासच सतत प्राधान्य द्यावे. धनस्थ रवि- बुधामुळे सरकारी कामे मनासारखी होतील. नव्या संधी नव्या वर्षात हात जोडून आपणापुढे उभ्या राहतील. त्यांचा स्वीकार करावा. कौटुंबिक जीवनात आनंददायी घटना घडतील. नव्या कामांना गती मिळेल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. १, ३

### धनु:- सुसंधीचा लाभ उठवावा

यश कधीच आपल्या दारात येत नाही, संघर्षातूनच त्याचेपर्यंत पोहोचावे लागते. नव्या वर्षाचा हा मंत्र समजून वाटचाल करावी. शारीरिक तक्रारींची वेळीच दखल घ्यावी. आत्मविश्वास वाढविणार्या घटना घडतील. स्थावर प्रश्नी वादाचे प्रसंग टाळावेत. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. अडचणीतून मार्ग निघत जाईल. सुसंधीचा लाभ उठवावा. प्रगतीच्या घटना घडतील. शुभ ता. १, ४

### मकर:- विचारपूर्वक निर्णय घ्यावेत

आपुलकीचे चार शब्द मनापासून बोलता आले की, हितचिंतकांची कमतरता कधीच भासत नाही. साडेसातीचे शेवटचे पर्व चालू आहे. शनि-मंगळ षडाष्टक योग, त्यामुळे नव्या वर्षात पदार्पण करताना विचारपूर्वक निर्णय घ्यावेत. खाद्यपदार्थ, गृह सजावट, वस्त्रप्रावरणे अशा व्यवसायात अनुकूलता राहिल. सरकारी कामासाठी अधिक पाठपूरावा करावा लागेल. संतती संबंधात शुभ घटना घडतील. शुभ ता. १, ४

### कुंभ:- मनासारख्या घटना

क्षणभंगुर आयुष्याकडून आपल्या अपेक्षा अगणित असतात. राशी स्वामी शनिसह राशीत शुक्र आहे. त्यामुळे मनासारख्या घटना घडतील. योजलेली कामे मनासारखी होणार असल्याने समाधान वाटेल. कारखानदारी, विधी, गृहसजावट अशा व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. सर्व अडचणींवर मात करू शकाल. प्राप्तीचे प्रमाण समाधानकारक राहिल. नव्या योजना साकार करता येतील. शुभ ता. १, ४

### मीन:- बिनधास्त रहावे

परके कोण हे कळण्यापेक्षा आपले कोण हे समजायला जास्त वेळ लागत असतो. परके व आपले यांचा बराच अनुभव मावळत्या वर्षात आपणाला आला असेलच. यापुढेही असेच जागरूक रहावं म्हणजे अडचणीत येणार नाहीत. पी हळद नि हो गोरी, अशी भूमिका ठेवू नका. कष्टसाध्यच यश आहे. त्यामुळे आहे ते टिकेल पण त्यात आता वाढही होणार आहे. काळजी करू नका. बिनधास्त रहावे. शुभ ता. ३१, १

!! शुभ भवतु !!

# औषधी धार्मिक वृक्ष उंबर



**श्रीगुरू दत्तात्रयांचा निवास उंबराच्या वृक्षाखाली असतो, अशी आपली श्रध्दा आहे. औदुंबर म्हणून हा वृक्ष सर्व परिचित असून बेल, तुळस याप्रमाणेच हिंदू धर्मीयात पवित्र आहे. ज्योतिष शास्त्रात कुलिका नक्षत्राचा आराध्य वृक्ष उंबर सांगितला आहे. या झाडाची पुजा केली जाते.**

आजीचा बटवा

नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१



भगवान श्रीविष्णु यांनी प्रल्हादाचा पिता हिरण्यकश्यपूचा नरसिंह अवतार घेऊन वध केला. त्यावेळी त्यांच्या नखाची अतिशय आग होऊ लागली. ती आग शमन करण्यासाठी नरसिंहांनी आपली नखे उंबराच्या झाडात रूजविली. त्यामुळे त्यांच्या हाताची सर्व आग नाहीशी झाली, अशी कथा सांगण्यात येते.

नदी किनारी उंबराचे मोठमोठे वृक्ष असतात. उंबराची सावली अत्यंत शीतल असते, हवा, शुध्द करण्याचा मोठा गुण ह्या झाडामध्ये असून उंबर अतिशय थंड व रक्ताची शुध्दी करणारा आहे. उंबराची पाने, फळे, साल, मूळ, पाणी, औषधीदृष्ट्या अत्यंत उपयुक्त आहे.

**विविध भाषेत नावेः-**

**संस्कृत-** औंदुबर, हिंदी-गुलर, गुजराती- उमरो (उमरडी), मराठी- उंबर, कन्नड- अत्तिमरम, बंगाली - यज्ञ औंदुबर, इंग्रजी- फिंग ट्री, लॅटिन- फीकुस ग्लोमेरेटा अशी विविध भाषेत उंबरास नावे आहेत.

**गुणधर्म :-**

उंबर शीतल, मधुरं वृणरोपक रूक्ष तुरट, आधकारक, कफ, पित्त, अतिसार, रक्तविकार दाह, प्रमेय (मधुमेह) शोष, मूर्च्छा यांचा नाश करणारा आहे. भारतात सर्वत्र हा वृक्ष पहावयास मिळतो.

**विविध औषधी उपयोगः-**

मुतखड्याचा अनेकांना विकार होतो. लघवी करताना थोडी थोड़ी लघवी होते, वेदना होतात. वाताश्मरी, पित्ताश्मरी, कफाश्मरी, असे मुतखडयाचे प्रकार आहेत, बस्तीत आग होणे, मिश्रीत मूत्र होणे आदी रोगाची आहेत. अशा विकारावर उंबराच्या सालीचे गंध ४ चमचे व मध एकत्र करून वरचे वर देत जावे. हे गंध पोटावर जननेंद्रियावरही लावावे. उंबराचे पाणी उपलब्ध झाल्यास ५ तोळे रुग्णास प्यावयास द्यावे. मुतखड्याचा त्रास कमी होतो.

किडनीवरही उंबराचा उपयोग केला जातो. हातापायाची जळजळ होणे, अंगात उष्णता वाढणे, यावर उंबराची पिकलेली फळे रोज एक-दोन साखर घालून खावीत. ही फळे किडलेली नसावीत. उंबराची फळे नियमाने खाल्लूयास नाकातून रक्त पडणे, डोके दुखणे आदी त्रासही कमी होतात.

अतिसारामध्ये रुग्णास नेहमी शौच्यास जावे लागते. रुग्ण बेजार होतो. संडास थांबत नाहीत. अशा वेळी उंबराचा चीक ८-१० थेंब साखरेबरोबर रोज घेत जावा. अतिसार दूर होतो.

मुखपाकावर उंबर फारच उपयुक्त आहे. मुखपाक म्हणजे तोंड येते, तोंडास तिखट लागू देत नाही. हिरड्या व दात दुखतात, अन्न गिळताना त्रास्त होतो. त्यावर उंबराच्या पानावरील फोड चावून लाळ गळावी.

गालगुंडावर उंबराचा चीक उपयोगी आहे. गलगंड लहान मुलांना होणारा आजार आहे. दोन्ही गाल सुजतात. गळ्याचा भाग सुजतो, डोळे लाल होतात. अंगात ताप येतो, अशावेळी उंबराचा चीक गालावर लावावा. तसेच उंबराच्या पानाचा काढा सकाळी व संध्याकाळी द्यावा. ७-८ दिवसात हा उपचार केल्यास विकार बरा होतो.

संधिवात, आमवात यावरही उंबराचा उपचार करतात. संधिवातात विशेष करून गुडग्याचे, घोट्याचे सांधे दुखतात. चालताना वेदना होतात. या विकारास एक खारीक घेऊन ती अर्धी कापावी. त्यामधील बी काढून टाकावी. एक मासा अस्सल कवड्या ऊद बारीक करून उंबराच्या चिकात भिजवावा. नंतर हा ऊद खारकेच्या एका भागात भरून खारकेचा दुसरा भाग बसवावा व खारीक दोर्याने बांधावी. गव्हाचे पीठाची कणीक करून ती खारकेवर बसवावी व नंतर ती कणीक भाजावी.

कणीक भाजल्यानंतर वरील कणीक काढून टाकून आतील भाजलेली खारीक दोन वेळा खावी. सांधेदुखी थांबते, हा उपचार करताना उंबर, पिंपळ, वड ह्या वृक्षाच्या साली उगाळून गरम लेप माथ्यावर लावावा. म्हणजे हमखास फायदा होतो.

डोळ्याचे विकार म्हणजे डोके दुखणे, डोळ्याला लाली येणे, डोळ्यातून सतत पाणी येणे. अशावेळी उंबराचा चीक डोळ्याच्या पापणीवर लावावा, ४- ५ दिवस हा उपचार केला असता डोळ्याची लाली नाहीशी होते.

विषदोष्यावरही उंबर अत्यंत उपयोगी आहे. कोणताही विषारी पदार्थ पोटात गेला असता उंबराचे पाणी योग्य प्रमाणात पिण्यास द्यावे, उंबराच्या सालीचा रस तुपात मिसळून दिला तरी गुणकारी आहे.

**औदुंबर जलः-**

उंबराच्या वृक्षाचे पाणी औषधीदृष्ट्या अत्यंत उपयुक्त आहे. हे पाणी शीतल, विषनाशक आहे. हातापायाची आग होणे, डोळ्याची जळजळ, हातापायास खाज सुटणे यावर उंबराचे पाणी (औदुंबर जल) रोज सकाळी व संध्याकाळी एक-दोन तोळे पोटात घ्यावे. विकार, विटाळ साफ न होणे, मासिक पाळीच्या वेळी पोट दुखणे, कंबर दुखणे, अवेळी प्रसुती होणे आदी स्त्रीरोगावर औदुंबर जल घेणे महत्वाचे व हितावह आहे.

वरील उंबराच्या झाडातून हे पाणी मोठ्या प्रमाणात मिळू शकते. उंबराची मुळी उकरून काढावी. मुळीच्या खालचा भाग पोखरून त्याखाली एखादे भांडे बसेल असा खड्डा तयार करावा. मुळीस छिद्र पाडून निघणारे पाणी भांड्यात जमा करावे. भांडे कलईचे किंवा काचेचे असावे. पाणी काढताना भांड्याजवळ बसून देखरेख विषशामक आहे.

दंत विकारात (दात हलणे, हिरड्यातून पू, रक्त येणे) उबराचा चीक १०- १५ थेंब खडीसाखरेची पूड घालून घ्यावा. तसेच भाजल्यावर उंबराची साल थंड पाण्यात उगाळून लावावी. दाह कमी होतो. जखमही' बरी होते. तसेच वांती (उलटी) वर उंबराच्या पानावरील १०-१५ फोड तुपात खलून साखरेसह खाण्यात द्यावे. उलटी थांबते. गोवरमध्ये मुलास उंबराचे पाणी द्यावे.

पान ३ वरून

## ध्यास नवनिर्मितीचा; सुख संपन्नतेचा!

खासकरून मेंदूच्या स्वास्थ्यासाठी आणि मानसिक प्रसन्नतेसाठी जिथे रोज जावे लागते तिथे जाताना एका वाटेने गेलात तर येताना दुसऱ्या वाटेने या. आज काही स्नायूंचा- संधींचा व्यायाम केला असेल तर उद्या वेगळा व्यायाम करा.

स्वयंपाकात आज एक पदार्थ करून बघितला तर उद्या वेगळा पदार्थ करा. तोच तोपणा मनाला ग्लानी आणतो व मेंदू शिथिल आणि माणूस आळशी होतो. त्यामुळे नुकसान होते. यावर एक फार समर्पक संस्कृत सुभाषित आहे. अलसस्य कुतो विद्या, अविद्यस्य कुतो धनम्। अधनस्य कुतो मित्रम्, अमित्रस्य कुतः सुखम।। अर्थ- आळशी माणसाला विद्या म्हणजे ज्ञान कसे मिळणार? ज्याला ज्ञान नाही त्याला धन कसे मिळणार? ज्याच्याजवळ धन नाही त्याला कोण मित्र असणार? आणि ज्याला मित्र नाहीत त्याला सुख कसे मिळणार? तेव्हा सातत्याने नवीन वाचन, मनन, लेखन, भाषण किंवा नवीन निर्मिती करावी व सुखसंपन्नता प्राप्त करावी. (लेखक सायकॉलॉजिस्ट आहेत.)

पान ३ वरून

## खाद्यतेलांचा दणका; रोजगारवाढीचा डंका



एवढेच नाही, तर पुढील वर्षी मान्सूनच्या अनुकूल परिस्थितीमुळे कृषी उत्पादनातही सुधारणा अपेक्षित आहे. 'मॅनपॉवर ग्रुप'चे भारत आणि पश्चिम आशियाचे व्यवस्थापकीय संचालक संदीप गुलाटी म्हणाले की, भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक शक्ती आहे आणि २०२५ च्या पहिल्या तिमाहीमध्ये रोजगाराच्या दृष्टिकोनातून जागतिक आघाडीचे स्थान हे कंपन्या दाखवत असलेल्या आत्मविश्वासाचा पुरावा आहे. भारतात जास्तीत जास्त ४० टक्के रोजगार निर्माण होण्याचा अंदाज आहे. यानंतर अमेरिका ३४ टक्के तर मेक्सिको ३२ टक्क्यांसह अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानी आहे. अर्जेंटिनाची जागतिक सरासरी २५ टक्के एवढी आहे. या सर्वेक्षणात कामाच्या ठिकाणी लैंगिक समानता दिसून आली. सुमारे ३० टक्के कंपन्यांचे म्हणणे आहे की, त्यांनी आपल्या संस्थेमध्ये लैंगिक समानतेचे उद्दिष्ट आधीच गाठले आहे, तर एक वर्षापूर्वी ही संख्या २१ टक्के होती. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

पान ५ वरून

## के कल्चर आणि गुंतवणूक

के कल्चर आणि गुंतवणूक अशाही अर्थाने! कोरियन वेशभूषा, कोरियन संस्कृती याच्या बरोबरीने कोरियन पदार्थ के कल्चरने जगभर पोचवले. सुजोसारखे बियर सदृष्य पेयाला जगभर वाढलेली मागणी आणि त्यातून एकंदरीतच कोरियन अन्न पेय, प्रक्रिया वाढती गुंतवणूक हे त्याचे परिणाम आहेत. इतकेच नव्हे तर असे कोरियन अन्न पदार्थ खाण्याची पद्धत, जेवणाची आसन व्यवस्था व त्यातील बुटकी स्टुले आणि सतरंज्या हाही एक गुंतवणुकीचा विषय बनला आहे.

गुंतवणूक क्षेत्रातील Hortical d Vertical Integration चे हे भन्नाट उदाहरण आहे.

**के कल्चर आणि गुंतवणूक अशाही अर्थाने!**

कोणत्याही गुंतवणुकीला सुरक्षितता लागते. दिवसाचे चोवीस तास स्वतः ची प्रायव्हसी जपत निर्धोकपणे फिरणारी कोरियन माणसे, अगदीं महिला सुध्दा, कोरियन मलिकामधून दाखवले जातात. त्यातून आम्ही केवळ माणसांची (नागरिकांची आणि पर्यटकांचीही) काळजी घेतो असे नव्हे तर त्यांच्या गुंतवणुकीचीही काळजी घेण्यास सक्षम, समर्थ आणि दक्षही आहोत असा संकेत के कल्चर देत असते. गुंतवणूक करताना आपणही असे सुरक्षिततेचे संकेतच शोधत असतो ना?

**के कल्चर आणि गुंतवणूक अशाही अर्थाने!**

सकृतदर्शनी हा मुद्दा हास्यास्पद वाटेल, पण के कल्चरवाल्या कोरियन मालिकेतला कोणताही, अगदीं एकसुद्धा, भाग या ना त्या प्रकारे कोरियन टॉयलेट्स आणि कोरियन समाज यांच्या स्वच्छतेच्या वेदाचे दर्शन प्रदर्शन केल्याशिवाय पूर्ण होत नाही.

अगदी अलीकडेच जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार करमणूक, पर्यटन याच्या खालोखाल ज्या क्षेत्रात विदेशी गुंतवणूक होते ते क्षेत्र म्हणजे Hygine! आणि कोरियाने केलेल्या विदेशी गुंतवणुकीत अग्रस्थान याच क्षेत्राला आहे. के कल्चर आणि गुंतवणूक अशाही अर्थाने सरतेशेवटी, के कल्चरचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे त्याची त्रिसूत्री... सफर आधिक सुरक्षितता आधिक स्वच्छता. योगायोग असेल का बरोबर हीच तीन क्षेत्रे सध्या आपल्या देशाच्या गुंतवणूक क्षेत्रात अग्रेसर आहेत. के कल्चर आणि गुंतवणूक अशाही अर्थाने आणि के कल्चरचे जणू काही घोषवाक्य असावे असे धोरण म्हणजे कोणाचे काय वाईट आहे हे फक्त सूचित करावे आणि कोणाचे काय चांगले आहे यावर लक्ष पूर्णपणे केंद्रित करावे. आपल्या मराठीत म्हण आहे ना... अपमान सांगावा कानात आणि अभिमान सांगावा जनात. एकदम तसे आहे हे ... हे गुंतवणूक क्षेत्रातही उपयोगी पडणारेच आहे. के कल्चर आणि गुंतवणूक अशाही अर्थाने!

पान २ वरून

## रूपेरी कारकीर्द, डॉक्टरांची !

१९८२ सालच्या 'बेमिसाल' या चित्रपटात उपकाराच्या ओझ्याखाली दबलेल्या आश्रित डॉक्टरने आपल्या उपकारकर्त्याच्या डॉक्टर मुलाला शिक्षेतून वाचविण्याची कथा आहे. वैद्यकीय नीतिमत्ता व अवाजवी वैद्यकीय शुल्क यावर या चित्रपटात सविस्तर चर्चा केलेली आहे आणि समाजाच्या बदलत्या परिप्रेक्ष्याचीही यथोचित कारणमीमांसा केली आहे. पण, भारतीय नोकरशाही, समाजप्रवृत्ती अणि प्रामाणिक व्यक्तीचे होणारे अनन्वित जाच यांचा अंतर्बाह्य हेलावून टाकणारा अनुभव म्हणजे 'एक डॉक्टर की मौत' (१९९१) हा तपन सिन्हा दिग्दर्शित अप्रतिम चित्रपट.

भारतात 'परीक्षण नळी बालक व कृत्रिम गर्भधारणा' यासाठी आयुष्य झोकून देणाऱ्या डॉ. सुभाष मुखोपाध्याय यांच्या हृदयद्रावक आयुष्यावर व त्यांच्या वाट्याला आलेली अक्षम्य कुचेष्टा, हेटाळणी व अवहेलना यावर आधारित या चित्रपटात कुष्ठरोगावर प्रभावी लस बनवण्याचा ध्यास घेतलेल्या डॉ. दीपांकर रॉय यांची कल्पित असूनही संपूर्णतः वास्तविक वाटणारी कथा अतिशय कुशलतेने चितारली आहे. समाजाच्या सर्वच क्षेत्रात बोकाळलेली भ्रष्टाचारी वृत्ती, लालफीतशाही, पाय ओढण्याची प्रवृत्ती, शासकीय अनागोंदी, प्रशासकीय बेपर्वाई आणि या सर्व उबग आणणाऱ्या वातावरणात संवेदनशील व प्रामाणिक व्यक्तीची होणारी कुचंबणा व कुतरओढ ज्या प्रकारे वैद्यकीय व्यवसायाच्या अती-स्पर्धात्मक, प्रचंड धंदेवाईक पृष्ठभूमीवर मांडली आहे त्याला तोड नाही. पंकज कपूर यांच्या प्रत्ययकारी अभिनयाबद्दल लिहायला शब्द अपुरे पडतात. कॅन्सरने मृत्युमुखी पडलेल्या नर्गिसच्या स्मृतीस आदरांजली वाहण्यासाठी सुनील दत्त यांनी 'दर्द का रिश्ता' (१९८२) या चित्रपटाची निर्मिती केली होती. भारतात कर्करोगाप्रती जागरूकता घडवून आणण्याचे कार्य व विशेषतः टाटा मेमोरियल इस्पितळाचे कार्य समाजापुढे आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या चित्रपटाने केले, हे निश्चित. परंतु, हसत-खेळत वैद्यकीय प्रवेश, वैद्यकीय क्षेत्र, सुसज्ज इस्पितळे, डॉक्टरांची मनोवृत्ती यावर झगझगीत प्रकाश टाकण्याचे श्रेय जाते ते 'मुन्नाभाई एमबीबीएस' (२००३) या चित्रपटास. अतिशय मनोरंजक व तेवढाच उद्बोधक चित्रपट.. दिग्दर्शक राजकुमार हिरानी यांची कमालीची कामगिरी..! मनोचिकित्सक व त्यांच्याविषयी समाजात असलेले समज-अपसमज यांचा सकारात्मकरीतीने पराम र्श घेतला होता तो गौरी शिंदे दिग्दर्शित 'डिअर जिंदगी' (२०१६) चित्रपटाने तर 'विकी डोनर' चित्रपटाने एका वेगळ्या वैद्यकीय विषयास तोंड फोडले होते. वीर्य अधिकोष व वीर्यदाते या संकोच आणणाऱ्या विषयावरचा हा एक महत्त्वपूर्ण चित्रपट होता. तीच बाब, पुरुष स्त्रीरोग-तज्ज्ञास विषयाच्या शिक्षणात व व्यवसायात येणाऱ्या अडचणींचा विनोदी अंगाने वेध घेणाऱ्या 'डॉक्टरजी' (२०२२) या चित्रपटाची! गर्भनिरोधक साधनांप्रती जागरूकता निर्माण करणारे 'हेल्मेट' (२०२१), 'जनहित मे जारी' (२०२२), 'छतरीवाली' (२०२३) हे काही अलिकडील चित्रपट. विषयाला थेट भिडणारे व धाडसी असे हे चित्रपट..! आपल्या बेबंद जीवनशैलीने व पराकोटीच्या संतापी वृत्तीने वैद्यकीय कारकीर्द संपुष्टात आलेल्या डॉक्टरची कथा होती, 'कबीर सिंग' (२०१९) या चित्रपटात.

सेवाभावी डॉ. अल्बर्ट श्वाईटझर, ज्यांनी आफ्रिकेत वैद्यकीय सेवेत आपले आयुष्य वेचले त्यांच्या जीवनावर व शिकवणीवर आधारित 'हिमालय की गोद मे' (१९६५) या चित्रपटाचा व हिरोशिमानागासाकी अणुबॉम्ब पीडितांच्या सेवेस गेलेल्या एका भारतीय डॉक्टरची कल्पित कथा असलेल्या 'अमन' (१९६७) या चित्रपटाच्या उल्लेखाशिवाय हा लेख अपूर्ण राहील. तूच त्राता, तूच जीवनदाता माणुसकीचा उद्गाता, वैद्यराजा... (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

सकारात्मकतेचे तत्वज्ञान

डॉ. नितीन ह. देशपांडे

deshapandenh@gmail.com


# कार्यस्थळावर मानसिक आरोग्य (भाग दुसरा)

## सकारात्मकतेचे तत्वज्ञान २४७




मागील भागात ऊर्जेचे काही घटक आणि त्यांचे मानसिक आरोग्याशी असलेले नाते बघितले. आणखी काही घटकांची चर्चा आज येथे करू या...

**मानसिक ऊर्जा-**

* ईमेल, संगणक, व्हाट्सअप मधून मधून बंद ठेवावे आणि मेंदूला अतिविचाराचा, अनावश्यक माहितीच्या पुरवठ्याचा खुराक थांबवावा. जे आतमध्ये ढकलले आहे, ते पचायचा, त्याचा निचरा होण्याचा कालावधी जाऊ द्यावा. संगणक/भ्रमणध्वनी, दूरचित्रवाणी यांच्या पडद्यासमोरील धबधब्याला आवर घालावा. विशेषत: ज्या कामाच्या वेळी अतिशय एकाग्रतेची मागणी असते (वाहन चालविताना, पेपर्स तपासताना इ.) त्यावेळी लक्ष विचलित करणाऱ्या व्यवधानांना टाळावे. प्रत्येक ठिकाणी मल्टी टास्किंग करण्याची जी सवय लागलेली आहे, तिच्यामुळे येणाऱ्या शिणवट्याला हाताळायला शिकावे.

* व्यवसायानिमित्त आणि व्यक्तिगत आयुष्यातील ज्या ईमेल, संगणक, व्हाट्सअप यांचा अपरिहार्य वापर होतो, त्यांच्यासाठी विशिष्ट वेळ राखून ठेवावा. एक दिवस भ्रमणध्वनीला विश्रांती असे,

उपक्रम जाणीवपूर्वक अंमलात आणावेत आणि शरीराचे निर्विषीकरण जसे एरंडेल घेऊन ठराविक कालावधीनंतर आपण करतो, तसे मनाचे निर्विषीकरण करावे.

* दिवसाखेरी दुसऱ्या दिवसाचे, कामांचे, वेळेचे अंदाजे नियोजन करावे.

**अध्यात्मिक ऊर्जा -**

दिवसभरातील कोणत्या प्रहरात आपल्या हातून सर्वोत्तम काम होते, याचा धांडोळा घ्यावा. कोणती कामे करताना ताजेतवाने वाटते आणि त्यावेळी स्वत:मधील कोणत्या क्षमता परिपूर्णतेने वापरल्या जातात यावरही लक्ष ठेवावे. कामावरून घरी परतताना सौम्य संगीत ऐकावे, घरी आल्यावर शवासन करावे. श्लोकश्रवण करावे. स्वत:ची मूल्ये शोधावीत आणि त्यांचा वापर दैनंदिन जीवनात आवर्जून करावा. स्वत:बरोबर वेळ घालविण्याची एकही संधी सोडू नये.

**मानसिक आरोग्य टिकवायचे असेल तर खालील मार्गाने जावे लागते-**

**व्यक्तिगत पातळीवरचे उपाय-**

प्रशिक्षणाद्वारे आकलन, विचारप्रवाह, मानसिकता बदलणे. तणावाचे परिणाम हाताळण्यासाठी ध्यान, मनानुभूती यांची मदत घेणे संस्थात्मक पातळीवरचे **उपाय-**

कामाची संरचना, पद्धत बदलणे,

कर्मचारी सहभाग वाढविणे,

कार्यस्थळावरील परिस्थिती बदलणे, कर्मचारी-केंद्रित करणे नव्या कार्यप्रणालींचा वापर जेवणाच्या सुटीत खेळ, ग्रंथालय आदी सुविधा पुरविणे म्हणजे कामाच्या वेळेत विविधता येईल आणि निरसपणा कमी होईल.

संस्थेच्या आवारात ध्यानमंदिर, व्यायामशाळा अशा सोयी उपलब्ध करून देणे कर्मचाऱ्यांना मानसिक आरोग्य अबाधित ठेवायचे असेल तर कार्यस्थळावरील मन:स्ताप हाताळण्याचे दोन मार्ग-

**(अ) मनानुभूती (माइंडफुलनेस) -** टेट्रिक आणि विन्स्लोव यांनी २०१५ साली त्यांच्या शोधनिबंधात मनानुभूती भावनिक शीण घालवते, निद्रेची गुणवत्ता सुधारते आणि कामातील रुची वाढविते असे विधान केले आहे. मनानुभूती कदाचित आपल्याला परावलंबी तंत्र वाटू शकते पण ते बदल स्वीकारण्याच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल असते. मन:शांतीसाठी आवश्यक असते वर्तमानात जगणे, क्षणस्थ असणे. शापिरो यांच्या मते जीवनात आनंदक्षण आणण्याचे हे प्रभावी तंत्र आहे. ते म्हणतात एवढ्या तीन गोष्टींचा सराव करा-

**हेतू -** कां लक्ष द्यायचे?

**लक्ष-** वर्तमानात असणे

**स्वभाव-** आपण लक्ष कसे देतो? (अनुकंपा, करुणा, तथाकथित क्षुद्रीकरण की अन्य प्रकाराने?)

**(ब) प्रतिसादाची पुनर्रचना -** नकारार्थी प्रभावांची सवय झाल्यावर आपण सहसा विसरू शकतो की समस्याविहीन आयुष्य अशक्य आहे. थोड्या प्रमाणात कामाचे दडपण असणे आपल्या व्यक्तिगत आणि व्यावसायिक वाढीसाठी आवश्यक असते. आपण ज्याला महत्व देतो, त्याची आठवण करून देण्याचे काम हे दडपण करीत असते. तणाव चांगला ही मनाची चौकट स्वीकारणारी मंडळी बरेचदा अधिक चांगल्या अनुभवांना सामोरी जातात आणि त्यांच्या वाट्याला अनारोग्याच्या समस्या कमी येतात हे निरीक्षण २०१८ चे आहे.

**हे शक्य करणे तीन टप्प्यांमध्ये संभवते-**

(अ) जाणणे - धास्ती, चिंता नाकारण्यापेक्षा ती ओळखा. उदा.-

१. माझी नोकरीची मुलाखत कशी होईल याची मला विवंचना वाटते.

२. अंतिम निर्णय काय लागणार या काळजीने मला झोप येत नाही.

यामुळे मेंदूच्या क्रिया प्रतिक्षिप्त होण्यापेक्षा आणि प्रतिक्रियावादी न होता त्यांना काळजीपूर्वक आणि जाणीवपूर्वक करता येतात.

**(ब) स्वीकार करणे -** ज्याची काळजी वाटते आणि ते का महत्वाचे आहे हे जाणून घेतले की ते तसे कां आहे आणि खरोखरच तितके महत्वाचे आहे कां याचा स्वीकार सोपा होतो. तिथून सकारात्मक उन्नयीकरणाला सुरुवात होते.

**(क) उपयोगात आणणे -** आपण जे काम करतो ते आपल्या हत्येसाठी नसते तर त्यामुळे आपल्या मनाला, शरीराला चालना मिळते आणि भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आपण सज्ज होतो.

आपल्या ऊर्जेची पुनर्बांधणी केली की आपले प्रतिसाद सकारात्मक होऊ लागतात. साहजिकच आपली कार्यक्षमता वाढते.

मानसिक आरोग्याचे विचार ताणतणाव ही अंतिमत: निवड असते. पण आर्मस्ट्राँग यांनी असे नमूद केलेलं आहे की दडपण हे कायम नकारार्थी मानले जाते. निरुपयोगी आस्था, विचार माणसांना दुष्टचक्रात अडकवतात. पण सकारात्मक दृष्टिकोनातून बघितले तर कामातील जोखमींचे उच्चाटन करणे शक्य होते आणि कर्मचाऱ्यांची मानसिकता सुधारते. यासाठी संस्था खालिलप्रकारचे उपक्रम हाती घेऊ शकतात-

१) मतभेदांचे नियमन

२) कर्मचारी भरभराटीचे प्रकल्प / योजना

३) कामाची पुनर्रचना

४) जुळवून घेण्याची क्षमता वाढविणे

५) कर्मचाऱ्यांना मदतीचे अभियान उदा- समुपदेशन, सुरक्षेचे आश्वासन कार्यस्थळावरील तानेबाने म्हणजे राहायचे समुद्रात आणि सतत लढावे तर लागते लाटांशी!

शारीरिक आणि मानसिक आरोग्य जपायचे तर वरील विधान लक्षात ठेवावे लागते. कारण आपली उत्पादकता आणि कार्यक्षमता आपल्याला जपायची असते. जर नियमनाचे चाक हाती ठेवून परिस्थिती हाताळता आली तर ताणाला कारणीभूत असलेल्या घटकांचा प्रभाव कमी करता येतो. जे आपल्या आवाक्यात आहे त्याच्यावर नियंत्रण ठेवणे आणि तसे जमत नसेल तर घटना/प्रसंग यांच्याकडे बघण्याचा चष्मा बदलणे एवढे तरी आपल्या हातात नक्कीच असते. मनोभूमी नांगरून ठेवली तर अडचणींमधूनही चांगले पीक काढता येते. मदतीला प्रभावी तंत्रे विकसित झालेली आहेत, त्यांचा वापर केला तर इवाय मधील ऍना सारखा प्रसंग नक्कीच टाळता येतो आणि टोकाची भूमिका घेण्याची गरज नसते. बाह्य बदलांचा वेग, आतमधील बदलांच्या वेगाला मागे टाकतो, तेव्हा तिथे ताण निर्माण होतो. पण स्वयंपाकघरात काम करणाऱ्या स्त्रीने तेथील उष्ण वातावरणाबद्दल तक्रार करायची नसते.

पुण्याच्या इवाय मधील सनदी लेखापाल (सीए) असलेल्या २६ वर्षीय ऍना सेबॅस्टिअन पेराईल च्या मृत्यूचे कारण बॅकब्रेकिंग वर्कलोड आणि वर्क स्ट्रेस असल्याचा दावा तिच्या आईने कंपनीच्या चेअरमनला लिहिलेल्या पत्रात केल्यावर आणि या मृत्यूसाठी कंपनीचे टॉक्सिक वर्क कल्चर जबाबदार आहे हे मानून सर्व पातळ्यांवर हात नव्याने लिहिते झाले. काम मोजण्यासाठी आमच्याकडे इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग आहे पण ताण अजूनही मोजला जात नाही- तो शरीर आणि मन सहन करीत राहते आणि एका मर्यादेपलीकडे ताण गेला की सुचतील ते मार्ग शोधले जातात. थ्री इडियट्समध्ये अमीरखानचा मित्र प्रोजेक्ट साठी डेडलाईन वाढवून दिली नाही म्हणून स्वत:ला गळफास लावून घेतो आणि तारुण्यात जीवन संपवतो. स्मशानात अमीर बोम्मन इराणीला सुनावतो-

आपल्याकडे ताण मोजण्याचे यंत्र नाहीए अन्यथा -------- ऍनाचाही ताण मोजण्याचे परिमाण नाही, म्हणून शांतपणे इवायचा चेअरमन व्यावसायिक उत्तर देऊन स्वत:चा बचाव करून घेतो.

अर्थात सगळेच कॉर्पोरेट याच मार्गाने जातात. छापील उत्तर आणि कदाचित तात्पुरती डागडुजी (पावसाळ्याआधी खड्डे बुजविण्यासाठी रस्त्यांची करतो तशी) केली जाईलही- योगा सेशन्स, आऊट बाऊंड प्रशिक्षण, समुपदेशकांच्या नेमणूकी, स्टॅगर्ड वीकली ऑफ, वैद्यकीय सेवांचा परीघ वाढविणे, फ्लेक्सि अवर्स इत्यादी एच आर फंडे वापरले जातील. फारतर शक्य ते कॉम्पेनसशन तिच्या कुटुंबियांना दिले जाईल आणि पुन्हा दुसरी ऍना जीवन संपवीत नाही तोवर हे पॅचवर्क सुरु राहील. ताणाच्या समस्येच्या तळाशी जाऊन आर सी ए (रूट कॉज ऍनॅलेसीस) करण्याच्या फंदात कोणी पडणार नाही. हळूहळू अशा घटना स्पोरॅडिक वर्गातून क्रोनिक वर्गात ढकलल्या जातील.आणि अरण्यरुदन संपेल- कोणालाही, काहीही वाटणार नाही. कोरोनाला आपण असंच स्वीकारलं नव्हतं कां?

आणखी एक बेवकूफ कल्पना गेली काही वर्षे कॉर्पोरेट विश्वात धिंगाणा घालतेय-

**वर्क -लाईफ बॅलन्स !**

**लक्षात ठेवा-** वर्क इज स्मॉल कंपोनंट ऑफ लाईफ. मग एक तुकडा आख्ख्या संकल्पनेशी कसा एक्रेट करता येईल? त्यापेक्षा मी सुचवितो- आपला चोवीस तासांचा दिवस पर्सनल लाईफ (पूर्णतया व्यक्तिगत, कुटूंबियांसमवेत) आणि प्रोफेशनल लाईफ (काम, नोकरी, शिक्षण, व्यवसाय इत्यादी) या दोन कप्प्यांमध्ये विभागावा. पुन्हा तो बारा-बारा तास समजणे चुकीचे आहे. जोपर्यंत दिवसाचे तास चोवीसच आहेत तोपर्यंत कधी पर्सनल लाईफ दिवसाचा मोठा हिस्सा व्यापेल तर कधी प्रोफेशनल लाईफ.

**सध्याचे प्रमाण-** दिवसाचे साधारण १४ ते १६ तास प्रोफेशनल आयुष्याने व्यापलेले असतात. हे व्यक्तिगत जीवनावर निश्चितच अतिक्रमण आहे, पण सतत हेच प्रमाण राहीले तर ते नक्कीच जाचक होईल. पण आपणच उत्तरे शोधायची आहेत कारण जीवन आपले आहे. इवाय ला दुसरी ऍना मिळेल (त्यांचा चेअरमन तोऱ्यात सांगतो- भारतात आमच्याकडे १ लाख कर्मचारी आहेत) पण तिच्या कुटुंबियांना मात्र तिच्याविना पुढील आयुष्य काढावे लागेल. कर्मचाऱ्याने एवढेच लक्षात ठेवायचे असते कारण सत्य इतकेच असते. राईट टू डिस्कनेक्ट या पर्यायाचाही त्यामुळे गंभीरपणे विचार सुरु झालेला आहे.

थोडक्यात कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाच्या तासांनंतर घरी संपर्क करू नये आणि त्यां व्यक्तिगत आयुष्यात ढवळाढवळ करू नये. त्यामुळे काम आणि व्यक्तिगत आयुष्य यांच्यामधील सीमारेषेचे उल्लंघन होते आणि त्याचा परिणाम कार्यक्षमतेवर होऊ शकतो. तातडीच्या कामासाठी अनेकदा कंपन्या कामाच्या तासांनंतरही कर्मचाऱ्यांना क्षुब्ध करतात- विशेषत: कर्मचारी जर कॉलनी किंवा क्वार्टर्समध्ये जवळच राहात असेल तर रात्रीबेरात्री त्याच्या घरी माणसे पाठवून पुन्हा कार्यालयात/विभागात बोलावून घेतले जाते. असे संपर्क रजेच्या काळात, साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी हमखास साधले जातात. या पर्यायावर गांभीर्याने अंमल केला पाहिजे.मन चिंती ते वैरी ना चिंती त्यामुळे मानसिक आरोग्य जपायचे असेल तर मनाला जपायला शिकणे इतकेच संक्षिप्त आणि सर्वंकष उत्तर संभवते.




# माती जपली नाही, तर...!

भारतात शेती हा अजूनही बहुतांश लोकांच्या उपजीविकेचा स्रोत आहे. १.७८ दशलक्ष चौरस किलोमीटर क्षेत्रामध्ये पसरलेल्या जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या कृषी प्रणालीचा आधार आहे. मातीची धूप होण्याची गंभीर समस्या धान्य उत्पादना-वरच परिणाम करत नाही, तर हवामान बदलाच्या युगात अनेक समस्यांचे मूळ बनत आहे. त्यात प्रामुख्याने पर्यावरणीय असंतुलनाचा समावेश होतो.




पर्यावरण

मिलिंद बेंडाळे


माती किंवा जमिनीच्या वर उपलब्ध असलेले सैल आणि मऊ घटक बियाणे अंकुरित करतात, मुळे फुटतात आणि झाडे आणि पिके वाढवतात. ही आपल्या पृथ्वीवरील जीवनाची प्रातिनिधिक ओळख आहे.

आजच्या युगात आठ अब्ज लोकांसाठी अन्न उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी बिघडत चाललेल्या परिसंस्थेचा समतोल राखणे आवश्यक आहे. हवामान संकट मोठ्या प्रमाणात कमी करण्यासाठी झाडे आणि पिके हा एक मजबूत सक्षमकर्ता आहे; परंतु आज निसर्गाचे अस्तित्व, स्थिर आणि जंगम आणि प्राण्यांसाठी पोषक माती गंभीर धोक्यात आहे. मोठ्या प्रमाणावर मातीची धूप केवळ कृषी उत्पादन आणि अन्न सुरक्षेवर परिणाम करत नाही, तर हवामान बदलाची समस्या अधिक व्यापक आणि जटिल बनवत आहे. मातीचा ऱ्हास, उत्पादन क्षमतेत घट आणि आधुनिक कृषी पद्धतींमुळे या समस्येची व्याप्ती दिवसेंदिवस नवीन क्षेत्रांमध्ये पसरत आहे. मातीच्या वाढत्या समस्येची समज विकसित झाली आहे; परंतु अद्याप ती सोडविण्यासाठी प्रभावी कृती आराखडा तयार झालेला नाही. मातीची धूप हा चिंतेचा विषय आहे. मातीची गुणवत्ता कमी होणे, क्षार जमा होणे, विषारी रसायनांनी दूषित होणे आणि पीक उत्पादन क्षमता कमी होणे या गोष्टी मातीची धूप होण्याच्या कक्षेत येतात. मातीची धूप सामान्यत: आधुनिक सघन शेतीच्या व्यापक पद्धती, खते आणि विषारी कीटकनाशकांसह रसायनांचा अंदाधुंद वापर, पारंपरिक जमिनीच्या वापरात व्यापक बदल, जंगलतोड, पूर, दुष्काळ, पाणी साचणे आणि हवामानातील बदलांमुळे उद्भवते. 'नॅशनल ब्यूरो ऑफ सॉईल सर्व्हे'नुसार, भारतातील सुमारे एक तृतीयांश माती म्हणजे सुमारे १२० दशलक्ष हेक्टर मातीची धूप झाली आहे. तिचा एक महत्त्वपूर्ण भाग सागरी क्षारीकरणामुळे प्रभावित झाला आहे. भारतातील बहुतेक राज्ये मातीची धूप होण्यामुळे प्रभावित आहेत.

पंजाब, हरयाणा, गुजरात, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा सर्वाधिक प्रभावित झाले आहेत. मोठ्या प्रमाणावर मातीची धूप होत असूनही, तंत्रज्ञानावर आधारित शेतीमुळे अन्न उत्पादनात वाढ झाली आहे. भारत आता कृषी उत्पादनाचा दुसरा सर्वात मोठा उत्पादक देश आहे. अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण आहे; परंतु कुपोषण ही अजूनही एक गंभीर समस्या आहे. पुराच्या वेळी मोठ्या प्रमाणावर मातीची धूप आणि बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात जमिनीचा वापर, रासायनिक खतांच्या मोठ्या प्रमाणावर वापरामुळे क्षारता जमा होणे, वाढती आम्लता आणि पाणी साचणे इत्यादींमुळे शेतीयोग्य जमिनीचा मोठा भाग नापीक होत आहे; परंतु मातीची अशीच झीज होत राहिल्यास, येत्या काही वर्षांमध्ये अन्न आयात करावे लागेल. जगातील केवळ २.४ टक्के भूभाग असलेला भारत जगाच्या १८ टक्के लोकसंख्येला अन्न पुरवतो. अनियंत्रित शेतीव्यतिरिक्त मातीची धूप होण्याची प्रमुख कारणे म्हणजे मोठ्या प्रमाणावर शहरीकरण आणि औद्योगिकीकरणाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी जमिनीच्या वापरात होणारा व्यापक बदल. त्यात अविवेकी जंगलतोडदेखील समाविष्ट आहे. यासोबतच जनावरांच्या संख्येच्या बाबतीतही भारत हा सर्वात मोठा देश आहे. जनावरे चरताना जमिनीच्या वरच्या वनस्पती थराचा ऱ्हास होतो. वनस्पती काढून टाकल्यामुळे मातीचा वरचा थर कमकुवत होतो आणि पाऊस तसेच वाऱ्यामुळे मातीची धूप होते.

भारत हा लोकसंख्येच्या दृष्टीने जगातील सर्वात मोठा देश आहे आणि दीड अब्ज लोकांच्या पोटापाण्यासाठी लागणारे धान्य उत्पादन करण्यासाठी कृषी व्यवस्थेवर सतत दबाव असतो. या सर्वांचा परिणाम संपूर्ण कृषी व्यवस्थेच्या मुळाशी असलेल्या मातीवर होतो. स्वातंत्र्यानंतर अन्नधान्याची वाढती गरज आणि अन्नधान्यासाठी परदेशावरील अवलंबित्व लक्षात घेऊन हरित क्रांती राबविण्यात आली. हा प्रयोग प्रामुख्याने कृत्रिम सिंचन, रासायनिक खते, कीटकनाशके आणि संकरित बियाण्यांवर आधारित होता. कोणत्याही देशात अधिकाधिक पिकांचे उत्पादन घेताना जमिनीची सुपीकता मागे पडते. सतत एकाच प्रकारचे पीक घेऊन अधिकाधिक धान्य तयार होऊ लागले. त्यामुळे जमिनीतील नैसर्गिक पोषक तत्त्वे कमी होऊ लागली. जमिनीची सुपीकता टिकविण्यासाठी रासायनिक खतांच्या अंदाधुंद वापरामुळे जमिनीतील सूक्ष्मजीव व सेंद्रिय पदार्थ नष्ट झाले.

सध्या शेतीमध्ये ९४ टक्के रासायनिक खतांचा वापर केला जातो. रासायनिक कीटकनाशके आणि खतांच्या अतिवापरानेही शेतात आणि पिकांना विषबाधा झाली. भारत हा कीटकनाशकांचा सर्वात मोठा उत्पादक आणि वापरकर्तादेखील आहे.

हरितक्रांतीच्या काळात आपले अन्नधान्य उत्पादन ५० दशलक्ष टनांवरून ३०० दशलक्ष टनांपर्यंत वाढले; परंतु हे यश सुपीक मातीची किंमत मोजून मिळालेले दिसते. अशा परिस्थितीत जलद मातीचा नाश भारताच्या वाढत्या लोकसंख्येसाठी अन्न सुरक्षेचे गंभीर संकट निर्माण करू शकते. मातीची धूप झाल्यामुळे जमिनीची उत्पादकता कमी होतेच; पण नैसर्गिकरीत्या जमिनीत असलेल्या कार्बनचे प्रमाण कमी झाल्यामुळे पाणी शोषून घेण्याची आणि धरून ठेवण्याची क्षमताही मोठ्या प्रमाणात कमी होते. परिणामी पाऊस आणि इतर स्रोतांमधून पाण्याचे पुनर्भरण लक्षणीय प्रमाणात कमी होते. त्यामुळे भारतातील भूजल पातळी मोठ्या प्रमाणात कमी होते. हेदेखील ऱ्हास आणि दुष्काळाच्या वाढत्या समस्येत दिसून येते; विशेषत: हरयाणा आणि पंजाब या पश्चिमेकडील राज्यांमध्ये. भारतातील सर्वात मोठ्या धान्य उत्पादक राज्यांमध्ये पाण्याची पातळी धोकादायकरीत्या कमी झाली आहे. कृषी-आधारित अर्थव्यवस्था भारताचे जागतिक आर्थिक चढ-उतारांपासून संरक्षण करते, म्हणूनच गेल्या काही दशकांमध्ये आलेल्या मोठ्या जागतिक मंदीच्या काळातही भारतीय अर्थव्यवस्थेवर फारसा परिणाम न होता वेगाने वाढ होत राहिली.

एकूणच असे म्हणता येईल की, मातीची धूप 'डोमिनो इफेक्ट' आहे. त्यामुळे नैसर्गिक, सामाजिक आणि आर्थिक प्रक्रियांवर नकारात्मक परिणाम होतो. हे स्पष्ट आहे की, आजच्या काळात माती हे सर्वात महत्त्वाचे संसाधन आहे. भारतासारख्या देशासाठी ती केवळ पोट भरण्यासाठी आवश्यक नाही, तर संपूर्ण अर्थव्यवस्थेचा आधार आहे. मानवी जीवनासाठी आणि अर्थव्यवस्थेसाठी सर्वात महत्त्वाची साधनसंपत्ती असलेली माती आजच्या काळात सर्वात दुर्लक्षित संसाधन बनली आहे, हे सत्य स्वीकारण्यात अजिबात संकोच नसावा. अशा परिस्थितीत नैसर्गिक पद्धतीने जमिनीची सुपीकता परत आणण्याची गरज आहे. त्यासाठी आपल्याला मातीचे भौतिक, रासायनिक आणि जैविक आरोग्य पुनर्संचयित करावे लागेल. ही एक दीर्घकालीन आणि गुंतागुंतीची प्रक्रिया आहे.

सेंद्रिय घटक म्हणजेच कार्बन गमावून सुपीक झालेली माती बायोमासने भरण्याची गरज आहे. सध्या वापरल्या जात असलेल्या एकूण खतांपैकी फक्त सहा टक्के ही सेंद्रिय स्रोतांची खते आहेत. त्यामुळे रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून सेंद्रिय खतांवर आधारित शेतीला प्रोत्साहन देण्याची गरज आहे; मात्र यामध्ये धान्य उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. भारत हा केवळ कृषिप्रधान देश नाही, तर समृद्ध निसर्गकेंद्रित कृषी परंपरादेखील आहे. ती मातीची क्षमता, हवामान, पाण्याची उपलब्धता यांच्या सुसंवादावर आधारित आहे. ती पुनरुज्जीवित झाल्यास माती, पाणी आणि हवेची गुणवत्ता पुन्हा रुळावर आणली जाऊ शकते; पण त्यासाठी माती, पाणी आणि सार्वजनिक आरोग्य केंद्रस्थानी ठेवून आणि शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन धोरणे आखावी लागतील. त्यासाठी वैज्ञानिक विचारांची, तंत्रज्ञानाचा योग्य वापर करण्याची आणि प्रबळ राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. गेल्या काही दशकांमध्ये सरकारी पातळीवर केलेले प्रयत्न हे केवळ कृषी उत्पादन आणि त्याच्या आर्थिक पैलूंवरच राहिले आहेत. मातीचे आरोग्य हा शेतकऱ्यांच्या अजेंड्यावरचा विषय दिसत नाही, हे अलिकडच्या काही शेतकरी आंदोलनांच्या मागणीवरून समजू शकते. मातीची स्थिती बिघडण्याच्या जटिल समस्येवर कोणताही सोपा उपाय नाही आणि माती आणि पाण्याची समस्या आमच्या शेतातून भोजन थाळीपर्यंत पोहोचली आहे. अशा परिस्थितीत या भीषण समस्येची दखल घेऊन शासन, समाज आणि वैयक्तिक पातळीवर प्रयत्न करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.

(लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)





# सरणारे वर्षे आणि संपणाऱ्या भाषा

**याग्रोरियन वर्षाची लवकरच सांगता होणार आहे. सरत्या वर्षाबरोबर अनेक गोष्टी संपतात. या संपणाऱ्या गोष्टींपैकी काही गोष्टी अशाही असतात की, काळ त्यांना गिळंकृत करतोय हे सहसा कुणाच्या लक्षातही येत नाही. अशाच गोष्टींपैकी एक म्हणजे भाषा! दरवर्षी अनेक भाषा सरत्या वर्षासोबत या जगाचा निरोप घेतात. २०२४ सुद्धा तांडिया, मावेस आणि लुहू यांसारख्या काही भाषांसाठी, निरोपाचे वर्ष ठरणार असल्याची शक्यता गूगलवर उपलब्ध असणार्या काही ऑनलाईन संशोधनांमध्ये वर्तवली गेली आहे.**

विशेष
**दिपाली कानसे**

भाषा संपते किंवा नामशेष होते म्हणजे काय होते, तर ती भाषा बोलणारी शेवटची व्यक्ती मृत पावते किंवा मग त्या भाषेचा भाषिक समूह, ती भाषा बोलणेच बंद करतो. भाषा ही माणसाशी त्याच्या जन्मापासूनच जोडली गेलेली असते.

'मानवी भावना व्यक्त करण्यासाठी अस्तित्वात आलेली ध्वनिचिन्हांनीयुक्त यादृच्छिक संकेतव्यवस्था म्हणजे भाषा', अशी ढोबळमानाने आपण तिची व्याख्या करतो. त्यामुळे जोपर्यंत माणूस आपल्या भावना त्याच्या भाषेत व्यक्त करत असतो, तोपर्यंतच त्या भाषेला अस्तित्व असते. यामना, सेर आणि इयाक या भाषांची या संदर्भातील उदाहरणे महत्त्वाची ठरतात. 'यामना' ही चिली देशातील एका लहान समूहामार्फत बोलली जाणारी स्थानिक भाषा होती. २०२२ साली क्रिस्टीना कॅल्डेरॉन या यामना भाषा ज्ञात असणाऱ्या, शेवटच्या व्यक्तीचे निधन झाले. त्यांच्या निधनासोबत या भाषेनेही जगाचा निरोप घेतला. 'सेर' या अंदमान बेटावर बोलल्या जाणाऱ्या भाषेच्या बाबतीतही हेच झाले.

'लिको' ही 'सेर' भाषा बोलणारी शेवटची व्यक्ती होती. २०२० साली या व्यक्तीचे निधन झाले आणि 'सेर' भाषेचे अस्तित्व संपुष्टात आले. 'इयाक' ही अलास्कामध्ये बोलली जाणारी एक स्थानिक भाषा होती. मारी स्मिथ जोन्स यांना 'इयाक' भाषा बोलणारी शेवटची व्यक्ती म्हणून ओळखले जायचे. २००८ साली त्यांच्या निधनानंतर 'इयाक' या भाषेचे अस्तित्व धोक्यात आले. पण, मारी स्मिथ जोन्स यांनी त्यांच्या हयातीत तयार करून ठेवलेल्या 'इयाक' शब्दकोशामुळे, या भाषेला काहीसे जीवनदान मिळाले. या झाल्या दखल घेतल्या गेलेल्या नामशेष भाषा. यांच्या व्यतिरिक्त जगभरातील कितीतरी भाषा अशाही असतील, ज्या अस्तित्वात होत्या हेच मुळात कुणाला माहिती नसेल. २०२४ साली ज्या भाषांसाठी धोक्याची घंटा वाजवली आहे, त्या भाषाही अशाच स्थानिक भाषा आहेत. 'तांडिया', 'मावेस' आणि 'लुहू' या तीनही भाषा इंडोनेशियामध्ये बोलल्या जातात. 'तांडिया' ही भाषा 'ऑस्ट्रोनेशियन' भाषा समूहातील एक भाषा आहे. १९९१ साली झालेल्या सर्वेक्षणात ही भाषा बोलणार्या दोनच व्यक्ती शिल्लक आहेत, असे आढळून आले होते. २००९ साली झालेल्या सर्वेक्षणातही ही भाषा अस्तित्वात असल्याचे आढळून आले होते. पण, २०२४ साली मात्र ही भाषा नामशेष झाल्याचे सांगितले जात आहे. 'मावेस' ही कार्बिक भाषा समूहाशी संबंधित असलेली भाषा. २००६ साली झालेल्या सर्वेक्षणात ही भाषा बोलणारे जवळपास फक्त ८५० लोक शिल्लक असल्याचे, आढळून आले होते. पण, २०२४ पर्यंत ही भाषा नष्ट होण्याची शक्यता नोंदविण्यात आली होती. 'लुहू' ही सुद्धा तंडिया सारखीच 'ऑस्ट्रोनेशियन' भाषा समूहातील भाषा. १९८९ साली जवळपास ३ हजार, ५०० लुहू भाषिक अस्तित्वात होते. पण, इतर भाषांच्या आक्रमणामुळे आणि ही भाषा बोलणार्या भाषिकांची संख्या कमी झाल्यामुळे, २०२४ सालापर्यंत मूळ लुहू भाषा नामशेष झाली.

दरवर्षी अशा अनेक भाषा नामशेष होतात. सुदैवाने त्यातल्या काहींची नोंद घेऊन, त्या पुनरुज्जीवित करण्यासाठी प्रयत्न केले जातात. पण, काहींना मात्र इतिहासजमा व्हावेच लागते. या नामशेष झालेल्या किंवा त्या मार्गावर असलेल्या भाषा, साधारण दोन प्रकारच्या असतात. एकतर त्या दुर्गम भागात बोलल्या जाणाऱ्या छोट्या समूहांच्या भाषा असतात किंवा मग काळाच्या ओघात आधुनिक भाषांच्या आक्रमणामुळे, व्यवहारातून नष्ट झालेल्या प्राचीन भाषा असतात. आपल्या देशातही काळाच्या ओघात नष्ट झालेल्या अनेक बोलीभाषा आहेत. या भाषा नष्ट होताना, आपल्यासोबत जोडलेला इतिहास, संस्कृती, भूगोल आणि इतर सगळ्याच घेऊनच नष्ट होतात. भाषा अभ्यासक आणि समीक्षक यांनी एका ठिकाणी म्हटले होते की, 'जेव्हा कोणतीही भाषा नष्ट होते, तेव्हा जगाकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टिकोनच नष्ट होत असतो.' त्यामुळे कुठल्याही सरणाऱ्या वर्षासोबत आपली भाषा कधीही संपणार नाही, याची दक्षता प्रत्येकाने घेणे खूप गरजेचे आहे.

---

**आपले ऊर्जा क्षेत्र कार्यक्षम व्हावे, प्रभावी व्हावे आणि वीज सामान्य लोकांच्या आवाक्यातील असावी, यासाठी गेली अडीच वर्षे ऊर्जामंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस कायम प्रयत्नशील राहिले. त्याचाच एक भाग म्हणजे सौर ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर.**



नोंद
**वेद कुमार**

याच वर्षी ऑगस्ट-२०२४ मध्ये एक बातमी आली होती, ज्याची फार चर्चा झाली नव्हती. सौर उर्जेच्या वापरासाठी जागतिक स्तरावर प्रयत्न होत असताना महाराष्ट्रातील साताऱ्याच्या पाटण तालुक्यातील मान्याचीवाडी हे राज्यातील पहिले सौरग्राम झाले होते. गावामध्ये 'महावितरण'च्या वतीने १०० टक्के सौर ऊर्जीकरण करण्यात आले होते. राज्यातील पहिले 'सौर ग्राम' झालेल्या मान्याचीवाडीत या योजनेचे लोकार्पण झाले होते.

सौर ऊर्जा ही या गावातील प्रामुख्याने घरगुती ग्राहक व शेतकऱ्यांसाठी वरदान ठरली आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पाद्वारे घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्य होत आहे. मान्याचीवाडी गावात पूर्वी ५ लाख २५ हजार रुपयांचे वीजबिल येत होते. ते सौर ग्राममुळे शून्य झाले आहे. शेतकऱ्यांना

# देवेन्द्र फडणवीस म्हणजे 'रिफॉर्म्स'!

सिंचनासाठी दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० पण राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत जिल्ह्यातील दुसरा प्रकल्प किणी, तालुका हातकणंगले येथे कार्यान्वित झाला असून या प्रकल्पातून १२१६ शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा होत आहे.

जिल्ह्यातील पहिला प्रकल्प हरोली, तालुका शिरोळ येथे यापूर्वीच कार्यान्वित झाला असून त्यातून ७९० शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा होत आहे. त्यामुळे शेतीला दिवसा वीजपुरवठा मिळणाऱ्या शेतकऱ्यांची एकूण संख्या २००६ झाली आहे. आता तर सुरूवात आहे वर्षभराने आकडेवारी परत सांगेनच! याव्यतिरिक्त, या सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी जमीन भाड्याने द्यायला तयार असणाऱ्या शेतकरी बांधवांना दर हेक्टरी १ लाख २५ हजार रुपये दरवर्षी एवढा भाडेपट्टा देण्याची तरतूद आहे. महावितरणच्या सब स्टेशनजवळ उपलब्ध जमिनींमध्ये असे प्रकल्प उभे राहतील. असे प्रकल्प उभे राहिलेल्या ग्रामपंचायतींना देखील पहिली ३ वर्षे ५ लाख रुपये प्रति वर्ष असे अनुदान दिले जाणार आहे.

योजनेमुळे सौर ऊर्जेबाबत आवश्यक कौशल्यांचा विकास होऊन ग्रामीण भागात रोजगाराच्या नवीन संधी तयार होणार आहेत.काही राजकीय पक्ष टॅक्स-पेयर्सच्या जीवावर निवडणुकीच्या तोंडावर फुकट वीज देण्याच्या घोषणा करत असतात, तर भाजप असा भार टॅक्स-पेयर्स वर न टाकता वीज-बिलच झिरो कसे येईल यासाठी प्रयत्नशील असतो. हा फरक आहे!! मान्याचीवाडी नंतर आता महाराष्ट्रातील १०० गावे १०० टक्के सौर ऊर्जेवर नेण्याची मोहीम सुरु झाली असून या गावांना त्यानंतर वीजबिलच येणार नाही. त्यासाठी गावांची निवडही करण्यात आली आहे.

ही योजना केंद्र सरकारने सुरू केली असून देशातील १ कोटी कुटुंबांना ३०० युनिट मोफत वीज पुरवण्याचे उद्दिष्ट आहे. हे भाजपवाले असे EVM हॅक करतात, समजलं का विरोधकांनो? DGF सरकारचे अभिनंदन!!

---

समाजभान
**प्रविण दीक्षित**

# सार्वजनिक सुरक्षा अधिनियम कायद्याची आवश्यकता

**नुकतेच महाराष्ट्राच्या विधानसभेत सार्वजनिक सुरक्षा अधिनियम विधेयक सादर करण्यात आले. विरोधी पक्षांनी या विधेयकाचे रूपांतर कायद्यात झाल्यास महाराष्ट्रात 'पोलिसराज' येईल, अशी हाकाटी उठवली आहे. पण, यानिमित्ताने नेमकी वस्तुस्थिती काय आहे, हे तपासणे आवश्यक. त्यासाठी हा लेखप्रपंच...**


महाराष्ट्र व देशात शांतता बिघडविण्याच्या उद्देशाने व देशामध्ये सामान्य लोकांमध्ये भीती निर्माण करून दहशतवाद पसरविण्याचे मनसुबे अनेक संस्था व व्यक्ती पद्धतशीरपणे राबवित असल्याचे आढळते. त्यातील काही प्रमुख घटनांकडे मी या लेखाच्या माध्यमातून लक्ष वेधू इच्छितो.

भीमा-कोरेगावसंदर्भात महाराष्ट्रभर जातीय दंगलींचा जानेवारी २०१८ च्या सुरुवातीस आगडोंब उसळला आणि त्यात हकनाक एका व्यक्तीचा बळी गेला. पोलिस तपासानंतर 'शहरी माओवादी' नावाखाली वावरणाऱ्या अनेक प्रमुख नेत्यांना दिल्ली, मुंबई, हैदराबाद व देशाच्या अन्य भागांतून अटक करण्यात आली. त्यातील अनेक जण आजही सर्वोच्च न्यायालयात जाऊनही तुरुंगात आहेत. सैन्यदल प्रमुख जनरल रावत यांनी त्यावेळी दिल्लीत बोलताना इशारा दिला होता, 'खलिस्तानी चळवळीला पंजाबमध्ये प्रोत्साहन मिळत आहे.' त्यासाठीचा निधी महाराष्ट्रातून मिळत असण्याची शक्यता आहे. केरळमधील 'Indian Popular Front (IPF)' या 'जिहाद' संकल्पनेला खतपाणी घालणाऱ्या मदानी याने कोईम्बतूर व अन्य भागांत घडवलेल्या बॉम्बस्फोटांत अनेक निरपराध व्यक्तींचा बळी गेला होता. मुंबई व महाराष्ट्राच्या अन्य भागांत आज 'आयपीएफ'च्या छुप्या कारवायांना जोर प्राप्त झाला आहे. 'इसिस' या दहशतवादी संघटनेकडे आकर्षित होणाऱ्या काही व्यक्ती कल्याण, पुणे या भागांतून सीरियात गेल्याचे निष्पन्न झाले होते. अशा प्रवृत्तींना खतपाणी घालणाऱ्या काही संघटना व व्यक्ती महाराष्ट्रात ठिकठिकाणी कार्यशील असण्याची शक्यता आहे. काश्मीरमधील दहशतवाद्यांना पाठिंबा देणारे महाराष्ट्रात येऊन ठिकठिकाणच्या विद्यापीठांतील विद्यार्थ्यांना चिथावणी देताना आढळले आहेत. अशा राष्ट्रविघातक अनेक प्रवृत्तींना चिथावणी देणाऱ्यांविरुद्ध सध्या 'केंद्रीय बेकायदेशीर कारवाया प्रतिबंध कायद्या'प्रमाणे कारवाई केली जाते. परंतु, या कायद्यामध्ये असलेल्या अनेक त्रुटी दूर करून 'सार्वजनिक सुरक्षा कायदा' करण्याची तातडीने आवश्यकता आहे. भारत सरकारनेही महाराष्ट्र सरकारने असा कायदा करावा, अशी सूचना केली आहे. छत्तीसगढ, तेलंगण, आंध्रप्रदेश व अन्य अनेक राज्यांनी 'विशेष जनसुरक्षा अधिनियम' कायदा २००५ नंतर लागू केला आहे. भीमा-कोरेगाव दंगलीतील आरोपी व शहरी माओवादी सुधा भारद्वाज यांनी 'People's Union for Civil Liberties (PUCL) तर्फे छत्तीसगड उच्च न्यायालयात सदर कायदा रद्द करावा, तो बेकायदेशीर आहे, अशा प्रकारचा कायदा करण्यास राज्ये असमर्थ आहेत, अशी मागणी न्यायालयात केली होती. यासंबंधी ११ एप्रिल २०१४ रोजी छत्तीसगडच्या उच्च न्यायालयाच्या प्रमुख न्यायाधीश व अन्य एक न्यायाधीश यांच्या खंडपीठाने हे सर्व आक्षेप अमान्य करत स्पष्ट केले होते की, लोकांमध्ये भीती व दहशतवाद पसरू नये, यासाठी राज्यांनी केलेला कायदा, कुठल्याही प्रकारे भारतीय राज्यघटनेच्या विरुद्ध नाही. तो तर्काला धरून आहे व त्यात बेकायदेशीर असे काहीही नाही. त्यामुळे अशाच प्रकारचा कायदा राष्ट्रविघातक अशा वर उल्लेखिलेल्या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी करण्याची आवश्यकता आहे. सदर कायद्याचा अभ्यास केल्यानंतर असे दिसते की, गैरकायदेशीर कारवायांमध्ये चिथावणीखोर भाषणे देणे, सार्वजनिक स्वास्थ बिघडवणे, सार्वजनिक शांततेसाठी निर्माण केलेल्या संस्था किंवा व्यक्तींवर हल्ला करणे, हिंसात्मक कारवाया करण्यासाठी प्रोत्साहन देणे, दहशतवाद पसरविणे, अग्निशस्त्रे वापरण्यास प्रोत्साहन देणे व कायद्याने केलेल्या संस्था व कायद्यांविरुद्ध वागण्यास प्रोत्साहन देणे. सदर कारवायांसाठी निधी व रसद गोळा करणे या सर्व बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे. सध्याच्या केंद्रीय गैरकायदेशीर प्रतिबंधक कायद्यामध्ये यातील अनेक गोष्टींचा उल्लेख केलेला नाही. केंद्रीय कायदा भारताच्या सार्वभौमतेला धोका देणाऱ्या कारवायांविरुद्ध आहे. राज्यात होत असणाऱ्या अनेक गैरकायदेशीर कारवायांना त्यामुळे प्रतिबंध करणे अशक्य आहे. त्याचाच गैरफायदा वर उल्लेखिलेल्या राष्ट्रविघातक शक्ती वारंवार घेत आहेत. 'छत्तीसगढ विशेष सुरक्षा सार्वजनिक सुरक्षा अधिनियमा' प्रमाणे जी व्यक्ती अशा गैरकायदेशीर संस्थेसाठी निधी देते किंवा घेते; तिला तीन वर्षांचा कारावास सांगितला आहे. अशाप्रकारे बेकायदेशीर कारवायांना चिथावणी देणाऱ्या व्यक्तीला सात वर्षांची शिक्षा सुचविण्यात आली आहे. या कायद्याचा लोकशाही मार्गाने विरोध करणाऱ्यांविरुद्ध वापर होऊ नये, यासाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. त्याप्रमाणे कोणत्याही संस्थेस बेकायदेशीर जाहीर करण्यापूर्वी सर्व उपलब्ध पुरावे, या कायद्याने प्रस्थापित विशेष सल्लागार मंडळापुढे ठेवावे लागतात. या सल्लागार मंडळात उच्च न्यायालयाचे तीन सर्वांत वरिष्ठ न्यायाधीश सदस्य आहेत. त्यातील एकास त्याचे प्रमुख करण्यात आले आहे. सल्लागार मंडळाने मान्य केल्यानंतरच एखादी संस्था बेकायदेशीर म्हणून जाहीर होते व त्यांच्या बेकायदेशीर कारवायांवर कारवाई करणे शक्य होते. त्यामुळे या कायद्याचा गैरवापर होईल, अशी हाकाटी पिटणाऱ्यांना योग्य प्रत्युत्तर देण्यात आले आहे. अशा प्रकारचा कायदा उपलब्ध नसण्यामुळे मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर व अन्य अनेक ठिकाणी शहरी माओवादी वेगवेगळ्या माध्यमांतून सार्वजनिक सभा घेऊन गैरकायदेशीर कृत्यांना राजरोस प्रोत्साहन देत आहेत.

'Tata Institute of Social Sciences' (TISS) सारख्या केंद्रीय संस्था, राज्यातील अनेक विद्यापीठे व वसतिगृहे या ठिकाणी अशा गैरकायदेशीर कारवायांना प्रोत्साहन द्यायचे अड्डे बनले आहेत. त्यातून तरुणांमध्ये जातीय तेढ निर्माण करणे, धार्मिक दंगली पसरवणे, गैरकायदेशीर कृत्यांसाठी नेतृत्व निर्माण करणे, निधी व रसद गोळा करणे अशा कारवाया चालू आहेत. सध्याच्या प्रचलित कायद्यामध्ये या गोष्टी घडताना दिसून येत असून त्या प्रतिबंध करण्यासाठी पोलिसांकडे किंवा न्यायसंस्थेकडे पुरेशा तरतुदी नाहीत. त्यामुळे राजकीय व्यक्तींचे खून होणे, दहशतवादी कृत्य हे प्रकार चालू आहेत. त्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी आपसातील मतभेद बाजूला ठेवून लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी व लोकांना निर्भयपणे विकास साध्य करण्यासाठी 'महाराष्ट्र सार्वजनिक सुरक्षा अधिनियम' विधानमंडळात मंजूर करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. शासनानेही यात दिरंगाई न करता, आपली जबाबदारी पार पाडली आहे. लवकरात लवकर हा कायदा होईल व महाराष्ट्रात त्यामुळे शांतता निर्माण होईल, अशी अपेक्षा. (लेखक महाराष्ट्राचे निवृत्त पोलिस महासंचालक आहेत.)



---



## लोहपुरुष सरदार पटेल

नाडियाद स्थळी जन्म सरदार पटेलांचा
लाडबाई माता-पिता लाभे तो झवेरीभाई.
होती छोट्या वल्लभची बुद्धी अत्यंत कुशाग्र शिक्षणाची
होती रुचि स्थान नेहमीच अग्र.
सर्वप्रथम गोधरा वकिलीची सुरुवात
ब्रिटिशांना नाकारले गांधीवादी वाटचाल
नकारात्मकतेसाठी लढा दिला समाजात
शेतकरी करासाठी इंग्रजांना केली मात
सायमन कमिशन सत्याग्रह विरोधात बारडोली
जन सारे विचारांच्या प्रभावात.
होते सशक्त नेतृत्व सरदार नाव शोभे कार्य
जगात महान भारतीय पाठी उभे.
पाचशेपासष्ट राज्य केले विलीन देशात
मार्ग होता शांततेचा लोहपुरुषाची मात.
हैदराबाद, जुनागढ राजे-निजाम परास्त
वज्राहूनी अवघड साम्राज्यशाहीचा अस्त.

**स्वप्ना प्रशांत जगदळे**



## वादळ थंडीचं

वादळ आलंय थंडीचं हुडहुडी भरलीय आभाळाला
गारठ्याची काहिली पसरतेय स्पर्श नकोसा रुक्ष
उन्हाचा पांघरुणातली झोप गुलाबी उगाच पहाट
होते रात्र सरून उबदार आठवणींचं वादळ उसळतं
वाफाळलेल्या कपात भरून हळुवार होतेय पानगळ
शब्दफुलांची.. विचारांच्या धुक्यात धुक्यात अडकता
किरणं सूर्याची वितळते अलवार तुपातली वात.. पुन्हा
गर्द निळ्या रात्रीला शीतलहरींचा स्वर झोंबणारा यावे
आता वसंताने लवकर पुरे झाला शिशिर गोठवणारा!

**तृप्ती नवारे**